# जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव

## // महासभा बैठकीचे कार्यवृत्त //

**सभा क्रं. - ४३** **दि. २१/१०/२०२२**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि.२१/१०/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता सरदार वल्लभभाई पटेल टॉवर इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील सभागृहात मा.पिठासीन अधिकारी तथा महापौर. सौ.महाजन जयश्री सुनिल यांचे अध्यक्षतेखाली प्रत्यक्ष उपस्थितीने झालेल्या महासभेचे कार्यवृत्त.

उपस्थिती नोंदणी रजिष्टरमध्ये स्वाक्षरी करून खालील मा.सभासद सभेस उपस्थित होते.

**मा.सौ.महाजन जयश्री सुनिल, महापौर तथा पिठासिन अधिकारी**

| | | |
|---|---|---|
| पाटील कुलभुषण विरभान, उपमहापौर | पाटील सचिन भिमराव | पाटील राजेंद्र झिपरु |
| जोहरे प्रिया मधुकर | चौधरी मनोज सुरेश | महाजन सुनिल सुपडु |
| नेरकर सरीता अनंत | भोईटे लताबाई रणजीत | शेख शबानाबी सादीक |
| पोकळे दिलीप बबनराव | पाटील चंद्रशेखर शिवाजी | नाईक प्रशांत सुरेश |
| खान रुखसानाबी गबलु | कापसे मयुर चंद्रकांत | काळे रेश्मा कुंदन |
| सोनवणे कांचन विकास | कापसे प्रतिभा चंद्रकांत | आहुजा मनोज नारायणदास |
| दारकुंडे नवनाथ विश्वनाथ | देशमुख प्रतिभा गजानन | पाटील मिनाक्षी गोकुळ |
| बाविस्कर किशोर रमेश | सोनवणे सुरेश माणिक | सोनार रंजना विजय |
| सपकाळे मिना धुडकु | बारी शोभा दिनकर | खडके सुनिल वामनराव |
| कोळी दत्तात्रय देवराम | शेख हसीनाबी शरिफ | खडके विश्वनाथ सुरेश |
| सपकाळे रंजना भरत | भिल पार्वताबाई दामु | बागवान रियाज अहेमद अब्दुल करीम |
| कोल्हे प्रविण रामदास | पाटील उषा संतोष | देशमुख सुन्नाबी राजु |
| सोनवणे भारती कैलास | बरडे नितीन मनोहर | शेख सैईदा युसुफ |
| चौधरी चेतना किशोर | बेंडाळे उज्वला मोहन | निता मंगलसिंग सोनवणे |
| भंगाळे विष्णु रामदास | राणे गायत्री इंद्रजित | सोनवणे विक्रम किसन |
| सोनवणे राखी शामकांत | जोशी अनंत हरिश्चंद्र | **स्विकृत सदस्य** |
| लढ्ढा नितीन बालमुकुंद | मराठे जितेंद्र भगवान | कैलास नारायण सोनवणे |
| चौधरी मंगला संजय | सोनवणे अंजनाबाई प्रभाकर | विशाल राधेशाम त्रिपाठी |
| सोनवणे धीरज मुरलीधर | पाटील रेखा चुडामण | राजेंद्र नारायण मराठे |
| भोळे सिमा सुरेश | सोनवणे सुरेखा सुदाम | महेश रतन चौधरी |
| सोनवणे अश्विन शांताराम | ढेकळे सदाशिव गणपत | |

सदर सभेस मा.आयुक्त, डॉ.विद्या गायकवाड, मा.अतिरीक्त आयुक्त श्री.एम.जी.गिरगावकर, नगरसचिव, श्री.सुनिल गोराणे, मा.उपायुक्त श्री.प्रशांत पाटील, मुख्यलेखाधिकारी, श्री.चंद्रकांत वानखेडे, श्री.पी.के.बागुल, सहा.संचालक, नगररचनाकार तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

**मा.महापौर :-** सभेला सुरुवात करावी.

**नगरसचिव :-** नमस्कार, सर्व सन्मा.सभागृहाचे स्वागत आहे. सर्व सन्मा.सभागृहाला विनंती करतो की, वंदेमातरमसाठी उभे राहावे.

**सभेस गणपूर्ती असल्याने मा.पिठासिन अधिकारी यांनी सभा सुरू करण्याचे निर्देश दिले.**

**सभेच्या सुरूवातीस वंदेमातरम ने सुरूवात करण्यात आली.**

**नगरसचिव :-** आजच्या सभेकरीता १) सन्मा.सदस्य सनकत चेतन गणेश २) काळे अमित पांडुरंग ३) पाटील विजय पुंडलीक ४) कोल्हे ललीत विजय तसेच ५) सन्मा.सदस्या ॲड.हाडा शुचिता अतुलसिंह ६) काळे दिपमाला मनोज ७) पाटील प्रतिभा सुधीर ८) कोल्हे सिंधु विजय ९) तायडे सुरेखा नितीन १०) चव्हाण ज्योती बाळासाहेब यांचे रजेचे अर्ज आलेले असुन ते मा. पिठासिन अधिकारी महोदया यांनी मंजूर केलेले आहेत.

**(नगरसचिव यांनी श्रध्दांजलीच्या प्रस्तावांना वाचायला सुरुवात केली.)**

**नगरसचिव :-** सर्व सभागृहाला विनंती करतो की, सर्वांनी दोन मिनीट श्रध्दांजलीसाठी उभे राहायचे आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ९३३ पारित करण्यात आला.**

सभा कामकाजाच्या सुरुवातीस सन्मा.सदस्यांनी खालील प्रमाणे श्रध्दाजंलीचे प्रस्ताव मांडले.

| अ.क्र. | सन्मा.सदस्यांचे नांव | श्रध्दांजलीचे प्रस्ताव |
|---|---|---|
| १. | १. सौ.महाजन जयश्री सुनिल, मा.महापौर<br>२. श्री.पाटील कुलभुषण विरभान, मा.उपमहापौर<br>३. श्री.आहुजा मनोज नारायणदास | मनपा सन्मा.सदस्या, सौ.ज्योती बाळासाहेब चव्हाण यांचे वडील व प्रभाग समिती क्रं.३ चे प्रभाग अधिकारी श्री.बाळासाहेब चव्हाण यांचे सासरे धुळे येथील पंचायत समितीचे सेवानिवृत्त महिला व बालविकास अधिकारी, स्व.कृष्णराव देवराम बोरसे यांचे दु:खद निधनाबद्दल. |

श्रध्दांजली बाबत आलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने उपरोक्त दु:खद घटनेबाबत सभागृहाला अत्यंत दु:ख होत आहे. परमेश्वर इहलोक सोडून गेलेल्या मृतात्म्यास चिरशांती प्रदान करो, त्यांच्या समस्त कुटूंबियांचे दु:खात सभागृह सहभागी असून त्यांचे कुटूंबियांना, मित्र परिवारास दु:ख सहन करण्याची शक्ती प्रदान करो या भावनेसह सभागृहाने दोन मिनीटे शांत उभे राहून दिवगंत आत्म्यांना श्रध्दांजली अर्पण केली.

**श्री.कैलास सोनवणे :-** माहिती सादर करा, काय झाले, लगेच मिटींग निघाली तर फारसे काम झाले नसेल पण काय झाले तेवढे सांगा, महापौरांनी सांगितले होते की, दिवाळी पुर्वी करा असे काही तर, जेवढे असतील जे असतील ते आपले कर्मचाऱ्यांचे.

**श्री.चंद्रकांत वानखेडे, उपायुक्त (आस्थापना) :-** सन्मा.व्यासपीठ, सन्मा, सदस्य, आप्पासाहेबांनी जे प्रश्न विचारले, मागच्या महासभेत त्याची माहिती देण्यात आलेली होती. मागच्या महासभेमध्ये जी चर्चा झालेली होती की, आपल्याकडे जे ३४९ कर्मचारी जे होते, ज्यांच्यावर आक्षेप नाही परंतु कॉमन आक्षेप आहे. त्याचे तपास झालेनंतर कार्यवाही करण्यात येईल. अद्यापपावेतो ही कार्यवाही झालेली नसल्यामुळे प्रकरण गेलेले नाही.

**श्री.कैलास सोनवणे :-** ३४९ चे तर आपले काही नाही ना.

**श्री.चंद्रकांत वानखेडे, उपायुक्त (आस्थापना) :-** ते तपासायचे बाकी आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** कॉमन आक्षेप आहेत काही,

**श्री.चंद्रकांत वानखेडे, उपायुक्त (आस्थापना) :-** जरी त्यांच्या नावासमोर आक्षेप नाही. मात्र ऑडीट कार्यालयाकडुन कॉमन आक्षेप दिलेला आहे. तर त्याच्या अनुषंगाने ते प्रकरण तपासुन त्याच्यावर योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

**श्री.कैलास सोनवणे :-** एक विषय फक्त बांधकामाचा होता गिरगावकर साहेब, टॉवर पासुन ते आमच्या घरापर्यंतचा जो रस्ता आहे. त्याचे काम झालेले आहे. पी.एम.झालेले आहे, कारपेट बाकी आहे, सिलकोट बाकी आहे. त्याची लाईन लावा साहेब लवकर, कारण रथ मार्ग आहे तो,

**श्री.नितीन लढ्ढा :-** कारण आप्पा याच मक्तेदाराकडे सिव्हील हॉस्पीटलचा पण रस्ता आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** हा, हा रस्ता झाला की, तो सुध्दा होईल ना.

**श्री.नितीन लढ्ढा :-** पुष्पलता बेंडाळे चौक ते पांडे डेअरी चौक,

**श्री.कैलास सोनवणे :-** रथोत्सव आहे ना भाऊ आता, तेवढे करा प्लीज साहेब.

**मा.महापौर :-** विषयपत्रिकेवरील विषयांना सुरुवात करण्यात यावी.

**नगरसचिव विषय क्रं:- १)** केंद्र शासनाच्या अमृत २.० अभियाना अंतर्गत पाणी पुरवठा व मलनिस्सारण योजनेसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नियुक्ती करणेसाठी महासभा ठराव क्रं.८६९ दि.०८/०८/२०२२ मधील निश्चित धोरणात बदल करुन मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** प्रशासनाचा प्रस्ताव मंजुर करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** मा.महापौर महोदया, यामध्ये आता जो मंजुरीला प्रस्ताव घेतलेला आहे, तत्पुर्वी या संदर्भामध्ये दि.०८/०८/२०२२ रोजीची जी महासभा झाली होती. सर्व सदस्यांचे सर्वानुमते आपण पी.एम.सी. सर्व्हीसेस नेमणेबाबत एकमताने ठराव करुन ऑनलाईन निविदा प्रक्रिया राबविण्यासंदर्भामध्ये ठराव केलेला होता.परंतु असे असतांना देखील महासभेच्या केलेल्या ठरावाची कुठलीही अंमलबजावणी गेल्या दोन महिन्यापासुन करण्यात आलेली नाही. तत्पुर्वी या ठिकाणी विषयपत्रिकेवर विषय आल्यानंतर निसर्ग कन्सल्टन्सी यांना कार्यादेश देण्याबाबतचे त्या वेळेस प्रशासनाच्या वतीने महासभेला कुठल्याही पध्दतीने किंवा कोणत्याही प्रकारे अवगत करण्यात आलेले नव्हते. तर माझे म्हणणे या ठिकाणी असे आहे की, प्रशासनाने महासभेत केलेल्या ठरावाची अंमलबजावणी करत नसेल आणि महासभेच्या केलेल्या ठरावाला किंमत देत नसेल.तर मग ही महासभा, नगरसेवक आणि येथील केलेले ठराव याला काय अर्थ आहे. दुसरा विषय याच्यामध्ये असे सांगण्यात आले की, आता आपल्याला ३१ ऑक्टोबर पर्यंतचीच मुदत आहे. ३१ ऑक्टोबरपुर्वी आपण डी.पी.आर. तयार करुन पाठविला नाही तर महानगरपालिकेचे नुकसान होऊ शकते. फंड मिळणार नाही किंवा आपल्याला या योजने पासुन वंचित राहवे लागेल. परंतु या ठिकाणी मी एक गोष्ट नमुद करु इच्छितो, आपल्याला ज्यावेळी १४ जुलैला शासनाचे एक परिपत्रक आलेले आहेत, परिपत्रकामध्ये स्पष्टपणे नमुद होते की, आपल्या महापालिकेच्या प्रशासनाने करावयाच्या कार्यवाहीबाबत किंवा प्राप्त करावयाच्या अहवालाबाबत. तत्पुर्वी ज्या वेळेस,एजन्सी नेमणे संदर्भातली व्ही.सी. झाली, त्या ठिकाणी दि.०८/०६/२०२२ रोजी शासनस्तरावर झालेल्या आढावा बैठकीमध्ये पी.एम.सी.नेमण्याबाबत व्ही.सी.मध्ये चर्चा झाली होती. मला असे वाटते मॅडम, त्या व्ही.सी. मध्ये आपणही उपस्थित होतात, शहर अभियंता उपस्थित होते. जे या प्रोजेक्टवर काम करणारे लोक आहे ते उपस्थित होते. असे असतांना देखील दि.०८/०८/२०२२ च्या महासभेमध्ये आपल्या अमृत २.० प्रकल्प राबविण्याच्या संदर्भामध्ये हा विषय विषयपत्रिकेवरती आला, त्यावेळेस या सर्व गोष्टी महासभेला अवगत का करुन दिलेले नाही किंवा तत्पुर्वी आपण ठराव करत असतांना अमुक अमुक एजन्सीला किंवा अमुक अमुक लोकांना आम्ही प्रकल्प अहवाल तयार करण्याबाबत पत्र दिलेले आहे. असे महासभेला का अवगत करण्यात आले नाही.

**मा.महापौर :-** प्रशासनाने खुलासा सादर करावा.

**मा.आयुक्त :-** सिटी इंजिनिअर.

**श्री.एम.जी.गिरगावकर, शहर अभियंता :-** सन्मा.महापौर, सन्मा.उपमहापौर, आदरणीय आयुक्त महोदया आणि सर्व सन्मा.सदस्य या ठिकाणी उपमहापौरांनी जो प्रश्न विचारलेले आहे. प्रथमत: या ठिकाणी मी नमुद करु ईच्छितो की, याबाबत सखोल चर्चा मागच्या महासभेमध्ये झालेली होती आणि मागच्या महासभेमध्ये चर्चा झाल्यानंतर याच्यावर निर्णय घेण्यासाठी सर्व पक्षीय समितीची बैठक या ठिकाणी आयोजीत करण्यात आलेली होती. आणि सर्व पक्षीय बैठकमध्ये पण दोन ते तिन तास चर्चा झाली, आणि सर्व पक्षीय समितीच्या बैठकीमध्ये सगळया गोष्टी नमुद केलेल्या आहे. आणि त्या सर्व पक्षीय समितीच्या बैठकीमध्ये असे झाले की, कन्सल्टेशनचे काम महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाला देण्यात यावा. तथापी या ठिकाणी जे काही मुद्दे उपस्थित केलेले आहे. त्या अनुषंगाने मी नमुद करु ईच्छतो की, मागच्या महासभेची अंमलबजावणी का करण्यात आली नाही तर मला हेच म्हणायचे होते की, महासभेची अंमलबजावणी करणेमध्ये कुठलाही दुरहेतु नाही. पण त्यानंतर १६ सप्टेंबर २०२२ चा जो शासनाचा जी.आर.आलेला आहे की, लवकर करा ही बाब आम्हाला महासभेच्या निदर्शनास आणुन द्यायची राहुन गेली. त्या मध्ये निसर्ग कन्सलटंन्ट याला जर रद्द करायचे आहे. त्याच्यात पहिला मुद्दा असा आहे की, निसर्ग कन्सलटंन्ट याची कार्यादेश देणे ही बाब महासभेसमोर आली नाही. त्याचे कारण असे आहे की, ही निविदा २०१९ मध्ये, जर असे प्रकरणाचे महापालिकेला शासकीय कामासाठी काही अंदाजपत्रक तयार करायचे असतील, डिटेल प्रोजेक्ट रिपोर्ट वगैरे तर त्याच्यासाठी २०१९ मध्ये निविदा मागवुन त्याचे प्यारेलीन करण्यात आलेला आहे. आणि त्याला २०१९ मध्ये मा.स्थायी समितीने त्याला मान्यता दिलेली आहे. प्रचलित पध्दतीनेच ही कामे केलेली आहे महापालिकेचे, एकदा पॅनलाईज केलेनंतर त्या पॅनल मध्ये जे कोणी नियुक्त आहे. आणि जे काही काम करायचे आहे. त्याला मा.आयुक्ताच्या मान्यतेने त्याला कार्यादेश देण्यात येते. त्यानुसार जे काही निविदा निघाल्यानंतर माझ्या लक्षात आलेले ह्या गोष्टी, अॅकच्युली हे मागच्या ऑक्टोबरमध्ये लॅन्च झाले, त्याचे जानेवारीमध्ये कार्यशाळा झाल्या. त्यानंतर काही महापालिकांनी लगेच जे पॅनलवर कन्सलटंन्ट होते त्यांना अपॉईटमेंट दिली होती. त्यानंतर माझ्या लक्षात आले की, साईट व्हिजीट करणे गरजेचे आहे. त्या अनुषंगाने आपल्याला पॅनलवरच्या निसर्ग, जो की महाराष्ट्राच्या १६ पॅनलवरती सुध्दा समायोजन

झालेली आहे. मुद्दा असा आहे की, त्याच्यानंतर महासभा जी झाली. हा मुद्दा होता त्याच्यामध्ये की, नविन कन्सलटंन्ट नेमा. प्रश्न असा येतो की, त्याच्यात ज्या काही अडचणी आहेत त्या प्रशासनाच्या अडचणी आहे, त्याला अनुसरुन विनंती आहे, जर नविन टेन्डर काढले तर निसर्ग कन्सलटंन्ट हा कोर्टात जाऊ शकतो. नंबर २ जर त्या ठिकाणी नविन निविदा प्रक्रियेमध्ये तांत्रिक ईनव्हेलप आणि फायनॅन्शीयल ईन्व्हेलप, टेक्नीकल ईनव्हेलप ओपन केल्यानंतर त्याची छाननी करणे आणि त्याच्यातले कॉलीफिकेशन ठरविणे, ते फार चिचकटीचे काम आहे. त्याच्यामध्ये जर ५-६ कन्सलटंन्ट आली, आणि त्यांचे ईनव्हेलप नंबर दोन ओपन करण्यासाठी, फायन्यान्शीयल ईनव्हेलप ओपन करण्यासाठी जो कॉन्ट्रॅक्ट होतो त्याच्यात मोठे वाद निर्माण होतात. मला का केले नाही कॉलीफायीड, मला का केले नाही कॉलीफायीड, माझे तर होते. कदाचित त्यावेळी सुध्दा पुन्हा त्या त्यापैकी कोणी कन्सलटंन्ट कोर्टात जाऊ शकतात. म्हणुन ही सर्व प्रक्रियेला कमीत कमी दोन ते तीन महिने नविन कन्सलटंन्ट अपॉईंट करण्यास वेळ लागतो. आणि नविन सर्व्हे करुन शहराचे डी.पीआर. करणे अमृत २.० च्या नॉर्मस प्रमाणे, या सर्व गोष्टी जर केल्या तर कमीत कमी ८ ते ९ महिने लागु शकतात. नॉर्मस याच्यामध्ये देखील हे नमुद केलेले आहे. तर या अडचणीचा विचार करावा माझे काही म्हणणे नाही. आता जरी महासभेने ठराव करुन दिला नविन टेन्डर काढा, परंतु आता ज्या याच्यात त्रुट्या आहेत. त्या आता नोंद करुन घ्याव्या. त्याला वेळ लागेल, कालावधी लागेल, कोर्ट मॅटर झाले, कोर्ट मॅटर जर झाले तर टेन्डर लॉक होऊन जाऊ शकतो. आपल्याला पुढे पण जाता येणार नाही मागे पण येता येणार नाही. अशी दुविधा आहे आणि त्याच्यामध्ये एम.जी.पी.चा विषय का आला. एम.जी.पी.चा विषय याच्यासाठी आला की, हा जो हा जो १६ सप्टेंबर २०२२ रोजी हा जी.आर.त्यावेळेस नव्हता, त्यावेळेस राहिले असते तर त्यावेळेस दिले असते, ८ ऑगस्टला परत एक जी.आर.होता. म्हणुन नंतरच्या महासभेमध्ये हा जो आला आहे ८ ऑगस्टच्या महासभेमध्ये हा सादर करण्यात आलेला आहे. याच्यामध्ये प्रश्न पडलेले आहे की, तुम्हाला हा खर्च नको असेल, तर आपल्याला ३ पर्याय आहेत. नंबर १ एम.जी.पी.ला थेट टेन्डर द्याव, दुसरा महाराष्ट्र राज्याच्या पॅनलवरती की, ते एम.जी.पी.चेच पॅनल आहे. त्या १६ जणांना नियुक्त केलेले आहे त्याच्यापैकी एकाला देऊ आणि तिसरा स्वतंत्र निविदा, आता स्वतंत्र निविदा काढायला गेले तर अडचण काय आहे मी ते सांगितले. १६ पैकी एकाला जरी अपॉईंट केले, तरी पहिला कन्सलटंन्ट कोर्टात जाईन. म्हणुन कुठलेही वाद न करता, महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाला जर दिले, तरी ही शासकीय यंत्रणा आहे आणि शासकीय यंत्रणेच्या विरोधात त्याला दिले तर तो जो कोणी आज महाराष्ट्रात कन्सलटंन्ट आहे. त्याला टेक्नीकल सँक्शन महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाने दिलेली आहे. महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाने टेक्नीकल सँक्शन दिल्यानंतर राज्यामध्ये जे काही सगळयाची यंत्रणा आहे, सुरुवातीला हे अनाऊंस करते, मोठया शहराचे, मोठ मोठया नगरपालिकेचे, ग्रामीण भागात पाणी पुरवठा करणारी यंत्रणा आहे. आता सगळाचे धोरण शासन ठरवितो की, कामे करण्याची किंवा कन्सलटंन्टची आली, पण या कन्सलटंन्टला ईस्टीमेट कसे बनवायचे, डी.पी.आर.कसे बनवायचे, काम कसे करायचे याची सुचना महापालिकेने दिली आणि या १५ वर्षामध्ये हे झाले. म्हणुन एम.जी.पी.च्या विरोधात तो जाणार नाही. नंबर १, नंबर २ सद्या आपल्या अमृत १.० आणि २.० मध्ये, अमृत टप्पा १.० मध्ये पाणी पुरवठा ड्रेनेजच्या सिस्टीम वरती महाराष्ट्र जिवन प्राधिकरण कन्सलटंन्ट आहे. आणि त्यांच्याकडे बराच डाटा अव्हेलेबल आहे. त्यांना जास्ती काही काम करावे लागणार नाही. आणि नंबर ३ नविन कन्सलटंन्ट जर आला तर नविन स्कीमचे आणि जुन्या स्कीमचे इंटरकनेक्टीव्हीटी येईल त्याच्यामध्ये आणि असा प्रकार होणार नाही या गोष्टी माझ्या मुद्दयांचा सर्वस्वी विचार करुन महासभेने योग्य तो निर्णय घ्यावा माझी अशी विनंती आहे.

**मा.उपमहापौर :-** साहेबांनी पुर्वीपासुन त्याचे डिटेल देऊन टाकले, मी छोटासा प्रश्न या ठिकाणी हा उपस्थित केला की, आपण दि.०८/०८/२०२२ च्या महासभेमध्ये पी.एम.सी. सर्व्हीसेस नेमण्याच्या बाबतीमध्ये सर्व पक्षीय नगरसेवक सन्मा.सदस्य चर्चा करत असतांना आम्हाला निसर्ग कन्सलटन्सीला दि.०८/०७/२०२२ म्हणजे त्या ठरावाच्या महिन्या भरापुर्वीच कार्यादेश दिले गेलेले आहे. असे का अवगत केले गेलेले नाही. आणि त्याच्या मागचे कारण मी या ठिकाणी विचारले, परंतु साहेबांनी तो विषय डायवर्ट करुन एम.जी.पी. कश्या पध्दतीने काम करते, १.० मध्ये काय काम केलेले आहे. याच्यापुर्वी त्यांचे काय काम होते, आता डी.पी.आर.शक्य आहे की, अशक्य आहे. हा दुय्यम विषय झाला.काम कोणाला द्यायचे हा दुय्यम विषय झाला. परंतु मी जो छोटासा विषय या ठिकाणी उपस्थित केला, या महासभेचे किंवा या महासभेत झालेल्या ठरावाची अंमलबजावणी करायची नाही. मग तो महासभेचा कन्टेम नाही का महापौर महोदया, आणि अश्या पध्दतीने प्रशासनाचे वरिष्ठ अधिकारी मनमानी पध्दतीने कारभार चालवत असतील, वरिष्ठ अधिकारी आयुक्त असतील, महापौर असतील, विरोधी पक्षनेते असतील, जेष्ठ सदस्य असतील, नगरसेवक असतील, किंवा त्याच्या टिम मधील सर्व काम करणारे सहकारी असतील, यांना कोणालाच विश्वासात न घेता, अश्या पध्दतीने

बेकायदेशीरपणे कुठल्याही पी.एम.सी. सर्व्हीसेसची नियुक्ती करणे ही बेकायदेशीर बाब नाही का ? किंवा महासभेला अवगत करणे गरजेचे नाही का ?

**मा.महापौर :-** दि.०८/०८/२०२२ रोजी झालेल्या महासभेमध्ये आपल्याला निर्णय घ्यायचा होता. त्यावेळेला आपण खुलासा करणे म्हणजे सगळे सन्मा.सदस्यांना सांगणे आवश्यक होते.

**अॅड.श्री.दिलीप पोकळे :-** त्याला माझे अनुमोदन आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** महापौर महोदया, आता जो उपमहापौर महोदय यांनी जे प्रश्न उपस्थित केले, आणि मा.शहर अभियंता यांनी त्याला उत्तर दिले. मला याच्यामध्ये थोडेसे कन्फ्युजन वाटते की, मा.शहर अभियंता महोदय यांनी जे उत्तर दिले, त्या उत्तराबद्दल माझ्या मनात एक शंका किंवा आक्षेप आहे की, निसर्ग कन्सलटन्सीच्या मक्ता रद्द करण्याच्या संदर्भातला जो प्रस्ताव दिलेला आहे. त्यांनी कामाची निकड लक्षात घेता, निसर्ग कन्सलटंन्ट, नाशिक यांनी सादर केलेला अहवाल, अमृत २.० च्या मार्गदर्शक सुचनानुसार नसल्याने त्यांची नियुक्ती रद्द करुन महासभा ठराव क्र.८६९ दि.०८/०८/२०२२ रोजी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांच्या नियुक्तीच्या धोरणात बदल करुन या कामांसाठी शासन परिपत्रकातील मुद्दा क्र.३अ नुसार महाराष्ट्र जिवन प्राधिकरण यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणुन नियुक्ती करणेबाबत प्रशासनाचा प्रस्ताव महासभेसमोर सादर. ठिक आहे, ज्या वेळेला दि.०८/०७/२०२२ रोजी निसर्ग कन्सल्टंसीला काम देण्यात आले. त्यांनी त्याच्या संदर्भातला खुलासा केला की, आपल्या पॅनलवर एजन्सी म्हणुन २०१९ ला तश्या पध्दतीने मान्यता दिलेली होती. एक घडीभर आपण तो ही विचार मान्य करु. त्याला कायदेशीर मान्यता त्या वेळेस महासभेने त्यानंतर स्थायी समितीने मान्य केली. परंतु त्याला कार्यादेश देऊन दि.०८/०७/२०२२ ला कार्यादेश दिला. आज साधारणता ३ महिन्याचा कालावधी होऊन गेला.कार्यादेश देऊन तर या ३ महिन्याच्या कालावधी मध्ये ज्या पध्दतीने कार्यादेश दिलेला होता. त्या कार्यादेशाच्या अनुषंगाने निसर्ग कन्सल्टन्सीने आपले काम पुर्ण केलेले आहे का ? आज सगळयात महत्वाचा मुद्दा त्यांनी सांगितले की, वेळेचा मुद्दा आहे. ठिक आहे ती योजना आहे. दि.३१/१०/२०२२ पर्यंत त्याची गाईडलाईन आहे. त्याच्यामध्ये फस्ट कम फस्ट सर्व या पध्दतीवर आहे. योजनेचा कालावधी पुर्ण ५ वर्षासाठी आहे. निधी मंजुर होऊन आपल्याकडे येऊन पडलेला आहे आणि तो समजा दि.३१/१०/२०२२ पर्यंत नाही आपण खर्च केला तर तो परत जाईल असली काही परिस्थिती नाही. ती एक लाँगटर्म प्रोसेस आहे ५ वर्षाची. आज नाही मिळाली संधी तर पुढच्या टप्पात मिळेल संधी त्या बद्दलही वाद नाही. परंतु या सर्व गोष्टींचा सातत्याने विचार करुन प्रशासनाने तो निर्णय घेतला की, वेळेची बचत व्हावी. काम विहित मुदतीच्या आत पुर्ण व्हावे. आणि तो डी.पी.आर. इन टाईम राज्य शासनाकडे सादर व्हावा. परंतु ज्या उद्देशासाठी तो निर्णय घेतलेला होता. ते उद्दिष्ट तरी पुर्ण झालेले आहे का ? ते उद्दिष्ट पुर्ण झाले आहे की नाही झाले त्याच्या संदर्भातला खुलासा नाही झालेला आहे. आता येथे म्हटलेले आहे की, कामाची निकड लक्षात घेता, निसर्ग कन्सल्टन्सी यांनी सादर केलेला अहवाल, अमृत २.० च्या मार्गदर्शक सुचनेनुसार नसल्याने त्यांची नियुक्ती रद्द करावी. मग जर कधी. त्यांनी गाईडलाईन प्रमाणे जर कधी डी.पी.आर. तयार केलेला नसेल. आणि त्या मक्तेदाराच्या चुकीमुळे या योजनेला अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने की, विहित मुदतीत आपला अहवाल आपण राज्य शासनाकडे सादर करु शकत नाही. तर याच्या संदर्भात त्या मक्तेदाराच्या विरुध्द काय कार्यवाही करण्यात येईल. हा एक प्रश्न, याची काही पडताळणी झालेली आहे का ? आणि याची जर पडताळणी झाली असेल. आणि खऱ्या अर्थाने त्यांनी मार्गदर्शक सुचनेनुसार काम केलेले नसेल. तर याच्या बद्दल विभागाने आतापर्यंत काय काय कार्यवाही प्रस्तावीत केलेली आहे.कारण ज्या वेळेला कार्यादेश देण्याचा हेतु आपला स्वच्छ होता की, काम गतीने व्हावे, या हेतुने कामाचा कार्यादेश देण्यात आलेला होता. परंतु त्याच्या प्रगतीपथकाच्या प्रत्येक टप्प्यावरती प्रशासन काय लक्ष देत होते की, दि.३१ ऑक्टोबर पुर्वी हा डी.पी.आर. परिपुर्ण पध्दतीने तयार होऊन हा राज्य शासनाकडे सादर व्हावा. आणि अश्या अनुषंगाने आतापर्यंत त्यांच्याशी काय काय पत्र व्यवहार झाले. आणि त्यांच्या कामामध्ये प्रगती दिसुन येत नव्हती. तर त्याच्या स्टेटस वरती काय काय कार्यवाही प्रस्तावीत करण्यात आली. हा एक मुद्दा दुसरा मुद्दा जो गिरगावकर साहेबांनी सांगितला, सदरहु मक्तेदार हा आपण जर कधी झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने महासभेने जो ठराव केलेला होता. दि.०८/०८/२०२२ रोजी त्या ठरावाच्या अनुषंगाने जर कधी आपण वेगळा मक्तेदार नेमला असता, तर पुर्वी कार्यादेश दिलेला मक्तेदार हा कोर्टात जाऊ शकला असता, ती परिस्थिती आजही नाकारता येऊ शकत नाही. हे कुठल्या कायद्यामध्ये लिहलेले आहे की, महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाला काम दिल्यानंतर सदरहु मक्तेदार हा कोर्टात जाणार नाही. याची हमी कोण घेणार. याची हमी कोण घेईल किंवा सदरहु कन्सलटंन्टने लिखीत अंडरटेकींग दिलेले आहे का ? की मी विहीत मुदतीत काम करु शकलो नाही या कारणाने माझे कार्यादेश रद्द करण्यात यावे. उलटपक्षी

त्या मक्तेदाराने २५ लक्ष रुपयेचे बिल सुध्दा महानगरपालिकेच्या रेकॉर्डवरती पाठविण्यात आलेले आहे त्याच्याकडुन बिल आणि ते मनपाकडे स्विकार सुध्दा झालेला आहे. मला एक सांगा याच्या संदर्भातला आप्पा तुम्हाला एक छोटेसे उदाहरण सांगतो की, आपण हंजीर बायोटेकला, आपले हंजीर बायोटेक नाही, अंबिका बिल्डकॉमला ख्वाजामियॉच्या जागेच्या संदर्भातला एक बी.ओ.टी.बेसीस वरती प्रस्ताव दिलेला होता. प्रस्तावाच्या बाबतीत तक्रारी झाल्या,राज्य शासनाकडुन काही मार्गदर्शन सुचना आल्या. पुन्हा तो महासभेमध्ये धोरणात्मक निर्णयासाठी आला, महासभेने त्याच्यामध्ये धोरणात्मक निर्णय घेऊन तो प्रस्ताव नामंजुर केला, आज मक्तेदाराने महानगरपालिकेच्या विरुध्द ४२ कोटी रुपयाचा दावा दाखल करुन दिलेला आहे. त्याच्यामध्ये आर्बीट्रेशन डिसाईड झालेले आहे. त्याच्यासाठी खुप प्रयत्न केलेनंतरही हायकोर्टात सुध्दा आपल्याला अपयश पडले. आणि आर्बीट्रेटरची अपॉईंटमेंट होऊन पुढच्या दोन चार सहा महिन्यामध्ये आर्बीट्रेटरचा निवाडा येईल, मी तुम्हाला गॅरंटी देऊन सांगतो, त्याच्यामध्ये सुध्दा आर्बीटेटर महानगरपालिकेच्या विरोधात निकाल देईल. आणि साधारणता त्या ४२ कोटी रुपयापैकी नाही म्हटले तरी, १०-१५ कोटी रुपयाची लायबीलिटी ही जळगांव महानगरपालिकेवर येईल. कारण आपण म्हणतो, अनेक बाबतीत महानगरपालिका, कायदेशीर बाबतीत खुप कमकुवत आहे, आपली बाजु सक्षमपणे न्यायालयांमध्ये मांडली जात नाही. त्याची कारणे ही वेगवेगळी आहे. कारण आपल्या पॅनलवर असलेल्या वकीलांना आपण मानधन देतो १०,००० रुपये केसच्या प्रती, १५,००० रुपये केसच्या प्रती, आणि समोरची मंडळी जी असते ज्यांचा कोट्यावधी रुपयांचा स्टेक लागलेला असतो. ते दहा दहा लाख रुपये एक एका हेअरींगची फी देऊन तश्या पध्दतीचे वकील उभे करतात. आणि प्रत्येक निवाडा हा महानगरपालिकेच्या विरोधात जातो. आणि कोट्यावधी रुपयाच्या लायबीलिटीज या महानगरपालिकेवरती येत असतात. आणि कोर्टाच्या निर्णयाने त्या दाव्यांची महानगरपालिका बेअर करते. त्याचा आताचे उदाहरण देतो आप्पा, आता मागच्या महिन्यातच एक निवाडा झाला आहे. दि.२०/०९/२०२२ ला एक निवाडा झालेला आहे. आता एक महिन्यापुर्वी ईंडस्ट्रीयल कोर्टात सन २००५-०६ साली आपण कॉन्ट्रॅक्टर लेबर्स हायर करायचो, त्या कॉन्ट्रॅक्टर लेबर्सनी मिळुन त्यांच्या युनियनने लेबर कोर्टात दावा दाखल केला, आम्हाला नियमित कामगार म्हणुन ट्रिट करुन तसे पध्दतीचे वेतन आणि फायदे मिळावे. निवाडा किती कोटीचा झालेला आहे महानगरपालिकेच्या विरोधात. जरी या सभागृहात आपण ५ आणि १० लाख रुपयाच्या निधीसाठी भांडतो, ९६ कोटी रुपयाची ती डिकरी झालेली आहे किती, ९६ कोटी रुपयाची. कामगारांची,

**श्री.कैलास सोनवणे :-** म्हणजे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** महानगरपालिकेला देण्याच्या संदर्भातली,

**श्री.कैलास सोनवणे :-** एक तरफी डिसीजन झाले आहे का ?

**श्री.नितीन लढ्ढा :-** एकतर्फी नाही वकील होता ना आपले तिथे. वकील ही गेले ना. पण कोण वकील असतात कसे वकील असतात. कश्या पध्दतीने आपले ॲफेडेवीड करतात. कोणीतरी एखादा अधिकारी अपील दाखल करतो. पदाधिकाऱ्यांचा प्रश्न येत नाही. कारण ती सगळी प्रशासकीय बाब असते. कारण ॲफेडेवीडची सगळी प्रशासकीय बाबी असतात. Respondent to deposit the amount Rs.९६,६५,७७,६८०/- however the interest of justice it would be just lay and saficient to direct the respondent no.२. Deposit ५०% of said amount which comes to the Rs. ४८,३२, ८८,८४०/- which will be subject to outcome of the main complainant and its my answer. म्हणजे कोर्टाने ऑर्डर केलेली आहे. respondent corporation is directed to deposit an amount Rs. ४८,३२, ८८,८४०/- within the period of two months from the received of this order. म्हणजे हे आदेश आल्यापासुन दोन महिन्याच्या आत मध्ये Rs. ४८,३२, ८८,८४०/- हे जमा करण्याच्या संदर्भात कोर्टाने आदेश दिलेले आहे. आहे का या सभागृहातील कोणी सदस्याला कल्पना दिली की नाही ? ५० कोटी रुपयाची लायबीलिटी आहे. उद्या जाऊन आयुक्तांची खुर्ची अटॅचमेंटची ऑर्डर घेऊन येतील दोन महिन्यानंतर. याच्या संदर्भात आता तुम्ही उच्च न्यायालयात दाद मागाल. कोर्टही म्हणेल की तुम्ही काही रक्कम भरा. त्याच्यानंतर याचा विचार करु. ऑलरेडी या मॅटरच्या संदर्भात एक अवार्ड पुर्वी पारित झाला होता. तो पारित झाला असतांना त्या अवार्डच्या अगेन्स्ट मध्ये २०१७ ला हायकोर्टात गेलेले आपले पिटीशन पण हायकोर्टाच्या त्या पिटीशन मध्ये काय मुव्हमेट आहे किंवा काय नाही त्याच्याबद्दल सुध्दा कोणी माहिती घेत नाही. म्हणजे हायकोर्टात ऑलरेडी त्या अवार्डच्या अगेन्स्ट मध्ये पिटीशन फाईल आहे. म्हणजे उद्या ही ऑर्डर हायकोर्ट कनसिडर ही करणार नाही आपली.

मग अश्या पध्दतीने मला सांगा. आता जे गिरगावकर साहेबांनी सांगितले की, सदरहु मक्तेदार हा एम.जी.पी.च्या विरोधात कोर्टात जाणार नाही. कोण हमी घेईल याची. आज मला सांगा की, साधारणता मलनिस्सारण योजनेचा १०२२ कोटी रुपयांची वर्कऑर्डर आपण दिलेली आहे. आणि २२० कोटी समथिंग काही अमाऊंटचा कार्यादेश या निसर्ग कन्सलटंन्टला दिलेल्या आहे. त्या दिलेल्या रक्कम २.५% दराने म्हणजे त्याची कन्सलटेशन फी किती होते आप्पा साधारणता ३० कोटी रुपयाच्या जवळपास, आज समजा तुम्ही याला टर्मीनेट करुन टाकाल. जसा राजुभाऊंनी प्रस्ताव मांडला, पोकळे साहेबांनी अनुमोदन दिले, ठराव पारित झाला असे गृहीत धरुन घ्या.

**श्री.कैलास सोनवणे :-** चर्चा तर व्हायलाच पाहिजे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही आप्पा, उद्या हा कन्सलटंन्ट, याला दिलेला कार्यादेश हा दि.३१/१०/२०२२ पर्यंत अनुपादित आहे त्याच्यावरती, कार्यादेशाची मुदत अजुन जिवंत आहे. आणि त्याच्या कार्यादेशाची मुदत जिवंत असतांना त्याला आपण टर्मीनेट केले, उद्या तोच आधार घेऊन तो न्यायालयात जाईन की, मला दिलेल्या कार्यादेशाप्रमाणे मी काम करणेस तयार होतो. माझे सगळे काम त्याच्यावर झालेले आहे. परंतु महानगरपालिकेने कुठलीही माझी सुनावणी न घेता, कुठलीच मला संधी न देता, एकतर्फी टर्मीनेशन देऊन टाकले, आणि माझे जे काही आर्थिक नुकसान झालेले आहे. त्याच्या संदर्भात नुकसान भरपाई, डॅमेजचा दावा महानगरपालिकेच्या विरुध्द करेल. ज्या पध्दतीने २००५-०६ चे प्रकरण आहे. हे प्रकरण पुढच्या ५-१० वर्षानंतर निघेल. त्यावेळेला ही सभागृहातील सदस्य असतील, हे अधिकारी असतील नसतील. परंतु या ३० कोटीची लायबीलिटी ही भविष्यात या महानगरपालिकेवरती येण्याची शक्यता नाकारता येत नाही. ही वस्तुस्थिती आहे. याच्या संदर्भात काही खुलासा करायचा असेल तर निश्चित आपण याच्यावरती चर्चा करायला तयार आहोत. राहिले प्रश्न एम.जी.पी.चे. एम.जी.पी.ला देण्याच्या संदर्भात जी भुमिका आहे. ती ही जर बघितली, तीही काही इतकी समाधानकारक नाही. कारण अमृत १.० याची पी.एम.सी. ही एम.जी.पी.च आहे. आज जे काही संपुर्ण शहर जे भोगत आहे. ते निव्वळ त्या कन्सल्टंसीमुळे आहे. राज्य शासनाची एजन्सी आहे याच्यात दुमत नाही. परंतु इनकॅमपीटंट एजन्सी आहे. आणि हे स्वत: ती एजन्सी मान्य करते. आता पर्यंत झालेल्या प्रत्येक पत्र व्यवहारामध्ये आता मला सांगा, वाढीव पाणीपुरवठयाचे काम करणेच्या संदर्भात एम.जी.पी. पी.एम.सी. असतांना आपल्याकडे, या निसर्ग कन्सलटंन्टला का दिले. कारण त्यांच्याकडे मनुष्यबळ नाही. म्हणजे एकीकडे आपण म्हणतो की, विहित मुदतीत काम होणे गरजेचे आहे. आणि दुसरीकडे जी इनकॅमपीटंट एजन्सी आहे ती स्वत: म्हणते की, आमच्याकडे मनुष्यबळ नाही. आमच्याकडे बरेच अधिकारी हे निवृत्त झालेले आहे. म्हणुन त्यांनी १६ लोकांचा कन्सल्टेशनचा पॅनल उभा केलेला आहे. आणि आपण उलटया दिशेने प्रवाह करतो आहे की, जी गव्हर्नमेंटची एजन्सी म्हणते की, आम्ही काम करण्यात सक्षम नाही. आणि आपण ठराव करतो आहे की, आपण त्यांना काम सोपवा. याच्या संदर्भात आपण एम.जी.पी.कडुन काही कन्सल्ट लेटर घेतले का ? आम्ही within period मध्ये तुमचा, पुढच्या १० दिवसामध्ये, ८ दिवसामध्ये ज्या हेतुसाठी आपण हे खटाटोप करतो आहे की, दि.३१/१०/२०२२ पुर्वी हा डी.पी.आर. सबमीट व्हायला पाहिजे. परंतु तसेही काही बंधनकारक नाही की, दि.३१/१०/२०२२ पुर्वी सबमीशन व्हायला पाहिजे. वास्तविक बघितले तर दि.०८/०८/२०२२ रोजी महासभेने ज्यावेळेला सर्वानुमते पहिल्यांदा या धोरणाची ज्या वेळेला या महासभेला अवगत करण्यात आले, तात्काळ महासभेने सर्वानुमते निर्णय घेतला, परंतु त्या संदर्भात त्याच वेळेला निसर्ग कन्सलटन्सीने खुप काही समाधानकारक काम केलेले नव्हते, त्याला त्याच स्टेजवरती टर्मीनेट करता येऊ शकले असते, आणि त्याच वेळेला कधी एखाद्या सक्षम सल्लागाराची नेमणुक केली असती, कदाचित आपल्या या मुदतीमध्ये दि.३१/१०/२०२२ च्या आत मध्ये हा डी.पी.आर. सबमीशन सुध्दा झाला असता, तर याच्यातला सगळयात मोठा धोका जो आहे आप्पा. जोपर्यंत तुम्ही या निसर्ग कन्सलटंन्टला कायदेशीर रित्या, ही एजन्सी जी आहे ही तांत्रिक रित्या हा डी.पी.आर. मुदतीत तयार करु शकत नाही. प्रत्येक बाबतची त्याला सुनावणी देऊन कायदेशीर प्रक्रियेचा पुन्हा अवलंब करुन तुम्ही त्याला अश्या पध्दतीने ठराव करुन डायरेक्ट टर्मीनेट केले तर मी निश्चितपणे तुम्हाला खात्रीने सांगतो की, महापालिकेवरती कोट्यावधी रुपयाची लायबीलिटी आल्याशिवाय राहणार नाही.

**मा.उपमहापौर :-** ज्या महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाला आपण काम देण्याच्या बाबतीत गाठ घालतो आहे की, त्याच एम.जी.पी.ने तत्कालीन महापौर भारतीताई सोनवणे असतांना आपल्याला पत्र दिलेले आहे ऑलरेडी.

**श्री.कैलास सोनवणे :-** मला माहित आहे उपमहापौर साहेब. मला फक्त गिरगावकर साहेब, मला पुर्ण अभ्यास नाही या विषयाचा, परंतु बोलण्यातुन जे आले, भुमिका तर आपली पक्षाच्या बाजुनेच असणार आहे. परंतु चर्चा व्हायला पाहिजे आणि कोणी किती पैसे खाल्ले आहे. हा जो सगळा घाट चालला आहे ना, हा पैश्यांच्यासाठीच चालला आहे. हे

स्पष्ट आहे. कशाला आम्हाला मारणे घालता आहे सगळे नगरसेवकांना, आता मला ऐवढे सांगा पहिले तुम्ही निसर्गाला जे दिले तुम्ही कोणत्या ठरावाच्या आधारे दिले, स्टॅण्डींगच्या ठरावाच्या आधारे दिल का ?

**श्री.एम.जी.गिरगावकर,शहर अभियंता :-** स्टॅण्डींगच्या आधारे दिले.

**श्री.कैलास सोनवणे :-** किती तारखेला दिला स्टॅण्डीचा ठराव किती तारखेचा आहे. आणि यांनी सांगितलेला ऑक्टोबरचा ठराव किती तारखेचा आहे. ते सांगा मला, ह्या तीन गोष्टी सांगा मला, आपण काय वेडे बसलेले आहे का या ठिकाणी. ठराव स्टॅण्डींगचा २०१९ चा आहे का तो. आता आपला ठराव कोणता झाला होता. किती तारखेला झाला तुम्ही सांगितले ना.

**मा.महापौर :-** दि.०८/०८/२०२२

**श्री.कैलास सोनवणे :-** दि.०८/०८/२०२२ म्हणजे हे काय आहे. आपले किती दिवस बाकी आहे रिटायर व्हायचे.म्हणजे रिटायरमेंटला ५८ वर्ष लागतात ना. आपले वय किती सांगा. रिटायरमेंटची तारीख सांगा फक्त मला. माहितीसाठी, काय पाहता खाली वर माझ्या प्रश्नाच उत्तर देत नाही.

**श्री.एम.जी.गिरगावकर,शहर अभियंता :-** ठराव पाहतो आहे ठराव.

**मा.महापौर :-** स्थायीचा ठराव क्र. ११४ आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** ज्याचा आधार घेतला तुम्ही ते ठराव सांगा मला, तुम्ही माझ्या मोठया भावासारखे आहे. वडीलांसारखे तर नाही. कारण वयात जास्त अंतर नाही. मला रिटायरमेटची तारीख सांगा.

**श्री.एम.जी.गिरगावकर, शहर अभियंता :-** नाही नाही, तो महासभेचा ठराव जो आहे ना.

**श्री.कैलास सोनवणे :-** मला रिटायरमेंटची तारीख सांगा.

**श्री.एम.जी.गिरगावकर, शहर अभियंता :-** तारीख सांगतो तेच पाहतो आहे.

**श्री.सुनिल महाजन :-** आपले रिटायरमेटची तारीख सांगा.

**श्री.विष्णु भंगाळे :-** आपले रिटायरमेटची तारीख.

**श्री.कैलास सोनवणे :-** आपले रिटायरमेट केव्हा आहे. सेवा निवृत्ती, समजा मी ५३ वर्षाचा आहे, वय सांगायची गोष्ट नाही पण तुम्हाला सांगत आहे. तुमचे ५५ वर्ष धरु आपण ३ वर्ष तर बाकी असतील, तुम्हाला काय कमी बॉल मध्ये जास्ती रन काढायचे आहे का ?

**श्री.नितीन लढ्ढा :-** ८-९ महिने बाकी आहे आप्पा.

**श्री.कैलास सोनवणे :-** काय साहेब, तुमच्या बद्दल मी पहिल्या मिटींगमध्ये पण बोललो होतो. त्यानंतर तुम्ही मला क्लियरीफिकेशन दिले. मी तेव्हाही ठाम होतो मी आताही ठाम आहे. जे बोललो होतो ते मक्तेदारही येथे येऊन बोलले सभेत. ह्या ज्या गोष्टी चालु आहे ना साहेब, पहिलेच जळगांवकर फार त्रस्त झालेले आहे. कशाला त्यांना हैरान करतात. जाऊ द्या तुम्ही मला सांगा हे ठराव २०१९ ला झाला. तुम्ही त्या ठरावाचा आधार घेतला, तोच ठराव जर २०२२ ला झालेला आहे तर मागचा ठराव संपुष्टात येतो ना साहेब. तुम्ही तसे कसे करु शकतात मला सांगा. तुम्ही निसर्गाला दिला तेथे ही घोळ केलेला आहे. हे जे चालु आहे एम.जी.पी.चा विषय १००% त्याच्यात पण घोळ अशीन. आणि हे जे सांगत आहे टेन्डर काढायचे, १००% तेथे ही घोळ राहील. आम्हाला मारने का घालता आहे तुम्ही. आम्हालाही मारनी घालु नका आणि जळगांवकरांचाही भल करा. अस काही करा ना. ते शिव्या द्यायला लागले आहे नगरसेवकांना. सगळे जण शिव्या देत आहे नगरसेवकांना, पुर्ण जळगांव शहर देत आहे. सांगा आता ते, तुम्ही चुक केलेली की नाही निसर्गला देऊन. तुम्ही क्लियरीफिकेशन व्यवस्थीत द्या.

**श्री.एम.जी.गिरगावकर,शहर अभियंता :-** सन्मा.आप्पा साहेब जसे सांगत आहे. निसर्गला अपॉईंटमेंट देऊन मी कुठलीही चुक केलेली नाही. त्याला कारण असे आहे की, २०१९ मध्ये जे टेन्डर काढलेले होते. ते शासकीय कुठल्याही योजनेसाठी, कुठलेही नगरोत्थान योजनेसाठी असे कुठली योजनेसाठी त्याला पॅनल दिलेले होते. त्याच्यामध्ये तो प्रयास कन्सलटंन्ट एक आहे, निसर्ग कन्सलटंन्ट एक आहे. त्यात स्थानिक बर्वे कन्सलटंन्ट एक आहे. अजुन एक आहे. त्याचा उद्देशच हे असतो. ज्या वेळेस शासकीय योजना आली. त्याच्यातुन एकाला द्यायचे. त्याच्यापैकी जी तुम्हाला काय योजना राबवायची आहे. त्याचे स्वरुप काय आहे. त्याचा डी.पी.आर. तयार करुन मा.आयुक्त यांचे मान्यतेने ते देण्यात येते. याच्यामध्ये कुठलीही चुक किंवा दोष नाही.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौरताई, आता बरोबर आहे. तुम्ही हे आयुक्तांच्या मान्यतेने दिले ना. तुम्ही पाठविले ना आयुक्तांकडे. तुम्ही असे ढकलु शकत नाही की, त्यांचे मान्यतेने दिलेले आहे. तुमचा पण रोल आहे त्याच्यामध्ये. आता तुम्ही २०१९ च्या प्रमाणे दिले ना. तो जो २०२२ चा ठराव आहे. त्या ठरावाच्या नंतर केले असाल तुम्ही.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** त्यांनी काय केले, निसर्ग वाल्याला काम देऊन दिले. आणि दि.०८/०८/२०२२ रोजी महासभेपुढे आणले की, याला मंजुरी द्या.

**श्री.कैलास सोनवणे :-** तुम्हाला असे कसे काय अधिकार आहे. तुम्ही सभेची मंजुरी घेतली पाहिजे होती.

**मा.महापौर :-** आप्पा,

**मा.उपमहापौर :-** विशाल भाऊ, त्यांनी महासभेपुढे आणलेच नाही ते.

**मा.महापौर :-** आप्पा, दि.०८/०७/२०२२ ला यांनी निसर्गला वर्कऑर्डर दिली.आपला ठराव दि.०८/०८/२०२२ ला झाला. म्हणजे आपला ठराव नंतर झाला, त्यावेळेला त्यांनी आपल्या निदर्शनास आणणे गरजेचे होते की, याची वर्कऑर्डर दिली गेलेली आहे. कारण आपल्याला त्याबाबत काही अवगत नव्हते. अमृत १.० चे काम कसे झालेले आहे. त्याला सगळे नागरीक आणि नगरसेवक सफर झालेले आहे. काम काही त्यांचे व्यवस्थीत नव्हते, आपण पुन्हा त्याबाबत विचार केला असता.

**श्री.कैलास सोनवणे :-** जेव्हा तुम्ही दिली ही वर्कऑर्डर तर कोणत्या पदाधिकाऱ्याला बोलविले होते का?

**मा.उपमहापौर :-** आणि आप्पा साहेब याच्यात दुसरा विषय असा आहे की, नितीन भाऊंनी जो प्रश्न उपस्थित केला, आपण एम.जी.पी.ला द्यायचे म्हणतो आहे. निसर्ग कन्सल्टन्सीवाला कोर्टात जाईन त्यासाठी बाजु इतकी सेफ ठेवलेली आहे की, त्याला आज तागायत असा महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने कुठलेच पत्र दिले गेलेले नाही की, आपण डी.पी.आर.बनविण्याच्या संदर्भातले काम थांबवा म्हणुन त्याला आता पर्यंत असे कुठलेच पत्र नाही. त्याला कुठलेच पत्र न देता आपण जर परस्पर एम.जी.पी.ची नियुक्ती केली. तर तो कोर्टात जाणारच आहे. त्याच्या संदर्भातली जबाबदारी ठराव करणे पुरती महासभेवरती व प्रशासनावर येणारच आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** गिरगावकर साहेब, तुम्ही जे स्टॅण्डींगच्या ठरावाचा आधार घेऊन ज्यांना दिले निसर्ग वाल्यांना, तेव्हा काही नगरसेवक किंवा पदाधिकारी यांना बोलविले होते का प्रशासनाने. ऐवढे मोठे डिसीजन घेतांना बोलविले नाही पाहिजे का ?

**मा.उपमहापौर :-** म्हणजे आप्पा, आयुक्तांना पण माहित नव्हतं, दिल्यानंतर आलेले आहे हे त्यांच्याकडे.

**श्री.कैलास सोनवणे :-** म्हणजे आयुक्तांच्या सहीने नाही डायरेक्ट यांच्या सहीने आहे का ?

**मा.उपमहापौर :-** म्हणजे आयुक्त मॅडमांना ही नंतर माहित पडले, आयुक्तांची मान्यता नंतरची आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** थांब ना मला उत्तर तर घेऊ, आपली भुमिका पक्षाच्या बाजुने आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** मला एक म्हणायचे आहे. अमृत २.० योजनेची जी आता आपण चर्चा करतो आहे. याचा पहिला जी.आर.केव्हा आला, तुम्हाला डी.पी.आर. सबमीट करायचे आहे, जानेवारीत आलेला आहे.

**मा.उपमहापौर :-** नाही, १४ जुलैला परिपत्रक आले, १६ सप्टेंबरला बी.एम.सी.च्या सगळया सुचना जाहिर झाल्यात.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** यांनी त्या दिवशी जे सांगितले,

**मा.उपमहापौर :-** नाही चुकीचे आहे ते.

**श्री.कैलास सोनवणे :-** तुम्ही बोलविले होते का कोणाला? प्रशासनाने बोलविले होते का प्रमुख पदाधिकारी, सिनियर नगरसेवक, गटनेते यांना कोणाला बोलविले होते का ? सांगितले का कोणाला ?

**श्री.एम.जी.गिरगावकर,शहर अभियंता :-** मी १६ जुलैला रुजु झालो. तर त्यावेळेचा अस्तित्वात असलेला पॅनल हा होता. त्यानंतर चार दिवसात दुसरी जी व्ही.सी. झाली. त्याच्यामध्ये सांगितले की, तातडीने डी.पी.आर करायचे आहे.

**मा.उपमहापौर :-** साहेब, तुम्ही चुकीचे सांगत आहे, १४ जुलैला जी.आर.झाला त्याच्या अगोदर दि.०८/०६/२०२२ ला व्हि.सी.झालेली आहे.

**श्री.एम.जी.गिरगावकर, अति.आयुक्त तथा शहर अभियंता :-** माझे ऐकुन तर घ्या. मी बसुन जातो.

**मा.उपमहापौर :-** तुम्ही चुकीची माहिती नका द्या महासभेला, नाही पण ते चुकीची माहिती देत आहे ना.

**मा.आयुक्त :-** त्यांना बोलु द्या तुम्ही नंतर बोला,

**मा.उपमहापौर :-** बरं ठिक आहे.

**मा.महापौर :-** बोला साहेब,

**श्री.एम.जी.गिरगावकर,शहर अभियंता :-** मी आल्यानंतर माहिती घेतली व्ही.सी.झाली, त्याच्यामध्ये कन्सलटंन्ट अपॉईट करुन, कन्सलटंन्ट अपॉईंट करा किंवा स्वत: इनहाऊस करा. तर त्या वेळेस जे होते कनिष्ठ अभियंता,प्रकल्प, श्री.योगेश बोरोले, त्यांना मी बोलवले की, याच्या बाबतीत धोरण काय ? आम्ही यापुर्वी जे डी.पी.डी.सी.चे कामे केलेले आहे. तर त्याला अनुसरुन आम्ही त्याची नियुक्ती करतो त्यावेळेस त्याचे पुर्ण अधिकार हे आयुक्तांना दिलेले असतात. किंवा आवश्यकतेनुसार आयुक्तांनी निर्णय घ्यावा. यापुर्वी अनेक महापालिकांनी, मी

**श्री.कैलास सोनवणे :-** मी बोलत नाही, तुम्ही बोला. मी ऐकतो आहे.

**श्री.एम.जी.गिरगावकर, शहर अभियंता :-** मी, त्यावेळेस पहिली महासभा जेव्हा होती ती अटेंड केली आणि योगायोगाने मी माझी मुलगी आजारी असल्यामुळे हजर नव्हतो, महासभेला ठराव आला, तो ठराव हा होता की, अमृत योजनेचा शासनाचा जे परिपत्रक आहे त्याची अमंलबजावणी करण्याला अवगत करण्यासाठी तो आलेला आहे. वास्तविक तुम्ही आणि आप्पांनी जो मुद्दा उपस्थित केला नितिनभाऊ लढ्ढांनी की, पहिल्या महासभेमध्ये हा मुद्दा का अवगत करुन दिला नाही. निसर्ग कन्सटंन्टला अपॉईंट केलेले आहे. त्या वेळेस कनिष्ठ अभियंता, प्रकल्प श्री.योगेश बोरोले यांच कर्तव्य होत की, महासभेला अवगत करणे की, या ठिकाणी निसर्ग कन्सलटंन्ट यांची अपॉईंटमेंट केलेली आहे. हे निदर्शनास आणुन देणे त्यावेळेस गरजेचे होते. आता जो पुढचा मुद्दा आहे की, तो कोर्टात जाईल हा.

**श्री.कैलास सोनवणे :-** माझा मुद्दा तो नाही. यांना कोणाला बोलविले का ? विरोधी पक्षनेता, महापौर, उपमहापौर, सभागृहनेता, गटनेते, एम.आय.एम.गटनेता, भा.ज.पा. गटनेता, आपले शिंदे गटातील गटनेता, आपले शिवसेनेचे गटनेता, यांना कोणाला बोलविले का ?

**मा.उपमहापौर :-** आप्पा साहेब, हे जे आता बोलले ना, हे स्थायी समितीच्या ठरावाच्या आधारे केलेला होता. पण त्या स्थायी समितीच्या वर महासभा आहे ना. महासभेत जर तो ठराव झाला, तर मागचा ठराव रद्द झाला.

**श्री.कैलास सोनवणे :-** सर्वोच्च महासभा आहे, मला फक्त ऐवढेच सांगा, तुम्ही यांना कोणाला बोलविले का ऐवढे मोठे डिसीजन घेतांना,

**श्री.एम.जी.गिरगावकर,शहर अभियंता :-** त्यावेळेस मी नविन होतो तर ऐकुन घ्या, प्रचलित पध्दतीने मा.आयुक्तांशी चर्चा करुन ते केलेले आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** तुम्ही नविन आहात का, तुम्ही ५७ वर्षाचे आहे तुम्ही नविन आहात का ?

**श्री.एम.जी.गिरगावकर,शहर अभियंता :-** या महापालिकेत नविन होतो.

**श्री.कैलास सोनवणे :-** कसली महापालिका, सगळया महापालिका सारख्याच आहे तुम्हाला, नविन कसे काय तुम्ही आज लागले का ?

**श्री.एम.जी.गिरगावकर,शहर अभियंता :-** तर सगळया महापालिकेनुसारच कार्यवाही केली ना आप्पा,

**श्री.कैलास सोनवणे :-** मी काय सांगतो, यांना कोणाला बोलविले का तुम्ही.

**श्री.एम.जी.गिरगावकर,शहर अभियंता :-** मी आयुक्तांना बोललो की, आवश्यकता असेल तर आयुक्तांनी ठरवावे.

**श्री.कैलास सोनवणे :-** आम्हाला कोणाला बोलविले का नाही. तुम्ही ऐवढेच सांगा ना.

**श्री.सुनिल खडके :-** आयुक्तांना विश्वासात घेतले होते का ?

**श्री.एम.जी.गिरगावकर,शहर अभियंता :-** आयुक्तांना ही माहिती होती हा विषय.

**श्री.सुनिल खडके :-** विश्वासात घेतले होते का तुम्हाला.

**श्री.एम.जी.गिरगावकर,शहर अभियंता :-** आयुक्तांशी चर्चा ही केलेली सही घेतांना. त्यानंतर त्यांनी सही केलेली आहे. त्यांना आवश्यकता भासली तर ते बोलवतील.

**श्री.कैलास सोनवणे :-** दुसरा मुद्दा हा जे नितीनभाऊं बोलले की, ३१ ऑक्टोबर पर्यंत मागच्या ठेकेदाराची मुदत आहे. त्याच्या अगोदर आपण हे रद्द नाही करु शकत. ३१ ऑक्टोबरपर्यंत मुदत आहे ना. तो पण कोर्टात जाऊ शकतो. तुम्ही आता सांगितले की, याला दिले तर तो कोर्टात जाईल, त्याला दिले तर हा कोर्टात जाईल. आता जर आपल्याला करायचे आहे तर दि.३१ ऑक्टोबर पर्यंत थांबायला पाहिजे आपण. थांबणे गरजेचे आहे. मग त्याला कोर्टात जाता येणार नाही ना त्याला. बरोबर आहे का विशालभाऊ.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** ३१ ऑक्टोबर डी.पी.आर. सबमीट करणे गरजेचे आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** आता दोघी तारखा एकच आहे.

**मा.उपमहापौर :-** आणि आप्पा साहेब, त्याला आपण कार्यादेश दिलेले आहे डी.पी.आर. बनविण्याच्या संदर्भामध्ये दि.०८/०७/२०२२ ला, त्यानी आपल्या पाणी पुरवठाच्या जे.ई.सोबत पाहणी केली दि.०५/०८/२०२२ ला, त्याच्यानंतर सन्मा.शहर अभियंतांसोबत पाहणी केली, दि.२२/०८/२०२२ ला आणि २२० कोटी रुपयाचा डी.पी.आर. त्यानी सादर केला दि.२९/०८/२०२२ ला, २२० कोटी रुपयाचा डी.पी.आर. आठ दिवसांमध्ये, कोणती यंत्रणा आहे त्यांच्याकडे अशी, २२० कोटी रुपयाचा डी.पी.आर. आठ दिवसात,

**श्री.कैलास सोनवणे** :- आपले ईस्टीमेट होत नाही. १०० कोटीतले लवकर, आपल्या इंजिनिअर आणि त्यांचेपेक्षा चांगले आहे,

**श्री.नितीन लढ्ढा :-** आठ दिवसात कसे होईल, म्हणजे २२० कोटीचा डी.पी.आर. बनवुन सबमीट ही केले,

**श्री.सुनिल खडके :-** जबाबदारी निश्चित करुन टाका ना.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौरताई, हे पहा, नितीनभाऊ, साहेब, घरकुलच्या याच्यामध्ये ४० दिवस जाऊन आलेले होते. प्रॅब्लेम आला होता तर, पण तेव्हा मी होतो, आणि मी नशिबवान आहे समजा, माझी मिसेस नव्हती, पण आता ती आहे, अशी काही गडबड नका करु नाही तर मला फार त्रास होईल.

**मा.महापौर :-** आप्पा,

**श्री.कैलास सोनवणे :-** बरोबर आहे ना ताई, सांगायचे सुनिलभाऊंनी. तुम्हाला जर तसा प्रसंग आला तर, त्यांचे हाल काय होतील, नितीनभाऊंचे हाल काय झाले विचारा, त्यांची मिसेस होती. हा आमचा मुलगा बसला आहे येथे, आमची वहिणी होती. हे लता काकु येथे बसलेल्या आहे, विचारा, परत असा प्रसंग यायला नाही पाहिजे आमच्यावर, आम्हाला काय ? आमच्या पक्षाचे ठरलेले आहे, प्रशासनाच्या बाजुने राहायचे. परंतु ही चर्चा व्हायला पाहिजे.

**मा.उपमहापौर :-** त्याला पत्र देऊन केले तर तो कोर्टात जाणार नाही, ऑनलाईन केले तर तो कोर्टात जाईन. आता पर्यंत आपण आपल्या रेकॉर्डवर त्याला अस कुठलच पत्र दिलेल नाही सप्टेंबर महिन्यापर्यंत की, तुम्ही काम थांबवा डी.पी.आर. करण्यासंदर्भात, मक्तेदाराला काम दिले हे कशा वरुन.

**श्री.एम.जी.गिरगावकर, शहर अभियंता :-** आप्पा,

**श्री.कैलास सोनवणे :-** नाही कसे आहे साहेब, जे इंजिनिअर असता ना, याच सभागृहामध्ये गेडाम साहेब पण होते आम्ही पण होतो, आणि अपोझीटला रमेशदादा वगैरे होते. आणि त्यांनी जे मांडले होते, मी गेडाम साहेबांबद्दल बोललो होतो की, असे जे साहेब असतात ते आपला कवच असतात. त्यांनी आपल्याला सांभाळायला पाहिजे. आपल्याला पुढे काही व्हायला नाही पाहिजे. आपल्याला विश्वासात घेतले का त्यांनी. म्हणुन सांगतो, आम्हाला काही होता कामा नये.

**श्री.एम.जी.गिरगावकर,शहर अभियंता :-** आप्पा त्याच्यामुळेच म्हणतो आहे, (यावेळी आवाज स्पष्ट ऐकु येत नाही) याच्यामध्ये खालती जरी काही चुक झाली, असीस्टंट डेप्युटी इंजिनिअर, डेप्युटी इंजिनिअर त्यांची तर ते शेवटी इंजिनिअर हे पुर्ण काम पाहता,

**श्री.कैलास सोनवणे :-** हे जाऊ द्या, हे पण शासन आहे, ते पण शासन आहे. वरती पण शासन आहे, पण या जळगांवामध्ये काय गुप्ता कमी आहे, शिवराम पाटील कमी आहे, तो विनयभाऊ कमी आहे. गंज लोकं आहे या जळगांव शहरामध्ये ते जातील ना.

**श्री.एम.जी.गिरगावकर,शहर अभियंता :-** जाऊ द्या त्यांना कोर्टात.

**श्री.कैलास सोनवणे :-** अरे काय जाऊ द्या, काय माणुस आहे.

**श्री.एम.जी.गिरगावकर, शहर अभियंता :-** (सभागृहात निर्माण झालेल्या गांधळामुळे आवाज समजले नाही.) तांत्रिक सल्लागार जेव्हा तांत्रिक दृष्टया काही झाले असेल, किंवा काय झाले, रेकॉर्ड जर पावरफुल असेल तर कुठल्याही प्रकारचा लुपहोल राहणार नाही.

**श्री.कैलास सोनवणे :-** एम.जी.पी.चा आम्हाला चांगला अनुभव आहे. आता बोलले ना उपमहापौर साहेब, सौ.भारती सोनवणे महापौर असतांना,

**मा.उपमहापौर :-** त्या वेळेच सांगितले आहे की, त्यांच्या बाबतीत तांत्रिक सल्लागार नेमा,

**श्री.कैलास सोनवणे :-**हे मला माहिती आहे, प्रत्येक्ष पत्र देऊन आम्ही अनुभवलेले पण आहे. काही कामाची नाही जळगांव एम.जी.पी., काही कामाची नाही. प्रत्येक्षात दोन ते तीनच माणसे आहे तेथे फक्त.

**श्री.एम.जी.गिरगावकर, अति.आयुक्त तथा शहर अभियंता :-** असे म्हणता येणार नाही. पालकमंत्र्यांशी आयुक्तांनी चर्चा केलेली आहे, आवश्यकता भासली तर एखादा इंजिनिअर मागवु शकतात.

**श्री.कैलास सोनवणे :-** अहो एक मिनीट ऐका, अमृतचा जे काम चालु आहे ना, तेथे एकही इंजिनिअर किंवा सुपरवाईझर नाही. एकाही ठिकाणी नाही, एक सिंगल ठिकाणी नाही. निकम साहेबांच मला उत्तर होता की, आमच्याकडे माणसे नाही, मनुष्यबळ नाही.

**श्री.एम.जी.गिरगावकर,शहर अभियंता :-** (यावेळी आवाज स्पष्ट ऐकु येत नाही) मी एम.जी.पी.चाच आहे ना, मला शासनाने का पाठविले, (यावेळी आवाज स्पष्ट ऐकु येत नाही)

**मा.उपमहापौर** :- अहो, एम.जी.पी.ने पत्रात स्पष्ट शब्दात म्हटलेले आहे. आमच्याकडे पुरेसे मनुष्यबळ नाही.

**श्री.कैलास सोनवणे :-** साहेबांनी ठरविलेले आहे. मला ते करायचेच आहे. ते करणारच. तुम्ही आम्ही कोण आहे ठराव करणारे. त्यांनी ठरविलेले आहे, ते करायचेच आहे त्यांना. बिल्कुल साहेब, बिल्कुल,

**श्री.विशाल त्रिपाठी :-** या सभागृहामध्ये सदस्यांच्या भावना असतात साहेब की, निसर्ग वाल्याला द्यायला किंवा कोणतीही एजन्सीला द्यायला या सभागृहाचा शहराच्या विकास कामांसाठी किंवा जर शासन आपल्याला पाहिजे तितका निधी द्यायला तयार आहे, आपलीच झोळी फाटकी नको. १००० कोटीचा डी.पी.आर.दिला तर १००० करणार आहे ते. ५०० देतील, ७०० देतील, २२० चा असेल तर २२० देतील, ते द्यायला बसलेले आहे, पण आपले निर्णय पेन्डींग असल्यामुळे आपण घेऊ शकत नाही. जर हा विषय निसर्ग वाल्याला द्यायचा सभागृहाच्या निदर्शनास आणला असता नुसता, नुसता निदर्शनास की, असा असा शासनाचा जी.आर.आलेला आहे, अमृत २.० चा द्यायचा आहे, हे आपल्या पॅनलवरती आहे, याचा ठराव झालेला आहे आणि निसर्ग वाल्याला जर दिले आपण तर आपला डी.पी.आर. लवकर तयार होईल. आपल्याकडे वेळ नाही, मुदतीच्या आत करायचे आहे. परंतु या एका चुकीमुळे आज हा सगळा जो गोंधळ चालु आहे. एक निदर्शनास आणले जसे आपण संविदा पाठवितो, संविदा झालेली असते, पण निदर्शनास आणतो आपण सभागृहाच्या की, अशी अशी संविदा केलेली आहे. तर आता निसर्गवाल्याला दिले, त्याच्यावरती आपण ८ तारखेला महासभा प्रस्ताव देऊन प्रशासनानेच बोलविलेली आहे. आणि तेथे तो सगळा गोंधळ या विषयाचा झाला, मग सभागृहाने त्या वेळेला सांगितले की, नविन निविदा काढा, नविन निविदा काढा त्याच्यावरती ही प्रोसेस झाली नाही. म्हणजे मी मागच्या महासभेमध्ये ही हा विषय बोललो होतो. मग त्या महासभेत असे ठरले की, आपण सर्वपक्षीय गटनेते आणि सर्वपक्षीय बैठक महापौरांच्या दालनात घ्यायची आहे. त्या प्रमाणे आपण सर्वपक्षीय गटनेत्यांची एक बैठक बोलवली. महापौरताई होत्या, उपमहापौर होते. सुनिलभाऊ होते, आपले शहराचे आमदार श्री.राजुमामा भोळे सुध्दा होते. मी होतो शुचिताताई हाडा होत्या. सगळे होते. त्यावेळेस जर तुम्ही सांगितले असते की, हे १६ लोकांचे पॅनल आहे, याच्यापैकी एकाला द्या,शुचिता हाडा मॅडमांनी त्या दिवशी पण हाच विषय मांडला की, निसर्ग कन्सल्टन्सी आपल्या नियमानुसार बसत नाही. शासनाच्या जी.आर.नुसार म्हणजे परत अडचणीचाच विषय झाला व त्या मिटींगमध्ये चर्चा झाल्यावरती, सर्वपक्षीय गटनेत्यांच्या बैठकीत याच्यावरती चर्चा बरीच झाली आणि त्याच दिवशी महापौर साहेबांनी तातडीने महासभा काढण्याचे आदेश दिले. प्रशासनाचा प्रस्ताव आला आता परत प्रशासनाचाच प्रस्ताव आलेला आहे. कोणी नगरसेवकांनी आणलेला असा विषय नाही. आता माझी स्पष्ट भुमिका आहे की, राजुमामांनी जेव्हा सर्वपक्षीय गटनेत्यांची बैठक झाली. त्यावेळेस त्यांनी सांगितले की, श्री.गुलाबभाऊ पाटील, जे आपले जिल्ह्याचे पालकमंत्री आहे. त्यांच्या अंडर हे पाणी पुरवठ्याच खात आहे. एम.जी.पी.पण त्यांच्याच अंडरमध्ये काम करते. श्री.गिरीषभाऊंशी पण चर्चा झाली. ते ही आपले नेते आहे, या जिल्ह्याचे आहे, मंत्री आहेत, वजनदार मंत्री आहे दोघीही पक्षामध्ये, त्यांच्याशी चर्चा झाली आणि त्या चर्चेच्या अनुषंगाने असे त्या सर्वपक्षीय गटनेत्यांची बैठकीमध्ये ठरले की, हे काम एम.जी.पी.ला देण्यात याव. त्यावेळेस नितीनभाऊ नव्हते, बाहेरगांवी होते. बंटीभाऊ पण आलेले नव्हते मी सुनिलभाऊंना पण विचारले, तर अश्या परिस्थितीमध्ये ती महासभा निघाली. ही महासभा आता जेव्हा ढकललेली आहे. आपल्याकडे टाईम बॅण्ड आहे. नितीनभाऊ बोलले की, कोणावरती काही हे नाही की, हा काम करेलच, नाही करेलच, तर माझे मत या सभागृहापुढे आहे की, एम.जी.पी.शासन एजन्सी आहे. गुलाबभाऊंनी शब्द दिलेला आहे की, एम.जी.पी.कडे माणसे नाही, यांनी जे पत्र वाचले ते भारतीताई महापौर होते तेव्हाच होत. आता परवा चार दिवसापुर्वी श्री.गुलाबभाऊंशी चर्चा आपले शहराचे आमदार श्री.राजुमामांनी केली. श्री.गिरीषभाऊंशीही केली त्यांच्याशीही केली. आणि श्री.गुलाबभाऊंनी सांगितलेले आहे, शब्द दिलेले आहे की, या डी.पी.आर.साठी माणसे लागतील तेवढे मी द्यायला तयार आहे. तुम्ही फक्त ठराव करुन माझ्याकडे पाठवा एम.जी.पी.ला. आम्ही डी.पी.आर. तयार करुन देऊ. जर आपल्या नेत्यांनी आपल्याला आश्वासन दिलेल आहे. तर आपण हा विषय केला पाहिजे.

**मा.उपमहापौर :-** विशालभाऊ.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** सभागृहाला विनंती आहे,

**मा.उपमहापौर :-** विशाल भाऊ, मा.महापौरांना एक पत्र दिलेले आहे. पुन्हा एक आर.एम.डी.ने पत्र दिलेले आहे. एक वेळेस नाही दिलेले आहे दोन वेळा पत्र दिलेले आहे आर.एम.डी. आपल्याला.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** हो त्यांनी केव्हा पत्र दिले, हा चार दिवसापुर्वीचा विषय सांगत आहे मी, तो एप्रिल महिन्याचा विषय आहे. चार दिवसापुर्वी झालेला विषय सांगतो आहे मी. आमची पार्टी मिटींग झाली. पार्टी मिटींगमध्ये तेथे आमची बरीच चर्चा झाली. जशी येथे करतो आपण, आम्ही सगळयांना विश्वासात, सगळेच पक्षाचे लोकं पण, सगळयांशी चर्चा करुन मग मामांनी तेथुनच फोन लावला, आणि महापौर दालनात झालेल्या बैठकीत स्वत: राजु मामांनी शब्द दिलेला आहे की, याच्यासाठी जर काही चुका झाल्या असतील, त्रुटया राहिल्या असतील. किंवा जे काही असेल मी स्वत: पाठपुरावा करणार आहे. मी स्वत: याच्यात लक्ष घालणार आहे. आणि शासनाकडे जे जे लागेल ते

मी पुर्ण करणार आहे. हे झाला हा विषय, आता नितीनभाऊंनी जो विषय या ठिकाणी मांडला की, निसर्ग कन्सल्टन्सी न्यायालयात जाण्याचा विषय, तर माझे असे मत आहे नितीनभाऊ या सभागृहापुढे, जर प्रशासनाने परस्पर हा कार्यक्रम केलेला आहे किंवा त्याला वर्कऑर्डर दिलेली आहे. तर आपण का भुगतायचे त्याचे फळं, ठराव करा, जर त्याची लायबीलीटी निघाली तर ज्यांनी ही वर्कऑर्डर दिलेली आहे, ज्यांनी ही प्रक्रिया राबविलेली आहे किंवा सभागृहाच्या निदर्शनात न आणता परस्पर त्यांनी दिलेले आहे. त्यांच्या कडुन वसुल करण्यात यावे. करु शकतो आपण ठराव, ठरावामध्ये त्याचा उल्लेख करु शकतो आपण. पण आता हा ही सगळी चर्चा जर आपल्याला ३१ तारखेची मुदत नसती, तर आपण चार महिने सहा महिने आपल्याला माहिती असतं, त्या दिवशी पार्टी मिटींग मध्ये सर्व गटनेत्यांनी सांगितले होते की, अमृत २.० चा जानेवारी महिन्यात जी.आर.आला असे तुम्ही तेथे बोलले. म्हणुन मी तो क्लिअर केला, जर जानेवारी पासुन शासन आपल्याला निधी द्यायला बसल आहे. तर हा विषय ऑगस्ट महिन्यात कसा येतो. ८ ऑगस्टला तो विषय आपल्यापुढे कसा काय येतो. इतके पाच पाच सहा सहा महिने ठराव करायला, जेथे आपल्या महापालिकेकडे पैसे नाही. नितीनभाऊ बोलले की, आपण ५-५ १०-१० लाख रुपयाच्या मनपा निधीसाठी आपण हे करतो. आणि आपण या गोष्टींसाठी जर इतके तत्परतेने, बाकीच्या गोष्टी तत्परतेने होतात. त्याची वर्कऑर्डर तत्परतेने दिली गेली. मग जानेवारी पासुन आलेला प्रस्ताव महासभेपुढे का आला नाही. याच्यावर सुध्दा आपण चर्चा केली पाहिजे. यांच्या चौकश्या, काही तरी दोन चार लोकांना आपण अधिकाऱ्यांना आपण दर वेळेस सर्व सभागृह येऊन जाऊन प्रशासनावर टार्गेट करतो ना. पण दोन चार जणांना पनीशमेंट तर देऊन टाका. म्हणजे हे गाडा तर सुरळीत चालेल शहराचा. येथे सगळे सदस्य जिव तोडुन बोलतात. सगळे पोटतिडकीने बोलतात. बेंबी पासुन बोलतात. आप्पा बोलतात, सर्व सन्मा.सदस्य आहे. छोटे इस्टीमेट तयार होत नाही, वर्कऑर्डर दिली जात नाही. या सगळया गोष्टींची लायबिलीटी आपण फिक्स केली पाहिजे.

**मा.उपमहापौर :-** विशालभाऊ.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** जानेवारी पासुन कोण होत.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** जे कोणी असेल, माझे ते म्हणणे नाही. जानेवारीला जर शासनाचा आदेश आलेला आहे जी.आर.चा. आपली महापालिका, आपण जानेवारी पासुन तर सभागृहाच्या पुढे ऑगस्ट महिन्यात येतो तो विषय. प्रत्येक शासनाचा आलेला जी.आर.सभागृहापुढे ठेवले पाहिजे. माझे तर असे मत आहे. प्रत्येक मग तो गटार साफ करायचा असेल किंवा एम.जी.पी.चा असेल, शासनाचा आलेला जी.आर. येथे समोर, पहिली बात तर शासनाचा आलेला जी.आर.यांनाच समजत नाही की, आलेला आहे झालेला आहे. एखादा नगरसेवक आणतो एखादा आदेश किंवा एखादा जी.आर. की, असे असे शासनाने म्हटलेले आहे काय करता.

**मा.उपमहापौर :-** शासनाने प्रती पाठवितांना म्हटलेल असत ना आयुक्त.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** माहिती नसतं, वास्तवीक हे जी.आर. वेबसाईटवरती डाऊनलोड होतात. आपल्या एक माणसाला त्याच्यावरती बसुन द्या. महापालिकेच्या संदर्भात शासनाने काही जी.आर. काढलेले आहे का ? त्याची एक प्रत काढुन सभागृहापुढे ठेवा ना. माहिती पडु द्या सभागृहाला,

**मा.उपमहापौर :-** भाऊ याच्यामध्ये काय झालेले आहे. जसे भाऊंनी सांगितले की, आमदार महोदय पोटतिडकीने त्या ठिकाणी विषय मांडला, नितीनभाऊंनी मांडला,महापौरताई होत्या, सगळेच होते.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** सगळेच होते.

**मा.उपमहापौर :-** आपले सर्वांचे मत एकच आहे की, अमृत योजना २.० च काम झाल पाहिजे म्हणुन आपण सर्व प्रयत्न करत आहे. परंतु अश्या परिस्थितीमध्ये जो आता नितीनभाऊंनी प्रश्न उपस्थित केला, आपल्याला काम कोणाला द्यायचा आहे हा दुय्यम विषय आहे. तुम्हाला माहिती आहे का ? जसे नितीनभाऊंनी सांगितले, त्यानी सर्व पत्र पाठविलेले आहे. एक पत्र इंग्रजीमध्ये दिलेल आहे. मी तुम्हाला वाचुन दाखवितो.we have come to know through various newspapers that some discussions are going on about project report submitted by us. Which may lead to adverse discision against our report. म्हणुन त्यानी म्हटलेले आहे की, further it will be against the ethics of contract and may violent of the provision of Indian contractor act. म्हटलेलेच आहे त्यानी की, मी जाणारच आहे कोर्टात म्हणुन. त्यानी पत्र दिलेल आहे आपल्याला.

**श्री.नितीन लढ्ढा :-** या प्रकारे या निसर्गवाल्याला भविष्यात कोर्टात जायला हा प्रस्ताव मान्य करुन त्याला मार्ग खुला करुन द्यायचा आहे. आणि १००% मी म्हणतो या प्रमाणे ३० कोटी रुपयाची लायबिलीटी महानगरपालिकेवर आणेल.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** नितीनभाऊ, मग तुमच म्हणण मान्य आहे, निसर्गवाल्याला काम द्यायच का ? मग दि.०८/०८/२०२२ ला झालेल्या ठरावाच काय करायच.

**श्री.नितीन लढ्ढा :-** त्या ठरावाची कोणती अंमलबजावणी केलेली आहे प्रशासनाने. दि.०८/०८/२०२२ च्या तुमच्या ठरावाला प्रशासनाने केराची टोपलीत टाकलेले आहे. त्याच जर गांभिर्य राहिले असते तर दि.०८/०८/२०२२ ला घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी केली असती. त्या वेळेला निसर्ग वाल्याचे काम सुरु सुध्दा झालेले नव्हते. म्हणजे महानगरपालिकेतील सभागृहाच्या धोरणाला प्रशासन कश्या पध्दतीने किंमत देतो आहे. हे सभागृहालाही समजुन जायला पाहिजे. आणि हा कायदेशीर मार्ग त्याला निसर्ग वाल्याला खुला करुन देण्याचा हा खटाटोप आहे. हा माझा स्पष्ट आरोप आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** नाही, बरोबर आहे तुमचे म्हणणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आणि १००% ही लायबिलीटी महापालिकेवर येणार येणार येणार. म्हणजे आज येथे शुचिताताई हाडा नाही. अजुन कोणी लॉ केलेले असेल ते पोकळे साहेब आहे. पोकळे साहेबांनी ही लॉ केलेला आहे. त्यांनी त्यांचा अभिप्राय येथे मांडावा.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** ठिक आहे ना. तुम्ही जे म्हणत आहे ते मान्य आहे मला, ती लायबिलीटी येणार आहे. म्हणुनच मी आधी बोललो, ती जर लायबिलीटी येणार असेल तर ती प्रशासनावर ढकला,

**श्री.कैलास सोनवणे :-** त्याचे मतदान असले पाहिजे, त्याच्यावर मतदान असले पाहिजे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** पण लायबिलीटी कोण ठरवेल त्याची. माझा मुद्दा लक्षात घ्या,

**मा.उपमहापौर :-** विशालभाऊ,

**श्री.विशाल त्रिपाठी :-** एक मिनीट मला बोलु द्या की, तुम्ही म्हणत आहात की, आज लायबिलीटीचा विषय आहे. मग आता सर्व सभागृहाने ठराव केलेला आहे निविदा काढण्याचा. तेव्हा नाही कळाले का ? याचे उत्तर द्यावे. दि.०८/०८/२०२२ चो जो ठराव केलेला आहे.

**मा.उपमहापौर :-** एक मिनीट, मी सांगतो, याच्यामध्ये आपण त्याला, निसर्ग कन्सल्टन्सीला काम दिल्यानंतर त्याची लायबिलीटी का फिक्स नाही होणार. आपण त्याला दि.०८/०६/२०२२ च पत्र दिलेले आहे भाऊ. त्याच्यामध्ये आपण त्याला पत्र देत असतांना त्याच्यामध्ये स्पष्ट नमुद केलेले आहे. योजनाशी संबंधीत मार्गदर्शक सुचनांची अंमलबजावणी करुन दि.३१/१०/२०२२ पुर्वी Detail Project Report सादर करावा. मग मला सांगा येथे अटीशर्तीच पालन कुठे होत आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** मग आज कसे झाले ते.

**मा.उपमहापौर** :- आज तेच देतो आहे ना आपण,

**श्री.विशाल त्रिपाठी :-** तेव्हा प्रस्ताव कोणाचा होता.

**मा.उपमहापौर :-** प्रशासनाचा.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** आज प्रस्ताव कोणाचा आहे.

**मा.उपमहापौर :-** प्रशासनाचा.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** मी हेच सांगतो आहे. मी हेच सांगतो आहे.

**मा.उपमहापौर :-** प्रशासनाने प्रस्ताव पाठविलेला आहे. ठरवायच आपल्याला आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** मग मला सांगा.

**मा.उपमहापौर :-** मग याची कोणी शास्वती घेत नाही. एम.जी.पी.ला द्या दि.३१ ऑक्टोबर पुर्वी आपल्याला. शासनाच्या निर्देशानुसार किंवा शासनाच्या मार्गदर्शक सुचनानुसार आपल्या एम.जी.पी. डी.पी.आर. तयार करुन देईल २२० कोटीचा. याची शास्वती कोण घेत आहे. हे कोण तयार करुन देणार.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** (सभागृहात अनेक सन्मा.सदस्य बोलत असतांना नेमके काय बोलले ते समजले नाही.) याची शास्वती कोण घेणार.

**मा.उपमहापौर :-** मग तोच आहे ना विषय, विषय तेथेच येतो ना. कशासाठी मरायचे सर्व सदस्यांनी. बघा, प्रशासनाने केलेल्या बेकायदेशीर पत्र व्यवहाराची शिक्षा हे सभागृहातल्या सदस्यांनी का भोगायची.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** मग निसर्ग वाल्याला द्यायचे का हे ठरवा. निसर्ग वाल्याला द्यायचे का ?

**मा.उपमहापौर :-** विषय तुमच्या लक्षात नाही येत आहे भाऊ.

(सभागृहात अनेक सन्मा.सदस्य बोलत असतांना नेमके काय बोलले ते समजले नाही.)

**श्री.नितीन लढ्ढा :-** आप्पा, कुठेतरी कायदेशीर प्रक्रियेचे अवलोकन करुन निर्णय घेणे हे क्रमप्राप्त आहे. का या सभागृहात ८० सदस्य असतील. मी ही त्याच्यातलाच आहे. मला ही कायद्याचे १००% नॉलेज आहे अश्यातला भाग नाही. ज्या ज्या गोष्टी समोर येतात त्याच्या बाबतीत त्या पध्दतीने माहिती घेऊन अभ्यास करुन बोलण्याचा प्रयत्न करतो. परंतु याच्या संदर्भात लिगल कॉम्पीटीशन १००% निर्माण होते. कारण त्याला तुम्ही दिलेला कार्यादेश अजुन तो वैध आहे. त्याच्या मुदतीमध्ये त्याने अजुन पर्यंत डि.पी.आर. जो काही सादर केलेला असेल. तो आपण दिलेल्या कार्यादेशाला अनुसरुन आहे का ? असेल तर तो तुम्हाला स्विकारायला पाहिजे. नसेल तर तश्या पध्दतीने तुम्हाला त्याचे रेकॉर्ड क्रिएट करावे लागेल. आम्ही तुम्हाला या पध्दतीच्या मार्गदर्शन तत्वांचा अवलंब करुन कार्यादेश दिलेला होता. विदीन टाईम मध्ये , वेळेमध्ये सादर करण्याच्या संदर्भात आपली कन्डीशन होती. परंतु अद्यापपावेतो तुम्हाला दिलेल्या कालावधी मध्ये दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार तुमचा डि.पी.आर. हा आम्हाला दिसुन येत नाही. तर या संदर्भात तुमचे नेमके म्हणणे काय ? या सगळया गोष्टी तुम्हाला रेकॉर्डवरती क्रिएट करावे लागतील. जो पर्यंत हे क्रिऐट करणार नाही. एकतर्फी तुम्ही त्याचा कॉन्ट्रॅक्ट रद्द केला, तर निश्चितपणे तो उद्या जाऊन हेच क्लेम करेल. माझा सगळा डी.पी.आर. हा पुर्णत: तयार होतो. आणि यांनी तो धोरणात्मक निर्णय घेऊन तो डी.पी.आर.रद्द केला. त्याच्यामुळे माझे आर्थिक नुकसान झाले. म्हणुन ती आर्थिक भरपाई मिळणेस मी पात्र आहे. १००% तो दावा तुमच्या अगेनस मध्ये जाईल. राहिला प्रश्न दुसरा, जो टाईम त्याला ३१/१०/२०२२ पर्यंत दिलेला आहे. त्याच्यामध्ये जरी २.५% ने महेनताना ठरविला असेल. तरी शासनाच्या गाईडलाईन ज्या आहे. त्याच्यामध्ये अत्यंत स्पष्ट म्हटलेले आहे. या वेळेला आपण जो म्हणतो ना, आगाऊपणा करायचा किंवा घाई करायची. तर घाईच्या अनुषंगाने, शासनाच्या गाईडलाईन येण्याच्यापुर्वी आपण हे दिलेले आहे कार्यादेश त्याला. नंतर मग शासनाच्या गाईडलाईन ज्या आल्या. त्या गाईडलाईन दाखवतो तुम्हाला. महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाने विहित केलेल्या मॉडल, RPF नुसार निविदा प्रक्रिया करुन प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नेमणुक करण्याची मुबा राहील. महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाने निश्चित केलेल्या दरापेक्षा, काय शब्द आहे आप्पा, महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाने निश्चित केलेल्या दरापेक्षा कमी दराने एखादी संस्था तयार असल्यास महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाने निश्चित केलेल्या खालील सुचनांनुसार करता येईल. म्हणजे त्याच्या संदर्भात दर ठरवुन दिलेले आहे की, हे पॅनलवरती इनपॅनलमेंट केलेली जी १६ एजन्सीज आहे. त्यांना सुध्दा गाईडलाईन द्यायला पाहिजे. ती योजनेची किंमत ५ ते ७५ कोटी डी.पी.आरअसेल तर ४० लक्ष रुपये त्याला शुल्क द्यायला पाहिजे. किती ४० लक्ष ५ कोटी ते ७५ कोटीपर्यंत डी.पी.आर. असेल तर,

**श्री.कैलास सोनवणे :-** ५% म्हणजे जवळ जवळ ५% पर्यंत.

**श्री.नितीन लढ्ढा :-** दुसरा ७५ ते २०० कोटी रुपयापर्यंतचा डी.पी.आर.असेल तर १ कोटी ७५ लाख रुपये मेहनताना त्याला द्यायला पाहिजे.

**श्री.कैलास सोनवणे :-** ५ ते ६% च्या जवळपास.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आणि तीन नंबर, २०० व त्यावरील म्हणजे अनलिमिटेड, त्या ३ कोटी ५० लाख रुपये फी अदा करावी. आपण करारनामा काय केला २.५% चा. डी.पी.आर. कितीचा आहे आपला मलनिस्सारण योजनेचा १०२२ कोटीचा, पाणी पुरवठयाचा आहे २२० कोटीचा एकत्रीत कार्यादेश दिलेला आहे साधारणता १२०० कोटीचा. १२०० कोटी प्रमाणे २.५% मेहनताना किती होतो. ३० कोटी रुपये.

**मा.उपमहापौर :-** भाऊ, वॉटर रिर्जवेशनचा पण आहे ना.

**श्री.नितीन लढ्ढा :-** शासनाने निर्धारीत केलेले २०० कोटी वरील अनलिमिटेडसाठी ३ कोटी ५० लाख रुपये मग.

**श्री.कैलास सोनवणे :-** ५% पण नाही होतं ते ०.५%

**श्री.नितीन लढ्ढा :-** ०.५%, जर कधी आपण राज्य शासनाच्या ज्या इनपॅनलमेंट केलेल्या १६ कन्सल्टन्सीस पॅनलवरती आहे त्याच्यातला एक निसर्गवाला आहे. त्याचा आधार आपण घेतो आहे की, तो शासनाच्या इनपॅनलमेंटवर सुध्दा आहे. म्हणुन त्याला देण्यात काही हरकत नाही.

**श्री.कैलास सोनवणे :-** मग ते पैसे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मग त्यावेळी राज्य शासनाने निर्धारीत केलेले दर आहे. त्या दरामध्ये निसर्गवाल्याकडुन विहित मुदतीमध्ये काम करुन घेणेस तो तयार असेल तर त्या पध्दतीने त्याच्याकडुन काम करुन घ्यावे. कारण एम.जी.पी. काय दराने काम करणार ते सुध्दा आपल्याला माहित नाही. आणि अश्या पध्दतीने ठराव करुन जर डिस्कंटीनिव्ह केले तर १००% मी म्हणतो की, लायबिलीटी महापालिकेवरती येईल.

**मा.उपमहापौर :-** आणि आप्पा साहेब याच्यामध्ये स्पष्ट असे म्हटलेले आहे. अमृत २.० अंतर्गत प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणुन खाजगी सल्लागारांची नियुक्ती करण्यास स्थानिक स्वराज्य संस्थांना मुबा राहील. प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांना प्रचलित धोरणानुसार किमान ३% पर्यंत प्रकल्प संस्थेला शुल्क आकारण्यास अनुमती राहील. त्यासाठी निकष ठरवुन देण्याचे व निर्णय घेण्याचे नगरविकास विभागाच्या स्तरावर निश्चित करण्यात यावा. अशी आपण कुठलीच नगरविकास विभागाची अनुमती घेतलेली नाही. म्हणजे हे सगळं जे झालेले आहे ते बेकायदेशीर आहे असे आमचे म्हणणे आहे.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** मला एक खुलासा द्या, आपण जो कॉन्ट्रॅक्ट केलेला आहे. तिकडुन त्यांची सही असेल, महापालिकेडुन तुमची सही असेल, म्हणजे महापालिकेतर्फे आयुक्त म्हणुन आपण तो कॉट्रॅक्ट केलेला आहे. त्याच्यात काय नेमणुक केली आपण,त्या कॉन्ट्रॅक्टची आम्हाला माहिती द्या. करारनामा, आयुक्त महोदयांनी त्या कॉन्ट्रॅक्टवर सही केलेली आहे. मघाशी सांगितल्याप्रमाणे तो पुर्ण विषय येथे सभागृहापुढे आलेला नाही. म्हणजे ते तुमच्या लेव्हलला झालेला आहे. ते सभागृहापुढे आपले मत मांडा येथे.

**श्री.कैलास सोनवणे :-** डिसीजन घेऊन टाकु. फक्त मला सांगा, फक्त यांची जी शंका आहे ना. तो कोर्टात गेला तर आपण एम.जी.पी.ला देऊन परत त्याला द्यायला लावणार का ? पुढच अस वाटत मला, त्याला दिलं तर तो कोर्टात जाणार नाही.

**मा.महापौर :-** हो तस होऊ शकत, एम.जी.पी.ला दिल्यानंतर एम.जी.पी. त्यांना देऊ शकतो. कारण एम.जी.पी.ने कळविलेले आहे की, आमच्याकडे माणसे नाही.

**श्री.कैलास सोनवणे :-** ते काय झाले, भिंतीच्या मागुन पत्थर मारायचे.

**मा.उपमहापौर :-** भाऊ हे सगळे झाल्यानंतर, दोन दोन सह्या होऊन आलेल्या आहे.

**मा.महापौर :-** दि.२९/०८/२०२२ ला डी.पी.आर. सादर केला निसर्गने, तो पुर्ण गाईडलाईननुसार आहे का ? मार्गदर्शनानुसार आहे का ? हे चेक करणे प्रशासनाची जबाबदारी होती. त्यांच्या चुकीचे फळ आपण कशाला भोगायचे. जबाबदारी त्यांच्यावर निश्चित करुन घेऊ. उद्या जर काही रिकव्हरी निघाली तर ते त्याला जबाबदार असतील. आपण का त्याला सफर व्हायच. आणि विशेष म्हणजे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** जबाबदारी प्रशासनावर निश्चित करा.

**श्री.कैलास सोनवणे :-** आपण जर ठराव केला तर हे काय करतील माहिती आहे का ? हे एम.जी.पी.मार्फत त्याला देतील म्हणजे सगळ झाल सगळ मिटल.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** आप्पा, तो आपला विषय नाही. आपल्याला काय पाहिजे. शहराला निधी पाहिजे, कामे झाले पाहिजे.

**श्री.कैलास सोनवणे :-** पण ते काम करुन घेता आहे ना आपल्याकडुन.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही आप्पा, मला गिरगावकर साहेबांचे म्हणणे इतके इललॉजीकल वाटले, महाराष्ट्र जिवन प्राधिकरण हे ट्रेनिंग इन्स्टीट्युट आहे. ती सगळया कन्सलटंटला एज्युकेट करते. म्हणुन तो त्यांच्या विरोधात कोर्टात जाणार नाही. अहो या देशामध्ये केंद्र शासनाच्या विरोध कोर्टात जातात लोकं, राज्य शासनाच्या विरोधाात जाता लोकं. मंत्र्यांच्या विरुध्द जातात. हा कोणता लॉजीक आहे मला हेच कळलं नाही.

**मा.महापौर :-** आणि कोर्टाच्या विरुध्दात पण कोर्टात जातात ना. खालच्या कोर्टाने न्याय दिला नाही तर वरच्या कोर्टात जातात लोकं.

**श्री.कैलास सोनवणे :-** इंदिरा गांधीच्या विरोधात गेले, २५ जुन १९७५ ला ती पाटा लावावी लागली, आता नाही इंदिरा गांधीची काय पावर होती त्या टाईमाला. आयर्न लेडी म्हणुन तीला ओळखलं जायचे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ज्या वेळेस याची लायबिलीटी येईल तेव्हा तुम्ही सेवानिवृत्त झालेले असतील, कदाचित आपण ही नगरसेवक राहणार नाही. परंतु या शहराच्या महानगरपालिकेवरती. मला सांगा आप्पा ज्या प्रोजेक्टच्या जमिनीचे पैसे आपण दिलेले आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** बिल्कुल, आपण डबल का आणि किती पटीने दिलेले आहे तरी त्यांच्या बाजुने सुप्रिम कोर्टाकडुन निकाल लागतो कसा? आपली खरेदी असुन सुध्दा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हे जे ल्याकुना असतात ना, ह्या ल्याकुनाचाच फायदा उचलतात ते. आणि हाच ल्याकुला जो आहे ना. आजचा हो जो प्रस्ताव आहे हा सरळ सरळ म्हणतो निसर्ग कन्सलटंटला कोर्टात जाणेसाठी हा राजमार्ग तयार करुन देतो आहे आपण.

**मा.उपमहापौर :-** त्यानी कळविलेले आहे आपण, पत्र देऊन कळविलेले आहे आपल्याला. म्हणजे त्याची मक्तेदारीपणा बघा, माझ्याशी सल्लामसलत न केल्यास, माझ्या आतापर्यंत घेतलेल्या निर्णयाच्या विरुध्द कोणाला काम दिल्यास कॉन्ट्रॅक्टर अॅक्ट म्हणजे त्याला.

**श्री.नितीन लढ्ढा :-** त्यानी त्याची बाजु मजबुत करुन टाकलेली आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** आता याच्यात शंका निघालेल्या आहेच ना. तर आता प्रशासनाला त्याच्यावर उत्तर देऊ द्या. काय मार्ग? काय कसे म्हणणे आहे, हे केल्यानंतर निसर्ग वाला जाणार नाही किंवा काय ? त्यांना सांगु द्या नाही सांगता आल तर आपण त्यांच्या वरती तसा ठराव करु.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आणि कसे आहे एक सांगतो आप्पा, मागच्या वेळेला अमृत १.० चा काम करत असतांना एम.जी.पी. ही पी.एम.सी. असावी हे बंधनकारक होत.

**श्री.कैलास सोनवणे :-** हो ते आपल्या याच्यातच होता.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आज एम.जी.पी.चे अनुभव, आज जळगांव शहराची जी वादावाद झाली आहे. त्याला एकमात्र कारण जे आहे ते एम.जी.पी. आहे. म्हणजे तुम्हाला त्याच्यातले एक छोटासे उदाहरण सांगतो.

**श्री.कैलास सोनवणे :-** आपल्याला अनुभव आहे ना. माहिती आहे ना.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आप्पा तुम्ही अनुभव घेतला, आपल्या फिल्ट्रेशन प्लॅन्ट वरती, एम.जी.पी.च्या स्पेसिफिकेशन प्रमाणे, फिल्टर रॅम्प जो असतो आपला, ज्याच्यात आपण वाळु लागते, त्यांनी सांगितलेल्या स्पेसिफिकेशन प्रमाणे मक्तेदाराने ४० लाख रुपयाची वाळु सप्लाय केली, मक्तेदार म्हणजे अमृतचाच मक्तेदार जैन उद्योग समुह, ४० लाख रुपयाची वाळु सप्लाय केल्यानंतर त्याचे बिल अजुन पर्यंत रेकॉर्ड झालेले नाही. का तर त्यांनी जी स्पेसिफिकेशन दिले होते. त्या स्पेसिफिकेशनची वाळु मागविण्यात आली. ती नेरी कडे जाऊन वेरिफाय केली, ज्या स्पेसिफिकेशनची ऑर्डर केली होती तीच आली. परंतु ती नेमकी येथे उपयुक्त नाही. घेतली कोणाच्या सांगण्यावरुन घेतली एम.जी.पी.च्या आज त्याचे बिलच रेकॉड होत नाही ४० लाख रुपयाचा, भांडारचे लोकं बसले असतील, भांडरचे म्हणणे आहे की, जर याची उपयुक्तताच नाही. एम.जी.पी. म्हणत आहे कसे तरी धकुन घ्या. कुलकर्णी साहेब असतांना मी बोललो की, याची लायबिलीटी कोणावर फिक्स करणार तुम्ही. म्हणजे मक्तेदाराला पेमेंट मिळत नाही, वाळु आपल्या उपयोगाची नाही. पण मला सांगा अश्या एजन्सीला काम देऊन जे आपण या सभागृहामध्ये चर्चा करु की, ती विदीन पिरयेडमध्ये योजना सबमीट व्हायला पाहिजे डी.पी.आर. योजना मान्य व्हायला पाहिजे. म्हणजे त्याच एम.जी.पी.ला आज बंधन नाही कमीत कमी म्हणुन तुम्हाला ती अपॅरच्युनिटी आहे. आजही राज्य शासनाचे बंधन राहिले असते की, तुम्हाला एम.जी.पी. च्या माध्यमातुनच करायचे आहे. तर ती तुमची मजुरी राहीली असती.

**श्री.कैलास सोनवणे :-** ठिक आहे ना आता डिसीजन काय घ्यायचे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** म्हणजे जी असमर्थ आहे तीला आपण हो म्हणायचे की, एम.जी.पी.कडुन करा.

**श्री.कैलास सोनवणे :-** मग आता डिसीजन काय घ्यायचे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** बोला आता प्रशासन काय बोलत आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** आता तुम्ही खुलासा द्या ना याच्यावरती.

**मा.आयुक्त :-** मा.महापौर, मा.उपमहापौर, सन्मा.सदस्य, सर्व अधिकारी पदाधिकारी, बऱ्याच वेळेपासुन ज्या विषयावर चर्चा सुरु आहे. एकदम सुरुवातीपासुन आपण सुरु करु या. जे मागच्या वेळेस मी सांगितले होते की, तिघानी जी बाजु मांडली आहे ती बरोबर आहे. महानगरपालिकेने १५ जानेवारी २०२२ ला संकेतस्थळावर अमृतच्या पोर्टलवर माहिती भरली होती. त्याच्यानंतर दि.२३/०५/२०२२ ला देखील आपण पोर्टलवर माहिती भरलेली आहे सेंट्रल गव्हर्नमेंटच्या, म्हणजे वॉटर प्लॅन्ट, वॉटर सप्लाय स्कीम आणि ड्रेनेज ही केंद्र शासनाच पोर्टलवर आपण माहिती भरली, त्यानंतर हे मी ८ ऑगस्टला तुम्हाला जी.बी. ला प्रस्तावीत केलेला आहे तेच बघुन वाचत आहे. त्यानंतर शासन निर्णय आला १४ जुलै २०२२ ला, शासन निर्णय असा होता की, केंद्र शासनाचा ३४% हिस्सा, राज्य शासनाचा ३६% हिस्सा, महापालिकेचा ३०%, ऑगस्टला आपण जो प्रस्ताव प्रस्तावीत केलेला होता, तो आपण स्वहिस्स्याची बांधणी आपल्याला करावी लागेल, म्हणुन आपण जी.बी.ला प्रस्तावीत केलेले होते की, स्वहिस्सा आम्हाला मंजुर करुन द्या म्हणुन. परंतु हा प्रस्ताव मांडल्यानंतर शुचितातार्इंनी प्रस्ताव मांडला, म्हणजे त्यामध्ये डिटेल बोलत गेल्या की, आपण डी.पी.आर. डिटेल मध्ये करायला पाहिजे. म्हणजे प्रस्ताव मांडलेला होता स्वहिस्स्याच्या बांधणीसाठी, परंतु डिस्कशन अंती असे लक्षात आले की, मागचा १.० चा डी.पी.आर.व्यवस्थीत झालेला नाही. म्हणुन

नविन कन्सल्टन्सी नेमावी. हा ऑगस्टच्या याच्यामध्ये आला, म्हणुन प्रस्तावात आला की, नविन डी.पी.आर.नेमावा. त्याच्या अगोदर जर आपण गेलो, मे मध्ये आपण पोर्टल भरले, मे मध्ये मी चार्ज घेतला, मग सरांची ऑर्डर आली. मग आम्ही डिस्कशन करुन जो निसर्गाला वर्कऑर्डर दिली. त्याचा बेस असा होता की, १.० त्यांनी केलेला आहे, बेसिक डाटा त्यांच्याकडे आहे. नगरविकासची व्ही.सी. झाली होती. अत्यंत तात्काळ डी.पी.आर.करणे बंधनकारक होते. मग येथे प्रशासनाकडे काय ऑप्शन होते. म्हणुन आम्ही जुलै मध्ये त्यांना १.० असल्यामुळे तो पॅनलवरही अॅक्टींग असल्यामुळे आम्ही त्याला वर्कऑर्डर दिली. दि.०८ जुलै २०२२ ला. ऑगस्टमध्ये व्ही.सी. झाली स्वहिस्स्यासाठी, हे नक्कीच आमच्याकडुन राहिले की, तुमच्या निदर्शनात आणुन द्यायला पाहिजे होते की, आम्ही कन्सलटंट नेमलेला आहे. परंतु ते स्वहिस्स्यासाठी होत. अचानक डिस्कशन झाले आणि हा ठराव पास झाला, निसर्गाने जो डी.पी.आर. तयार केला, जो बेसिक डी.पी.आर. तयार केला, त्यांनी तो आमच्या निदर्शनास आणला सप्टेंबरमध्ये, मा.महापौर, मा.उपमहापौर, शुचितताई हाडा, यांच्याशी हा डी.पी.आर.डिस्कस झाला, आणि डी.पी.आर.डिस्कशनच्या अंती असे लक्षात आले की, हा डी.पी.आर. २.० च्या गाईडलाईननुसार नाही. सप्टेंबरमध्ये जी.बी. झाली नाही, आमचा प्रयत्न हा होता प्रशासनाचा की, ऑक्टोबरच्या जी.बी.मध्ये हा डी.पी.आर.यायला पाहिजे. परंतु ओवरऑल जेव्हा सगळयांशी चर्चा केली लोकशाही मार्गाने, तेव्हा असे लक्षात आले की, २.० च्या गाईडलाईननुसार तो डी.पी.आर. नाही. म्हणुन असे ऐन्डपर्यंत येत होते की, जर ऑगस्टचा प्रस्ताव झालेला आहे नविन टेन्डर करायचे तर आपण नविन टेन्डर करायला पाहिजे.आणि मग १६ सप्टेंबरचा जो जी.आर.आला. मग गिरगावकर साहेबांचे असे म्हणणे आले की, मॅडम १६ सप्टेंबरचा जी.आर. आल्यामुळे आपण वर्कऑर्डर दिलेला माणुस कोर्टात जाऊ शकतो म्हणुन आपण आता नविन काही अॅपरोच करु शकत नाही. आता आपल्याला १६ सप्टेंबरच्या डिसीजनवर क्लोजींग घ्यावी लागेल. आणि ०७ ऑक्टोबरच्या जी.बी.मध्ये बरेच विषय असेल पण या विषयावर बराच ओहापोह झाला, मग विशेष सभा लागली, आणि आजची सभा लागलेली आहे. त्यामुळे आपल्याकडे तीन पर्याय आहे. एक निसर्गला कॅन्सल करायचे असेल तर आपल्याला कायदेशीर रित्या सगळे कॅन्सल करावे लागेल. सगळी बाजु त्याचे निदर्शनास घेऊन, सुनावणी घेऊन, जेणे करुन उद्या त्याला कोर्टाचा मार्ग मोकळा होणार नाही. माझ्याकडे जेव्हा प्रस्ताव आला, त्याच्यावर मी हेच लिहुन पाठविलेले आहे की, अमृत २.० चा डी.पी.आर. झालेला आहे की नाही. जर निसर्ग कॅन्सल करायच आहे तर आपल्याला कायदेशीर बाबी लक्षात घेऊन तो कॅन्सल कराव लागेल. दुसरा जर जनरल बॉडी सर्वानुमते निर्णय घेत असेल की, एम.जी.पी.ला द्यायच आहे. तर तेही आहे, आपण एम.जी.पी.ला पत्र देऊ डी.पी.आर. तयार करायला सांगु. अदरवाईज टेन्डर करायच आहे तर टेन्डर काढता येईल. आता का निर्णय आपल्याला घ्यायचा आहे. जसे नितीनभाऊंनी सांगितले की, तो कोर्टात जायची शक्यता नाकारता येत नाही. म्हणुन आपल्याला त्याच्या डी.पी.आर.मध्ये ज्या काही त्रुटया असतील त्याचा ओहापोह करुनच तो आपल्याला कॅन्सल करावा लागेल. आपण तो एकतर्फी करु शकत नाही.

**श्री.कैलास सोनवणे :-** समजा आता आमच्या पक्षाचे धोरण असे आहे की, एम.जी.पी.ला द्यायचे आहे. त्यांच्यावर जे ऑब्जेशन आहे त्याच्यावर काय सोल्युशन आहे ते सांगा आता.

**मा.आयुक्त :-** आपल्याला कायदेशीर रित्या त्याच्या ज्या काही त्रुटया असतील त्या त्यांनी परिपुर्ण करुन द्यावे. त्यांच्या पिरयेड मध्ये असतील, तर त्या बेसीसवर आपल्याला कॅन्सल करता येईल.

**श्री.कैलास सोनवणे :-** त्याच्या मुदतीच्या पहिले आपण आज ठराव करतो आहे ना.

**मा.उपमहापौर :-** आपण ठरावामध्ये ऑलरेडी म्हटलेले आहे की, मागच्या काळात झालेल्या चुकांची पुनरावृत्ती होऊ नये म्हणुन मागचा ठराव जो होता एम.जी.पी.ला दिला होता ना मागच्या टाईमाचा.एम.जी.पी. चा होता मागच्या टाईमाला. ठराव ऑलरेडी आपला तसाच आहे. आप्पा परिस्थिती ठिक आहे ठराव.

**श्री.नितीन लढ्ढा :-** तुम्हाला जो निर्णय घ्यायचा तो घ्या. त्या निर्णयाला आम्हाला काही हे म्हणणे नाही. प्रत्येक जण प्रत्येक सभासद आपला निर्णय घ्यायला सक्षम आहे, त्या बद्दल वाद नाही. या फक्त ज्या बाबी आहे. त्या मी आपल्या निदर्शनात आणुन देतो आहे. आज जर कधी आपण निसर्ग कन्सल्टन्सीला रद्द करुन एम.जी.पी.ला काम देण्याच्या संदर्भातला ठराव केला. निश्चितपणे त्याला तो व्यालिड पॉईंट असेल. निसर्ग वाल्याला कोर्टात जायला की, द्वेष माईंडने यांनी ठरवुन घेतलेले होते, माझे काम रद्द करण्याचे संदर्भातलं.

**श्री.कैलास सोनवणे :-** मी तेच म्हणतो आहे ना नितीनभाऊ की, तुमच्या ऑब्जेक्शन वरती प्रशासनाकडे सोल्युशन काय आहे. सोल्युशन नाही तर आम्ही तुमच्यावर करुन टाकु तो ठराव.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** नितीनभाऊ जे म्हणत आहे. पण मला सांगा आता सांगा, दि.०८/०८/२०२२ ला जो झालेला ठराव आहे.दि.०८/०८/२०२२ ला निविदा काढण्याचा ठराव आहे. त्याच काय करायच मग.तुम्ही निसर्गलाही म्हणता, बॉडी ठराव करते की, निविदा काढा.

**श्री.कैलास सोनवणे :-** तु बाकीच्या येच्यात जाऊ नको ना. आपले ठरलेले आहे त्या हिशोबाने चाला ना आपण. त्यांचे जे ऑब्जेक्शन आहे त्याच्यावर सोल्युशन मिळत नाही. नाही तर आपण प्रशासनावर करुन मोकळे होऊन जाऊ.

**श्री.नितीन लढ्ढा :-** विशालजी, मी काय म्हणतो. दि.०८/०८/२०२२ च्या ठरावात आपण अनुपस्थीत होतो अश्यातला भाग नाही. नविन कन्सलटंट नेमायचा असेल तर नेमा नसेल नेमायचा तर नका नेमु.परंतु याचे जे लिगल कॉमप्लीकेशन उभे राहतील ना. त्याच्या संदर्भात फक्त मी अवगत करून देतो आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** नितीनभाऊ, तुम्ही ऐकुन घ्या मी काय म्हणतो आहे. आमच्या पक्षाची भुमिका ठरलेली आहे.एम.जी.ला द्यायचे, झाला विषय, त्याच्यानंतर तुमचे जे ऑब्जेक्शन आहे ते बरोबर आहे. त्याच्यावर यांचे सॉल्युशन काय ?यांचे सॉल्युशन समाधानकारक नसेल तर जे काही रिकव्हरी निघेल ती प्रशासनाने करायची आहे त्याची कायदेशीर बाबी तपासुन आमचा ठराव असा आहे. संपला विषय आता याच्यावरती चर्चा नाही. आता त्याच्या उपरांत मी सांगतो. आता साहेबांनी सांगितले मला बोलले, साहेब मला काय बोलले, एम.जी.पी. सक्षम आहे, गुलाबभाऊ सुध्दा बोलले, गुलाबभाऊ त्या खात्यातील मंत्री आहे. ते माणसे देतील, ते सगळ करतील, ते सगळ म्हणजे या पध्दतीने होणार आहे. सगळयांचे बाळासाहेब आहे पण शिवसेना, पण शिवसेनेचा जो पार्ट झाला आहे.

**मा.उपमहापौर :-** बाळासाहेब हे सर्वांचे आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** हो सर्वांचे आहे. पण ते कंफ्युज होतं ना. आता येथे चार चार गट आहे तर कसं समजणार आम्हाला, शिवसेना अलग, शिंदेसेना अलग, त्यांच्यामध्ये वेगवेगळे अलग.

(सभागृहात अनेक सन्मा.सदस्य एकच वेळी बोलत असतांना गांधळामुळे कोण काय बोलले समजले नाही)

**श्री.विष्णु भंगाळे :-** आप्पा, शिवसेना एकच आहे, ओरिजीनल उध्दव साहेबांची.

(सभागृहात अनेक सन्मा.सदस्य एकच वेळी बोलत असतांना गांधळामुळे कोण काय बोलले समजले नाही)

**मा.उपमहापौर :-** आयुक्त मॅडमांनी किंवा प्रशासनाने इतकीच शास्वती द्यावी की, भविष्यामध्ये कुठल्याही सदस्यावर ही लायबिलीटी फिक्स केली जाणार नाही.

**श्री.कैलास सोनवणे :-** एकमताने होऊन जाईन ठराव. सगळा विषय फक्त हाच आहे. तुम्ही निसर्गला द्या, एम.जी.पी.ला द्या की, नविन टेन्डर करा. सगळया ठिकाणी एकच कॉमन विषय आहे दुसरं काही नाही.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** मी काय म्हणतो, एक मिनीट नितीनभाऊ, हा प्रस्ताव प्रशासनाने दिलेला आहे, आता येथे जी चर्चा झाली, आता वाद राहीला काय निसर्ग किंवा एम.जी.पी. नाही भाऊ एक मिनीट थांबा ना, एक मिनीट थांबा, तर प्रशासनाने सांगावे की, एम.जी.पी.ला दिल्यावर काही लायबिलीटी निघणार नाही. किंवा काही होणार नाही. त्याची जबाबदारी आमची राहील. रेकॉर्डवर घ्या आणि ठराव मंजुर करा.

**श्री.कैलास सोनवणे :-** नितीनभाऊंच्या प्रश्नाचे उत्तर जर मिळाले तर आम्हाला काय अडचण आहे.

**श्री.सुनिल महाजन :-** मॅडम, तुम्ही सांगुन द्या ना कुलभुषणभाऊंनी जे विचारले ते.

**श्री.सचिन पाटील :-** उपमहापौर जे बोलले ना मॅडम की, नगरसेवकांवर कुठल्याही प्रकारची जबाबदारी राहणार नाही. हे आयुक्त मॅडमांनी सांगावे.

**श्री.कैलास सोनवणे :-** रिकव्हरी निघाली तर २० लाखाच्या वरतीच निघणार आहे.

**श्री.विष्णु भांगाळे :-** आप्पा साहेब, मला एक सांगा, आयुक्त साहेबांनी जरी हा ठराव करायला सांगितले, याची रिकव्हरी निघणार नाही. नक्की जबाबदारी राहील का पण. हे नक्की तसे राहील का ?

**मा.उपमहापौर :-** ठराव करणाऱ्याचा विषय आहे ते.

**श्री.विष्णु भंगाळे :-** हा. का हो आप्पा साहेब.

**श्री.कैलास सोनवणे :-** बोला ना.

**श्री.विष्णु भंगाळे :-** एक शब्द असा आहे, आयुक्त साहेबांनी जरी सांगितले की, याची रिकव्हरी नगरसेवकांकडुन किंवा मंजुर करणाऱ्यांवर येणार नाही. हे होऊ शकतं का अस.

**श्री.अश्विन सोनवणे :-** रेकॉर्डवर घ्या ना.

**श्री.विष्णु भंगाळे :-** सभागृह कशासाठी आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आप्पा, मॅडमांनी गॅरंटी घेतली, आणि उद्या रिकव्हरी निघाली, तर मॅडमला हे गाणे द्यावे लागेल. जहॉ जहॉ मैं जाती हु वही चले आते हो. ये तो बताओ की तुम मेरे कौन हो. कारण काय आहे आपण पण त्यांना शोधत फिरु ना. मॅडम रिकव्हरी निघाली.

**श्री.कैलास सोनवणे :-** रिकव्हरी भविष्यात जरी निघाली तर प्रशासनामार्फत तुम्ही असे सांगा, काही नगरसेवकांना २१ पासुन सुरुवात तर आम्हाला १ पासुन सुरुवात,

**श्री.विशाल त्रिपाठी :-** एम.जी.पी.ला द्यावा असाच प्रस्ताव प्रशासनाचा आहे ना.

**मा.उपमहापौर :-** विशालभाऊ, तुम्ही समजुन घ्या. प्रस्ताव जरी प्रशासनाने दिलेला आहे पण निर्णय तर आपल्याला घ्यायचा आहे ना. ना तर प्रस्ताव आपल्या समोर कशाला आला असता, ऐका ना प्रशासनाने कार्यवाही जर करायची होती तर महासभेपुढे ठेवला कशाला, त्यांना आपले मत घ्यायचे आहे ना. आपलं मत घेतल्या शिवाय ते कामच नाही देऊ शकत ना. जनरल बॉडी कशासाठी असते. माझ्या म्हणण्याच अर्थ मुळातच ते आहे की, हे प्रशासनाने आपल्या अंगावर लोटलेलं आहे. हे तुम्ही पहा म्हणुन, म्हणजे प्रशासन याच्यामध्ये सेक्युर्ड झालेला आहे. तुम्हाला सांगितलेले आहे काय करायचे आहे तर करा.

**श्री.कैलास सोनवणे :-** गिरगावकर साहेब, उत्तर द्या ना.

**श्री.विष्णु भंगाळे :-** विशाल भाऊ, जर प्रशासनाला इतका विश्वास राहिला असता, तर त्यांनी माहितीस्तव दिला असता तो, जर त्यांना गॅरंटी राहिली असती रिकव्हरी निघणार नाही. तर त्यांनी फक्त माहितीस्तव म्हटले असते.

**श्री.कैलास सोनवणे :-** त्यांना फक्त नितीनभाऊंच्या प्रश्नाचे उत्तर देऊ द्या.

**श्री.अनंत जोशी :-** मनामध्ये एक शंका आलेली आहे, याच्यात सगळयात जास्त जो सहभाग घेतलेला आहे तो विशालभाऊ आणि कैलास आप्पांनी घेतलेला आहे. त्यांच दोघांचे ही काही बिगडणार नाही हे सगळयांनी लक्षात घ्यायच बरं.

**श्री.कैलास सोनवणे :-** बाकीच्यांना त्रास होऊ नये हीच भुमिका आहे ना आमची. अजुन भुमिका काय आहे आमची, म्हणुन तर तुमच्या प्रश्नाचे उत्तर का मागतो आहे आपण प्रशासनाला. त्याच्याचसाठी मागतो आहे ना.

**श्री.एम.जी.गिरगावकर, शहर अभियंता :-** या ठिकाणी खुलासा करायला सांगितलेला आहे, नितीनभाऊ जे बोलले त्या अनुषंगाने की, एम.जी.पी. पुढे कोर्टात जाईल का ?

**श्री.कैलास सोनवणे :-** एम.जी.पी. नाही निसर्ग.

**श्री.एम.जी.गिरगावकर, शहर अभियंता :-** निसर्ग कोर्टात जाईल का? तर त्या अनुषंगाने मला हे नमुद करावे असे वाटते की, निसर्ग कन्सल्टन्सीचे रजिष्ट्रेशन हे एम.जी.पी.कडे आहे. आणि एम.जी.पी.च्या अन्य प्रकल्पाला सगळया टी.एस. देण्याची यंत्रणा एम.जी.पी. आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** कायदेशीर नाही हे. कायदेशीर मुद्दे सांगा.

**श्री.एम.जी.गिरगावकर, शहर अभियंता :-** ऐकुन तर घ्या, निसर्ग कन्सलटंट महाराष्ट्र मध्ये जेथे जेथे डी.पी.आर. बनविते. त्याला सगळी तांत्रिक मंजुरी देणारी यंत्रणा एम.जी.पी. आहे. त्यामुळे अशी धारणा आहे की, तो कोर्टात जाणार नाही. (आवाज समजत नाही) आणि आपला पुर्वीचा जो रेट होता, तो शासनाने सुध्दा क्लियर केलेले आहे, ते कमी झालेला आहे. आता त्यांनी नमुद केले, २०० कोटीच्या वर गेला की, मॅक्झीमम ३.५% आहे. या गोष्टींचा विचार करता मला असे वाटते की, तो जाणार नाही. त्याला त्याच्यात मार्गही नाही. त्याच्या व्यतिरिक्त जर कोणाला दिलं तर तो कोर्टात जाऊ शकेल. आणि तो ॲक्शन घेऊ शकेल.

**श्री.कैलास सोनवणे :-** धारणा, शक्यता या गोष्टींना अर्थ नाही. कंन्फर्म काय ? असे धारणावरती चालत नाही कायदा, कायदा धारणा आणि शक्यतेवर चालत नाही. कंन्फर्म पाहिजे. कंन्फर्म काय ? म्हणजे हे दादागीरी टाईप झाले ही दादागीरी आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** सप्टेंबर मध्ये जो शासनाचा जी.आर. आलेला आहे १६ एजन्सीजचा, त्याच्यामध्ये ही कन्सल्टन्सी पात्र आहे का हे खुलासा करा.

**श्री.कैलास सोनवणे :-** जाऊ द्या, सोडा हा विषय, ठराव करा आणि प्रशासनावर हे करा. प्रशासनावर जबाबदारी निश्चित करा.

**मा.उपमहापौर :-** आप्पा, याच्याही उपरांत सांगतो मी, मॅडम मला एक माहिती पाहिजे, आपल्याला नगरविकास विभागाकडुन जळगांव शहराच्या विकास योजनेसाठी रस्तेसाठी, गटारीसाठी, मलनिस्सारणसाठी असे काही पत्र आलेले आहे का ? की, ७०-८० कोटीचा, १०० कोटीचा तुम्ही प्रस्ताव तयार करुन पाठवावे आम्ही तुम्हाला निधी देऊ ईच्छितो असे काही आहे का ?

**मा.आयुक्त :-** रिगार्डींग, रस्ते, गटारी,

**मा.उपमहापौर :-** रस्ते गटारी नाल्या. असे काही ५०-१०० कोटीचा डी.पी.आर. तयार करणे संदर्भात किंवा प्रस्ताव तयार करणे संदर्भात काही पत्र आलेला आहे का ?

**मा.आयुक्त :-** पत्र नाही.

**मा.उपमहापौर :-** मग मला सांगा, असे कुठलेच पत्र नसतांना ज्या कन्सल्टन्सीला आपण २.५% ने डी.पी.आर. बनवायला देतो. कारण आपण ७०-८०-१०० कोटी रूपयाचा आपल्याला शासन स्तरावर कुठलीच शास्तृती नसतांना पैसे मिळणार की नाही याची माहिती नसतांना आपला प्रस्ताव तेथे सादर नसतांना आपण संबंधीत निसर्ग कन्सल्टन्सीला रस्त्यांचा डी.पी.आर. बनविण्याचे संदर्भात पत्र दिलेले आहे. आणि त्याची पण फी तो आपल्याकडे या आठ दिवसात मागणी करणार आहे. आता त्याची फीच इतकी होऊन जाणार आहे की, त्याच्यामध्ये आठ रस्ते तयार होतील जळगांव शहरात.

**श्री.एम.जी.गिरगावकर, शहर अभियंता :-** या बाबत मी सभागृहाच्या निदर्शनास आणुन देऊ ईच्छितो की, ज्या वेळेस याबाबतीमध्ये प्रशासकीय जो आला अमृतचा त्या बद्दल आपण त्याला डी.पी.आर. करायला सांगितले. त्यानंतर आपले १०० कोटीचे ज्या योजना आहेत. त्याच्यातील ४२ कोटीचे कामे आपण पी.डब्ल्यु.डी.च्या वर्क मध्ये दिले. उरलेले जे ५८ कोटी आहे. त्या अनुषंगाने त्याबाबतीत सन्मा.महापौर, विरोधीपक्ष नेते आणि मा.उपमहापौर साहेब यांच्याशी चर्चा केली होती आणि त्यांनी निर्देश दिलेले आहे की, डी.पी.आर. लवकर तयार करा. याबाबत त्यांच्याशी चर्चा केलेली आहे महापौर,उपमहापौर आणि विरोधीपक्ष नेता. यांनी दिलेल्या सुचनेनुसार वर्कऑर्डर दिलेली आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** आपल्या विषयावर या ना. महापौर आणि उपमहापौर विषयांतर करु नका. आपला हा विषय घ्या.

**मा.महापौर :-** आप्पा एक मिनीट. पण त्याने आपल्या करारानुसार किंवा गाईडलाईन नुसार जर काम केले नाही. तर तसा वेळोवळी पत्रव्यवहार करतो. २९ तारखेला जर डिपीआर सादर केला तर तो डिपीआर प्रॉपर नव्हता आणि त्याच कारण असं होत की तो मार्गदर्शक तत्वानुसार हा डिपीआर झालेला नाही आणि कमीत कमी तो त्यावेळेला कोर्टात गेला असता किंवा नंतर गेला असला तर आपल्याकडुन याची सेफ बाजु राहीली असती. दुसरे असे की इतर ज्या महापालिकांनी प्रॉपर डिपीआर सबमीट केले नाही असे डिपीआर सादर केलेले आहे की त्याला टिएस लागलेला नाही. म्हणुन तो शासनाकडुन परत आलेले आहे. त्याच्यामुळे आपण हा डिपीआर सादर केला तरी सुध्दा आपला डिपीआर पहिल्या गाडी ने रिटर्न होईल. म्हणुन त्यामुळे मला असं वाटत की आपण याला दोन पैसे देणार आहोत याला निसर्ग एजन्सीला तसेच आपण इतर कोणाला दिला तर आपला वेळ जाईल. त्यामुळे हा एकचवेळा हा डिपीआर प्रॉपर पध्दतीने तयार व्हावा. असं वैयक्तिक माझ मत आहे. कारण की त्या गाईडलाईन नुसार तो.

**श्री. नितीन लढ्ढा**:- आप्पा कस आहे मी थोडक्यात समजवुन मी सांगु का?

**श्री. कैलास सोनवणे** :- सांगा ,सांगा

**श्री. नितीन लढ्ढा**:- काय आहे की हा जो आज सभागृहात प्रस्ताव आलेला आहे ना हा परिपुर्ण प्रस्ताव नाही. या प्रस्तावाच्या अनुषंगाने जे रिअल कॉम्लिकेशन होणार आहेत भविष्यामध्ये तो डिपीआर या प्रस्तावामध्ये आलेला नाहीये. आपण कुठेतरी झालेली चर्चा आणि ते म्हणतील आणि त्या चर्चेच्या अनुषंगाने की याच काम रद्द करायचं आणि MJP ला द्यायच तेवढ्याच गोष्टीचा विचार करून हा प्रस्ताव या सभागृहासमोर ठेवण्यात आलेला आहे. या प्रस्तावाचे कामं MJP ला द्यायचे असेल. MJP ला द्या त्याबद्दल काही वाद नाहीये. नविन कंन्सलटंटला द्यायचे असेल त्याबद्दल काही वाद नाहीये. निसर्ग कडुन करून घ्यायचे असेल नियमानुसार तर त्याच्या कडुन करून घेण्यासंदर्भात कारण प्रत्येक गाईडलाईन ह्या निश्चत केलेल्या आहेत. याचा वाद काय आहे की याने विहीत मुदतीमध्ये डिपीआर आपल्याला सादर केलेला नाहीये. त्याची मुदत अजुन कार्यादेशाची बाकी आहे आणि आता आपण जर कधी याला अशा पध्दतीचे धोरण ठरवुन त्याला डिसकंटीन्यु केलं तर निश्चितपणे त्याला कायद्याचा आधार मिळेल आणि त्याने त्याची पायाभरणी त्याच पध्दतीने सुरू केलेली आहे.

**श्री. कैलास सोनवणे** :- मग आता करायच काय आहे त्याच

**श्री. नितीन लढ्ढा**:- म्हणुन हा प्रस्ताव प्रशासनाने निसर्गकडुन ईमिजेट MJP ला द्यायचा आहे. त्यांनी दिला आहे मान्य आहे. MJP ला दिला मान्य आहे. परंतू MJP ला देतांना कुठेतरी याचे ऑबिकेशन महानगरपालिकेवर येवु नये. या करीता याचा सखोल अभ्यास प्रशासनाने करून निसर्ग वाल्याला कायदेशिररित्या टर्मिनेट करून कोणताही पर्यायी रस्ता राहु नये. नंतर मग या पध्दतीचा प्रस्ताव या सभागृहासमोर येणं अपेक्षित आहे.

**श्री. कैलास सोनवणे** :- नितीनभाऊ आपली मुदत कमी आहे ना ३० तारखेपर्यंतच सांगीतली आहे ना.

**श्री. नितीन लढ्ढा**:- आपल्याला

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री. नितीन लढ्ढा**:- आप्पा

**श्री. कैलास सोनवणे** :- नाही ना तस नाहीये ना आता आपल्याला हे करावं लागतय ना आणि प्रशासन आहे आयुक्त आहेत ना ते पाहतील ना ते आपल्याला हा वाद घालायचा नाहीये नितीनभाऊ

**श्री. नितीन लढ्ढा**:- आप्पा मी काय म्हणतोय.

**श्री. कैलास सोनवणे** :- कस आहे आपल्याला आता याच्यातुन निघायचं आहे. त्याची मक्तेदाराची मुदत पण तेवढीच आहे आणि आपल्याला डिपीआर सादर करायची मुदत पण तेवढीच आहे.

**श्री. सुनिल महाजन** :- आप्पा त्याच्यात कॉम्पीटिशन व्हायला पाहीजे होती.

**श्री. कैलास सोनवणे** :- हे प्रशासन पाहील ना आता आमच्या पक्षाचं ठरलय की MJP ला द्यायचं देवुन टाकायचं आणि निसर्गवाल्याचं काय आहे म्हणणं त्याची जबाबदारी यांची

**श्री. नितीन लढ्ढा**:- आप्पा मी काय म्हणतोय. काय झाल आहे.

**श्री. कैलास सोनवणे** :- संपला विषय , तुम्ही कितीही करत गेले कितीही सांगत गेले तरी पुढे हा विषय पुन्हा याठिकाणी ईथेच येईल तो म्हणुन सांगतो.

**श्री. नितीन लढ्ढा**:- आप्पा प्रशासनाने काय केलयं की निसर्गला रद्द करण्याचा धोरण ठरवण्याचा प्रस्ताव तुमच्या समोर ठेवला आहे. रद्द करण्याचं धोरण कोण ठरवत आहे , रद्द करण्याचं धोरण कोण ठरवत आहे

**श्री. सुनिल महाजन** :- आपण ठराव करताय ना.

**श्री. नितीन लढ्ढा**:- रद्द करण्याचं धोरण कोण ठरवत आहे , रद्द करण्याचं धोरण कोण ठरवत आहे निसर्गला रद्द करण्याच मग महापालिकेवर जर लायबिलीटी आली तर मग धोरण कोणी ठरवल होत तर बॉडीने

**श्री. कैलास सोनवणे** :- त्यांच बोलणं झालं असेल की आम्ही MJP ला देतोय संपला विषय

**मा.उपमहापौर** :- आप्पा आपण जे म्हणतोय ना की इतक सगळं झाल्यावर पण

**श्री. कैलास सोनवणे** :- या सगळ्या गोष्टींचा शेवटी सार हाच निघतो. म्हणजे तो पण जाणार नाही तुम्हाला पण काही होणार नाही. घाबरु नका असं प्रशासनाचं म्हणणं आहे. नाही तर याच्याशिवाय काय आहे की या सगळ्या गुंतागुंतीचे उत्तर तुम्ही द्या आम्हाला

**मा.उपमहापौर** :- आप्पा आपण जर हे केलं तर याची जबाबदारी कोणावर येईल.

**श्री. कैलास सोनवणे** :- आता मी तिस वर्षापासुन आहे या महापालिकेत मी असे विषय कधी पाहीले नाही. सरोवराने जसे प्रश्न विचारले होते ना बाबांना तशातील प्रकार आहे हा तु माझ्या सरोवराचे पाणी प्यायचं नाही माझ्या या प्रश्नाचं उत्तर दे नाहीतर तु तात्काळ मरशील चार पांडव मरून गेले होते त्याच्यामध्ये, तो बरा होता बिचारा युधिष्टिर तर त्यांनी सगळे उत्तर बरोबर दिले आणि त्यांना परत जिवंत केले. तर तुम्ही उत्तरं द्या आणि आम्हाला मोकळं करा.

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री. नितीन लढ्ढा**:- आप्पा

**मा.महापौर** :- आप्पा आपल्याला जिवंत ठेवा

**श्री. एम.जी. गिरगांवकर, शहर अभियंता** :- आता मी श्री.नितीनभाऊ लढ्ढा यांनी जे काही नमुद केलेलं आहे त्या मी काही ईन्सिडेंट करणार नाही. पण त्या अनुषंगाने मी हे नमुद करू ईच्छितो की आता निसर्गचं आता चालु होत. आता MJP ला दिले तर तो कोर्टात जाईल का? माझी धारणा अशी आहे जाणार नाही पण यदाकदाचित जर का कोर्टात गेला

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री. एम.जी. गिरगांवकर, शहर अभियंता** :- याच्यामध्ये भविष्यामध्ये कॉम्पिलीकेशन झाले किंवा काही जरी झाले तर यासाठी एखादी शासकीय कमिटी नेमुन त्याची चौकशी करण्यात यावी आणि त्याच्यामध्ये जे काही ईश्यु येतील तर त्याच्यावर जबाबदारी निश्चित करण्यात यावी.

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री. एम.जी. गिरगांवकर, शहर अभियंता** :- ऐकुन घ्या यदाकदाचित याच्यामध्ये प्रशासन जर जबाबदार राहील असं निश्चितपणे जबाबदारी निश्चित होईल असं सांगु शकतो.

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री. कैलास सोनवणे** :- आता नाही नाही त्यांनी सांगीतलं की शासन ठरवेल की तर शासन कशाला डिपार्टमेंट त्या डिपार्टमेंटला वाचवुन घेतील का आपल्याला प्रॉब्लेम येणार नाही आणि येवु देणार नाही हे पहिलेच ठरलेलं आहे साहेब कबुल करा हे साहेब

**श्री. एम.जी. गिरगांवकर, शहर अभियंता** :- काय आहे की

**श्री. कैलास सोनवणे** :- तुम्ही धारणा नका धरू साहेब, धारणाला अर्थ नाही आहे येथे, ईथे धारणेचा प्रश्न नाहीये. धारणाच्या आधारे येथे बघितल्या आहेत ना मी ईथे

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री. कैलास सोनवणे** :- काय व्यवस्थित आहे जे कायदे आणि नियम आहेत ते आहेत. त्याला काही

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री. सुनिल महाजन** :- साहेबांना देवुन टाका जबाबदारी

**श्री. एम.जी. गिरगांवकर, शहर अभियंता** :- काय सर

**श्री. कैलास सोनवणे** :- नाही त्या माणसाला मानलं पाहीजे. एकदम प्रामाणिक आहे साहेब, म्हणजे त्यांच्या बाजुने ते बागुलबुवा आहेत एकदम, पहा काय विचार आहे काय ठराव करायचा आहे त्याचा , घ्या मतदान घ्यायचे असेल मतदान घ्या. पण लवकर निपटवा हा विषय , नितीनभाऊ निपटवा हा विषय काही त्याच्यातुन निघणार नाहीये.

**श्री. नितीन लढ्ढा**:- नाही नाही आप्पा आमची सुचना मांडुन देतो.

**श्री. कैलास सोनवणे** :- हो मांडा.

**श्री. नितीन लढ्ढा**:- जो निर्णय घ्यायचा आहे तो घ्या. सदरहु प्रशासनाचा प्रस्ताव आला असता निसर्ग वाल्याला डिस्कंटिन्यु करण्याच्या संदर्भात जी प्रशासनाची भुमिका आहे. त्याच्याशी आम्ही सहमत नाही. त्या गोष्टीला आमचा सक्त विरोध आहे. उद्या जावुन भविष्यात महानगरपालिकेवर जे काही याचे आर्थिक दायित्व येईल. त्या आर्थिक दायित्वाला हे धोरण ठरविणारे समसमान जबाबदार असतील. कारण हा महापालिकेवर भविष्यात येणाऱ्या आर्थिक दायित्वाचा विषय आहे. या संदर्भातील माझी व्यक्तिगत भुमिका जी आहे. ती विरोधाची आहे.

**श्री. विष्णु भंगाळे** :- नाही पक्षाची आहे आपली

**श्री. नितीन लढ्ढा**:- पक्षची भुमिका आहे. जे जे सभासद मान्य करतील. ते या प्रस्तावाला

**मा.उपमहापौर** :- मी या संदर्भात येथे बसुन माझी विरोधात्मक भुमिका व्यक्त करू शकत नाही. म्हणुन मी या ठिकाणाहुन खाली जावुन माझे मत मांडणार आहे.

**श्री. कैलास सोनवणे** :- आम्ही तर कधीचं म्हणत आहेत तुम्हाला खाली या असं. तुम्ही येतच नाही ना.

**मा.उपमहापौर** :- नाही नाही आप्पा तुम्ही अशा चुकीच्या धोरणांना हे करता म्हणुन येत नाही मी

**(मा.उपमहापौर हे व्यासपिठावरून उठुन खाली सभागृहातील बाकावर सन्मा.सदस्यांच्या शेजारी येवुन बसले)**

**श्री. कैलास सोनवणे** :- अहो उपमहापौर इकडे या.

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री. नितीन लढ्ढा** :- मा.महापौरताई याच्यामध्ये उपसुचनेमध्ये स्पष्टपणे नमुद करून घेण्यात यावे की निसर्ग कंन्सलटंन्सी ला दिलेला कार्यादेश आज रोजी सुध्दा अबाधित आहे आणि त्याची मुदत अजुनपर्यंत संपुष्टात आलेली नाही. अशा परिस्थितीमध्ये सदरहु मक्तेदाराला धोरणात्मक निर्णय घेवुन जर कधी त्याचा कार्यादेश रद्द करण्याच्या संदर्भातील भुमिका घेतली गेल्यास सदरहु मक्तेदार हा भविष्यात निश्चितपणे कोर्टात जाण्याच्या संदर्भातील शक्यता नाकारता येत नाही आणि कोर्टात गेल्यानंतर महानगरपालिकेच्या विरोधात जर का नुकसान भरपाई चा दावा झाल्यास मोठ्या प्रमाणात आर्थिक तोशित महानगरपालिकेला येवु शकते आणि त्या आर्थिक तोशितीला जे जे कोणी जबाबदार असतील. प्रशासन असेल, पदाधिकारी असतील, सन्मा सदस्य असतील ते जबाबदार असतील. अशी स्पष्ट उपसुचना माझी त्याच्यामध्ये नमुद करून घेण्यात यावी आणि पक्ष म्हणुन आणि यात माझा स्पष्ट विरोध नोंदविण्यात यावा.

**मा.उपमहापौर** :- अजुन एक स्पष्ट उपसुचना नमुद करावी की दि.०८/०८/२०२२ च्या झालेल्या महासभेमध्ये झालेल्या ठरावाचा कंन्टेंम्प्ट होतोय. त्याची अंमलबजावणी प्रशासनाने केली नाही म्हणुन जे दोषी असतील त्यांच्यावर देखील कारवाई करण्यात यावी. हे सुध्दा त्या ईतिवृत्तात नमुद केलं गेलं पाहीजे.

**श्री. विष्णु भंगाळे** :- नितीनभाऊंनी जी सुचना मांडली त्यास मी माझं अनुमोदन देतो.

**श्री.सचिन पाटील** :- महापौर महोदय, आता ज्येष्ठ नगरसेवक नितीनभाऊंनी जी सुचना मांडलेली आहे. त्या सुचनांना माझ व्यक्तिगत नगरसेवक म्हणुन माझ समर्थन आहे आणि सगळी जबाबदारी आयुक्तांची आणि शहर अभियंता यांची राहील.

**श्री.एम.जी गिरगांवकर, शहर अभियंता** :- मा.उपमहापौर साहेबांनी आता येथे मांडलेले आहेत.

**मा.महापौर** :- साहेबांना बोलु द्या.

**श्री.एम.जी गिरगांवकर, शहर अभियंता** :- त्यांनी आता येथे नमुद केलेले आहे की दि.०८/०८/२०२२ च्या ठरावाचे कंन्टेंम्प्ट झालेले आहे. परंतू या अनुषंगाने त्या संदर्भात प्रशासनाकडुन भुमिका अशी मांडतो की दि.०८/०८/२०२२ चा जो ठराव आहे त्याला आपण त्याला दि.०७/०७/२०२२ ला निसर्गला कार्यादेश दिला आणि त्या एक महिन्यामध्ये त्याने प्रोसिजरही चालु केली होती आणि दि.०८/०८/२०२२ ला जेव्हा कमिशनर मॅडमांनी जेव्हा हे टायप केलं आणि त्याचा जो फायनाशिंल पॅटर्न आहे म्हणजे आकृतीबंध त्याला मान्यतेसाठी हा विषय आलेला असतांना सर्वात आधी जे कार्यादेश दिलेले आहेत. निसर्ग कंन्संल्टंन्सी तो रद्द करून नविन निविदा काढण्याचा अभिप्राय दिलेला आहे आणि त्या ठरावाच्या अंमलबजावणी साठी ज्या काही अडचणी येत आहेत. ते त्याच्यामध्ये अशा आहे की कंन्संल्टंट जो आहे तो कोर्टात जावु शकतो नंतर निविदा प्रक्रीयेमध्ये कायदेशीर कोर्ट मॅटर होवू शकतं आणि ऑम्बिशन होवू शकतो म्हणुन हा प्रस्ताव या ठिकाणी महासभेला चर्चेला आला. त्यानंतर सर्वपक्षीय बैठकीमध्ये सर्व जे सन्मा. उपस्थित होते आणि हा जो कंन्संल्टंट जो आहे. तो कंन्संल्टंट MJP निवडीचा त्या दिवशी निर्णय घेण्यात आला त्या अनुषंगाने आणि त्याच दिवशी पुढील महासभेची तारीख नमुद करून हा प्रस्ताव प्रशासनाने या महासभेमध्ये आणलेला आहे. मी हे या ठिकाणी नमुद करतो .

**मा.उपमहापौर** :- आप्पासाहेब आत्ता जसं साहेबांनी सांगीतलं की दि.०८/०८/२०२२ रोजी झालेल्या महासभेमध्ये ठराव झाला आणि पुर्वीच त्याला कार्यादेश देण्यात आलेले होते आणि त्यादनंतर आपण त्याला काम देण्यासंदर्भात विचाराधीन होतो परंतू माझं गिरगांवकर साहेब, शहर अभियंता यांना इतकचं म्हणणं आहे की कदाचित आपल्याला महानगरपालिका ॲक्टचा अभ्यास असेल किंवा नसेल मला माहित नाही. परंतू स्थायी समितीचं सभागृह हे खालचं सभागृह असुन हे परंतू वरिष्ठ सभागृह महानगरपालिकेचं महासभा सभागृह हे आहे आणि ज्या महासभेमध्ये जो ठराव केला गेलेला होता. त्या ठरावाची अंमलबजावणी करणं हे प्रशासनाच काम होत. परंतू या ठिकाणी सभागृहात वारंवार आपल्याला चुकीची माहिती दिली जाते आहे. स्थायी समितीत ठराव झाला होता. स्थायी समितीत ठराव झाला होता मान्य आहे परंतू ते स्थायी समिती ठरावाची अंमलबजावणी केली नसतांना ज्या दिवशी दि.०८/०८/२०२२ च्या महासभेमध्ये ठराव केला. त्या दिवशी माझ्या माहितीनुसार मुदत संपुष्टात आलेली होती आणि दि.०८/०८/२०२२ च्या महासभेमध्ये झालेला ठरावाची अंमलबजावणी ही प्रशासनाच्या वतीने झाली पाहीजे होती अस मला वाटत

**मा.महापौर** :- हा जो ठराव झालेला होता त्या निविदेची रक्कम २० हजारात दिलेली होती हे मागील सभेमध्ये ठरले आणि नविन निविदा रक्कम ही काढावी परंतू आपल्याला याबद्दल काहीच आयडीया नव्हती की ती वर्कऑर्डर दिली गेलेली आहे आणि ठरावात कुठेही पिरीयेड नमुद केलेलं नाहीये की ती अगोदरची ही रद्द करतोय आणि नविन निविदा प्रक्रीया करतोय. कारण की त्याच्यापासुन सभागृह हे अनभिज्ञ होतं म्हणुनच त्यांनी ते उपस्थित केला मुद्दा जो आपण म्हणत आहेत तो चुकीचा आहे साहेब, पदाधिकाऱ्यांनी निर्णय घेतला असता किंवा त्याच्यावर चर्चा झाली असती. तर आपण तो निर्णय घेतला असता.

**श्री.विशाल त्रिपाठी** :- हो ना मग आता चर्चा झाली की निर्णय झालेला आहे तर मग आज काय अडचण आहे आपल्याला विरोध करत आहेत तर

**मा.महापौर** :- ठरलेला नाहीये ना मग मी तुम्हाला तेच सांगते आहे ना नविन निविदेला आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी** :- हो ना नविन निविदा काढायची आहे आपला विषय झालेला आहे ना आपण महासभेत केला आहे ना ठराव

**मा.महापौर** :- बरोबर आहे ना आम्हाला माहित नव्हत ना की की ०८/०८ ला वर्कऑर्डर पण दिली आहे आणि याबाबत चर्चा झालीच नाही ना सभागृहामध्ये ती व्हायला पाहीजे होती येथे

**श्री.विशाल त्रिपाठी** :- मग चर्चा झालेली आहे ना सभागृहात तिथुनच तर

**मा.महापौर** :- वर्कऑर्डर ची नाही निविदेची झाली.

**मा.उपमहापौर** :- कुठल्याही महासभेमध्ये कुठल्याच सदस्याने महापौरांसोबत असं ॲर्गीन्ट केलेलं नाही.

**श्री.एम.जी गिरगांवकर, शहर अभियंता** :- यामध्ये मी आता येथे नमुद करू ईच्छितो की, जरी आपण कार्यादेश दिल्यानंतर मा.आयुक्तांच्या मान्यतेनेच देण्यात आली. त्यानंतर वेळोवेळी मा.महापौर, मा.उपमहापौर , विरोधीपक्ष नेते यांना वेळोवेळी त्या आपण कार्यादेश देण्याच्या संदर्भात त्यांच्या निदर्शनासही आणुन दिलेले आहे आणि त्या ठरावाच्या अंमलबजावणी साठी आम्ही त्यात नमुद केलेले आहे आणि त्या कालवधीत

**मा.उपमहापौर** :- ऐकुन घ्या तुम्ही काय म्हणाले की ०७/०७ ला तुम्ही कार्यादेश दिलेले आहे असे तुम्ही ०८/०८/२०२२ च्या महासभेमध्ये परंतू तुम्हीच बोलले होते आणि जे जबाबदार असतील त्या संबंधित अधिकाऱ्यांवर त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी.

**श्री.एम.जी गिरगांवकर, शहर अभियंता** :- या बाबत कल्पना देण्यात आलेली होती आणि त्याच्यामुळे ही वर्कऑर्डर देण्यात आली होती.

**श्री.सुनिल महाजन** :- याच्यासंदर्भात परस्पर प्रशासनाने वर्कऑर्डर देण्यात आलेली आहे आयुक्तांना माहित आहे हे.

**मा.उपमहापौर** :- आयुक्तांची मान्यता आहे तर त्यांचा अभिप्राय काय आहे आणि निसर्ग कंन्सल्टंन्सीला कार्यादेश दिले गेलेले आहेत आणि त्याच्यात नमुद केलेले आहे की त्याच्यामध्ये शासनाने निर्गमित केलेल्या निर्देशांचे पालन केले गेले आहे का ? तर मान्य आहे.

**श्री.कैलास सोनवणे** :- एक मिनिंट काय आहे. गोराणेसाहेब जो ॲक्ट आहे ना ते वाचुन दाखवा साहेब यांना वाचा. मग काय होईल नितीनभाऊंच्या बाजुने ठराव करायचा आहे तर किती मत लागतील. नाही सभागृहाच्या मेजॉरिटीचा विषय नाहीये आता, यांचा ठराव पास करायचा आहे तर किती मत लागतील.

**मा.उपमहापौर** :- आमचा शासनाने दिलेल्या

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.नितीन लढ्ढा** :- आप्पा विषय बघा कसा आहे की निसर्गने कराव की MJP ने कराव तो विषय नाहीये हा मुद्दा काय आहे.

**श्री.कैलास सोनवणे** :- ते तर म्हणताहेत ना

**श्री.नितीन लढ्ढा** :- नाही नाही

**श्री.कैलास सोनवणे** :- तो विषय वेगळा आहे आणि हा विषय वेगळा आहे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- ऐका ना आप्पा मी काय म्हणतोय.

**श्री.कैलास सोनवणे** :- विस-तिस कोटी काय आहे त्याचे लफडे आहे हे सगळे

**श्री.नितीन लढ्ढा** :- मी काय म्हणतोय. एक मिनिंट ऐकुन घ्या हा फक्त

**श्री.कैलास सोनवणे** :- हो बोला

**श्री.नितीन लढ्ढा** :- आप्पा हा विषय जो आहे ना हा फक्त की प्रशासनाने सभागृहाची मान्यता नाही घेतली.

**श्री.कैलास सोनवणे** :- याच्यापुढे बोला , विषय बाकी आहे ना याविषयाच्यापुढे दुसरे विषय घ्यायचे आहे की नाही मला सांगा.

**श्री.नितीन लढ्ढा** :- आप्पा

**श्री.कैलास सोनवणे** :- ते सगळ समजत आहे ना आम्हाला, हो ना सगळ लक्षात आलं ना आता तुम्ही एवढे बोलले ना हे सगळ्यांच्या लक्षात येवुन गेलं आहे सगळं ते

**श्री.नितीन लढ्ढा** :- हो ना आप्पा याला निष्कर्ष काय निघतोय की याला माझा विरोध नाहीये. प्रशासनाने प्रस्ताव द्यावा ना MJP ला द्याना. पण त्या संस्था डिस्कटींन्यु करून घ्यायला पाहीजे.

**श्री.सुनिल महाजन** :- डायरेक्ट दिली आहे वर्कऑर्डर

**श्री.कैलास सोनवणे** :- अडचण नाहीये ना मग मतदान घ्या.

**श्री.नितीन लढ्ढा** :- नाही नाही आप्पा आज काय होतय माहिती आहे का त्यांनी केलेला प्रहार तो अजुनही भोगत आहेत आणि जे धोरण ठरवायचं होत.

**श्री.कैलास सोनवणे** :- गिरगांवकर साहेब फ्रंट तुम्हीच आहेत. पहिली फळी तेच आहेत. आता मतदानाची टेक्निकल पध्दत कशी आहे ते सांगा ना तुम्ही गोराणेसाहेब

**मा.महापौर** :- यामध्ये सुध्दा महापालिकेने पारित केलेला कोणताही ठराव तो पारित झाल्यानंतर तिन महिन्याच्या आंत फेरबदल करता येणार नाही किंवा तो रद्द करता येणार नाही. मात्र अशा ठरावात एकुण पालिका सदस्यांपैकी कमीत कमी एक तृतीयांश म्हणजे अडोतिस सदस्य आपल्याला पण पालिका सदस्यांनी

**श्री.कैलास सोनवणे** :- किती मॅडम आपल्याला किती लागतील.

**मा.महापौर** :- एक तृतीयांश वन थर्ड

**मा.आयुक्त** :- वन थर्ड

**श्री.कैलास सोनवणे** :- वन हाफ की वन थर्ड

**मा.महापौर** :- एक तृतीयांश वन थर्ड

**मा.आयुक्त** :- एक तृतीयांश वन थर्ड

**मा.महापौर** :- सॉरी सॉरी वन हाल्फ , कोणत्याही सदस्यांनी विवक्षित बाबतीत या नियमाद्वारे आवश्यक असेल अशा बाबतीसाठी इतर सदस्यांनी पाठींबा दिलेला आणि झालेल्या ठरावात सभेत फेरबदल करता येईल किंवा तो रद्द करता येईल. म्हणजे आपल्याला ३८ सदस्यांच हे लागेल.

**श्री.कैलास सोनवणे** :- बर बर

**मा.आयुक्त** :- तेव्हा तो पास होईल.

**श्री.कैलास सोनवणे** :- नाहीये ना नाहीये ना ३८ नाहीये , मोजुन घ्या.

**मा.उपमहापौर** :- आप्पा ठरावाच्या बाजुने अडोतीस पाहीजे.

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.कैलास सोनवणे** :- मोजा साहेब आमचे किती आहेत ते.

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री. विष्णु भंगाळे** :- फोन लावुन बोलवुन घ्या लागले तर

**श्री. अश्विन सोनवणे** :- ती सवय तुमची आहे.

**श्री. विष्णु भंगाळे** :- नाही निर्णय घ्यायचा होता म्हणुन बोलावले होते तुम्हीही घेवुन टाका बोलावुन.

**श्री.कैलास सोनवणे** :- काय आहे पळापळ करत नाही आम्ही ईथेच आहे. तुम्ही तर

**श्री. अनंत जोशी** :- जसा कंत्राटदार मी नाहीये आणि स्विकृत सदस्यांना मतदानाचा अधिकार नाहीये म्हणुन मी बोलत नाहीये याचा पण विचार व्हावा.

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री. विष्णु भंगाळे** :- आप्पा मी काय म्हणतोय की आपण जसा ठराव केला ना तसं करून टाका.

**श्री.कैलास सोनवणे** :- तसं चालत नाही विष्णु भाऊ

**श्री. अश्विन सोनवणे** :- अहो विष्णु भाऊ सह्या केल्या नाहीत का तुम्ही

**श्री. विष्णु भंगाळे** :- भाऊ केल्या आहेत परंतु आम्ही विरोध तर नोंदविला आहे

**श्री. अश्विन सोनवणे** :- मग हे आधी करायला पाहीजे होते ना

**श्री.कैलास सोनवणे** :- तुम्ही काय करताय माहिती आहे का आता ३१ तारखेपर्यंत आपला डिपीआर जर नाही गेला तर निधी परत जाईल.

**मा.उपमहापौर** :- नाही नाही तुम्ही तुमची भुमिका सांगा. आम्हाला प्रस्तावाला विरोध नाहीये.

**श्री.नितीन लढ्ढा** :- आप्पा काय आहे की जी धारणा तुम्ही डोक्यात बसवली आहे ना ती अत्यंत चुकीची धारणा झालेली आहे.

**श्री.सुनिल महाजन**:- निधी परत गेला तरी काही हरकत नाहीये.

**श्री.नितीन लढ्ढा** :- निधी परत जायच्या बाबतीत मॅडमशी चर्चा करा. मी सांगतो.

**मा.उपमहापौर** :- आणि आम्ही तर पोटतिडकीने बोलतोय ना.

**श्री.विशाल त्रिपाठी** :- नितीनभाऊ चुकीचे आहे हे

**श्री.नितीन लढ्ढा** :- एक मिनिंट विशालभाऊ, मॅडम या बाबतीमधील एकच स्पष्टीकरण द्या की या संदर्भातील निधी परत जाणार आहे का?

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.नितीन लढ्ढा** :- हि एक योजना आहे.

**श्री.विष्णु भंगाळे** :- ५ वर्ष आहे केंद्र शासनाची योजना आहे ती २०२५ पर्यंत चालणार आहे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- उलट कस आहे आप्पा डिपीआर हा विस्तृत जायला पाहीजे. या निसर्ग वाल्याने जो डिपीआर तयार केला ना तो अक्षरश: थातुरमातुर असा डिपीआर तयार झाला आहे.

**श्री.विष्णु भंगाळे** :- महापौरांनी स्पष्टीकरण दिलं की पहिल्या गाडीने हा डिपीआर पाठवा.

**श्री.नितीन लढ्ढा** :- आप्पा हा जळगांव शहराचा हा पुढच्या तिस वर्षाचा प्लॅन आहे. तुम्ही आता सबमीट करू शकता. म्हणजे भविष्यातील काय आहे की अमृतचा टप्पा क्रं. १ जो झालेला आहे तो घाईघाईत आणि अपुर्ण झालेला आहे त्याच्यामध्ये बऱ्याचश्या त्रुट्या राहुन गेलेल्या आहेत. म्हणुन अमृत-२ मध्ये सगळ्या त्रुट्या या परिपुर्ण करण्याच्या संदर्भात केंद्र शासनाने त्याच्यात स्पष्ट निर्देश दिलेले आहेत आणि ते कंम्पलसरी केलेले आहे की अमृत-२ च्या गाईडलाईन फॉलो करून ज्याच्यामध्ये तुम्हाला वॉटर मिटर पासुन तिस मिटरच्या हाईटच्या टाक्यांपासुन सगळ्या रस्त्यांच्या दुतर्फा पाण्याच्या लाईनींपासुन त्या सगळ्या गोष्टींची संधी उपलब्ध करून दिलेली आहे. तर हा डिपीआर उशिरा गेला तरी चालेल. परंतू परिपुर्ण जायला पाहीजे. कारण आपण या अमृत १ ला भोगले आहे ना ते पुन्हा भोगता कामा नये. म्हणुन त्याचा मागचा हेतू हा आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी** :- त्यांनी सांगाव की दोन तिन दिवसांमध्ये करत असतील. तुम्ही म्हणत आहेत की डिपीआर परिपुर्ण देवु. प्रशासनाने सांगाव की ३१ तारखेनंतर देवु त्याची जबाबदारी आमची त्यांनी सांगाव असं सभागृहापुढे

**मा.आयुक्त** :- आपल्याला फक्त माहिती भेटली आहे सर हा ऑफीशियली शासन निर्णय नाही झालेला आहे. त्याला प्रशासकीय मान्यता झालेली नाहीये. संकेतस्थळावर माहिती मिळाली. त्यानुसार गर्व्हमेंटला जो स्टेस गव्हमेंटला जो फंड सेंक्शन होतो त्यानुसार व्हिसी घेतली जाते आपला डिपीआर सेंक्शन करतात. त्यानुसार डिपीआर आपण दुसरा बनवु शकतो. आपला लॉस झालाय परंतू आपण जर पुन्हा दिला तरी आपल्याला फंड मिळणारच आहे. गिरगांवकर साहेब किंवा आमदार साहेब म्हणताहेत ना की फंड वापस जाईल. तर वापस नाही जाणार आपण नंतर जरी पाठवला तरी फंड आपल्याला मिळणार आहे. पण फर्स्ट कम फस्ट सर्व आता जरी आपण गेले तरी आताही निधी मिळेल. पण या करीता आता आमदार साहेबांचा जो आग्रह आहे कारण निधी आलाय अस नाहीये. नंतर गेला तरी आपल्याला निधी मिळणारच आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी** :- पण तुम्ही याची जबाबदारी घेत आहात का ? ३० नोंव्हेंबर नंतर डिपीआर दिल्यावर निधी मिळवुन देण्याची जबाबदारी तुमची

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.विशाल त्रिपाठी** :- निधी आल्यावर जर निधी परत गेला या शहराचा निधी परत गेला तर जबाबदारी तुमची , निधी परत जायला नको हीच आमची कळकळ आहे. कारण या शहराचा निधी परत जायला नको.

**श्री.नितीन लढ्ढा** :- विशालभाऊ तुम्ही

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.नितीन लढ्ढा** :- मी काय म्हणतोय विशालभाऊ तुम्ही राज्य कर्ते आहात भाऊ तुमच शासन आहे. पहिली माहिती आपण शासन स्तरावर घ्यायला पाहीजे. पुन्हा काहीतरी जाणीव करायची. हा जो गोंधळ चाललेला आहे ना हा निव्वळ गैरसमजुतीतुन चाललेला आहे. निधी परत जाईल , निधी परत जाईल कोणीतरी अधिकारी त्याच्या डोक्यामधील संकल्पना लोकप्रतिनिधींच्या डोक्यामध्ये घालतो आणि लोकप्रतिनिधी अशा पध्दतीने या अशा विषयामध्ये गोंधळ घालतात. खऱ्या अर्थाने योजना काय आहे, योजना कशा पध्दतीने मंजुर झालेली आहे. तिचा कालावधी किती आहे. काय झालं आहे की खऱ्या अर्थाने राज्यकर्ते इतके मगरूर झालेले आहे म्हणुन प्रशासन हावी होतय आणि म्हणुन याप्रकारच्या महानगरपालिकेला अशा पध्दतीच्या पायवाटा निघतात. पुण सभागृहाला लावतय.

**श्री.विष्णु भंगाळे** :- याच्यावर निधी आलेला आहे का ?

**श्री.विशाल त्रिपाठी** :- तुम्ही घ्या जबाबदारी

**श्री.नितीन लढ्ढा** :- नाही जबाबदारी घ्यायची नाही.

**श्री.विष्णु भंगाळे** :- जबाबदारी हा विषय नंतरचा आहे. आधी सांगा हा निधी आलेला आहे का ? आमची भुमिका

**श्री.कैलास सोनवणे** :- नितीनभाऊ काय चर्चा करताय तुम्ही मी सांगतोय की मुद्दयावर या मुद्दयावर या तरी तुम्ही

**श्री.नितीन लढ्ढा** :- आप्पा मी काय म्हणतोय.

**श्री.कैलास सोनवणे** :- ते सगळं जावु द्या आता या विषयावर करायच काय ?

**श्री.नितीन लढ्ढा** :- आप्पा जबाबदारी कोण घेईल हे तेच चाललय ना

**श्री.नितीन बरडे** :- नगरसचिव साहेब घ्या लवकर निर्णय काय आहे आणि दोन मिनिंटांत आटोपा

**श्री.नितीन लढ्ढा** :- आप्पा मी काय म्हणतोय. धोरण तुम्हाल ठरावायच आहे. पॉलीसी तुम्हाला ठरवायची आहे.

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.नितीन लढ्ढा** :- कोण कशाला जबाबदारी घेईल आणि घेतली जरी आणि उद्या मॅडमच काही कमी जास्त झालं तर आपण काय करणार आहे.

**मा.उपमहापौर** :- आप्पासाहेब प्रशासनाचा प्रस्ताव आहे. ते म्हणत आहेत की आम्ही मरणार नाही तुम्ही मरा. तुमच्याशी आम्हाला काही सुतक नाहीये.

**श्री.रियाज बागवान** :- महापौरताई

**श्री.सदाशिव ढेकळे** :- नितीनभाऊ

**श्री.कैलास सोनवणे** :- अहो नितीनभाऊ ऐका ढेकळेसाहेब काय म्हणत आहेत.

**श्री.सदाशिव ढेकळे** :- आता ही पॉलीसी ठरवायची आहे. नितीनभाऊ सत्ता तुम्ही चालवता आहे.तुम्ही सत्ताधारी आहात आता हे तुम्हाला ठरवायचं आहे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- आम्ही ठरवलं आहे ना

**श्री.विष्णु भंगाळे** :- आम्ही आमची भुमिका ठरवली आहे ना ढेकळेसाहेब

**श्री.सदाशिव ढेकळे** :- आता तुम्ही विरोधात बोलत आहात आणि ज्या निसर्गच तुम्ही एवढ कौतुक करत आहेत. अहो जळगांव शहराची वाट लावुन टाकली आहे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- नाही नाही ढेकळेसाहेब आम्ही काही वाट लावली नाही.

**श्री.सदाशिव ढेकळे** :- दोन वर्ष झाले तुम्ही सत्तेमध्ये आहात.

**श्री.कैलास सोनवणे** :- बोलु द्या.

**श्री.विष्णु भंगाळे** :- आप्पा

**श्री.सदाशिव ढेकळे** :- तुम्ही जे बोलत आहात म्हणजे कौतुकच झाल भाऊ

**श्री.नितीन लढ्ढा** :- अहो उलटपक्ष मी म्हणतोय ना ?

**मा.उपमहापौर** :- ढेकळेसाहेब तुम्ही बोलता काय आहे हे समजुन घ्या. बाजुने बोलत आहेत की विरोधात बोलताहेत.

**श्री.विष्णु भंगाळे** :- सुधरवण्याचाच प्रयत्न आहे आमचा , हे कमी करण्याच्या हिशोबानेच प्रयत्न आहे. दुसरं काही नाही.

**श्री.कैलास सोनवणे** :- अहो विष्णुभाऊ तुमचा पण नंबर लागेल. तुम्ही पण नशिबवान आहे. सुनिलभाऊ आणि तुम्ही ९६ नंतर आले आहे. नंबर तर लागेल.

**श्री.नितीन लढ्ढा** :- अहो आप्पा आम्ही भोगलेले आहे.

**श्री.कैलास सोनवणे** :- आम्ही पण भोगलेलं आहे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- म्हणुन हा प्रयत्न आहे.

**श्री.कैलास सोनवणे** :- तुम्ही ईन्क्वॉयरी मध्ये नव्हते. तुमचा पण नंबर लागेल

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.कैलास सोनवणे** :- आता वेगळ्या भाषेत बोलतो. तुमचे सौंदर्य स्थळ खुप आहेत. बँक आहे , फेडरेशन पण आहे समजा पुढे आणखी काही , विद्यापिठ आहे येईल येईल नंबर

**मा.उपमहापौर** :- आप्पा मी काय म्हणतोय आप्पा

**श्री.कैलास सोनवणे** :- एका सिनियर , ज्येष्ठ सदस्याला तुम्ही बोलत आहेत.

**श्री.सदाशिव ढेकळे** :- आम्ही भोगलयं आणि नितीनभाऊंनी पण भोगलयं.

**श्री.नितीन लढ्ढा** :- अहो आम्हीही भोगलयं म्हणुन बोलतोय.

**श्री.सदाशिव ढेकळे** :- आम्ही , विष्णुभाऊ कसे निघाले त्याच्यातुन

**श्री.कैलास सोनवणे** :- हो

**श्री.सदाशिव ढेकळे** :- हे फक्त आम्हालाच माहिती आहे.

**श्री.कैलास सोनवणे** :- होते तुम्ही पण होते पण मुदतवाढ होते.

**श्री.सदाशिव ढेकळे** :- आम्ही कशा पध्दतीने निघाले त्याच्यामधुन हे आम्हालाच माहिती आहे.

**श्री.कैलास सोनवणे** :- मुदतवाढ मध्ये तुम्ही होते तुम्ही निघुन गेले होते. तुमच्यावर पण लागायला पाहीजे होते तेव्हा.

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**मा.महापौर** :- सर्व सन्मा.सदस्यांनी शांतता राखायची आहे. सर्वांनी ज्यांनी भोगलय त्यांना माहिती आहे म्हणुन हि एवढी चर्चा आहे.

**श्री.विष्णु भंगाळे** :- महापौरताई मला फक्त एवढ स्पष्टिकरण देवु द्या की हे त्यावेळेला हे त्याच्यामधुन बाहेर निघाले त्याला कारण अस होत की मुदतवाढला आम्ही पहिली टर्म होती. मुदतवाढला आम्ही मंजुरी दिली होती. परंतू तो ठराव ईम्प्रुव्हमेंटच झाला नव्हता म्हणुन त्या चौकशीच्या अनुषंगाने हा आम्हाला बाहेर काढल आम्हाला असं काही बाहेर काढलेलं नाही. जेव्हा खर जसा तो एक मंगेश सानप होता. त्याला आम्ही होतो त्यांच डोकं खायचो म्हणुन निघाले.

**श्री.रियाज बागवान** :- महापौरमॅडम

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**मा.महापौर** :- विचार करूया यावर आपण

**श्री.रियाज बागवान** :- महापौरमॅडम मै गटनेता MIM के हिसाबसे बात कर रहा हुँ अब ये जो नये आहे है यहापे मेरा तो पहला टर्म है और बहोत बडा एक्सप्रियंस मिल रहे है हमको यहापर और ये गालीयो के साथ साथ सभी चिजें सुनने को मिलती है और इतना एक्सप्रियंस हमारे लिये बहोत हो गया और हम इससे जादा एक्सप्रियंस हम नही चाहते और कोर्ट कचेरी का एक्सप्रियंस हम नही चाहते तो मै और मेरे दोन नगरसेवक नितीनभाऊ को समर्थन देते है.

**श्री.कैलास सोनवणे** :- ठिक आहे ना आता ते बदतच नाहीये तर काय करू. आता काय करायच ते करा.

**श्री.विशाल त्रिपाठी** :- नाही आप्पा कसं आहे की आता मॅडमांनी तरतूद वाचुन दाखवली की तुम्हाला ठरावात जर बदल करायचा असेल किंवा रद्द करायचा असेल तर ३८ सदस्य लागतील आता जर यांनी भुमिका घेतली. आता टोटल ३८ पाहीजे मतदान एकुण सगळयांचे मिळुन ठरावाच्या बाजुने आता ते होत नाही. मग आता निर्णय काय करायचा.

**श्री.विष्णु भंगाळे** :- विशालभाऊ

**श्री.विशाल त्रिपाठी** :- एक मिनिंट

**श्री.विष्णु भंगाळे** :- विशालभाऊ मतदान घ्यावं लागेल ना.

**श्री.विशाल त्रिपाठी** :- परत माझा मुद्दा येईल. मी सुरूवातीपासुन सांगतोय की निसर्ग कडुन चालु ठेवायचं की निविदा काढायची हे दोन आपल अजुन क्लिअर झालं नाही.

**श्री.कैलास सोनवणे** :- पहिली मुदत संपु द्या त्यानंतर ठरवा ना

**श्री.विशाल त्रिपाठी** :- क्लिअरीटी नाहीये जर असे हे तिघं विषय चालले मोघम तर आपल्याला निर्णय घ्यावाच लागेल.तर

**श्री.नितीन लढ्ढा**:- आप्पा याचा धोरणात्मक निर्णय असा व्हायला पाहीजे की सभागृहात काय म्हणणं आहे की जर हे काम महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाला द्यायच असेल तर निसर्गला या संदर्भात कायदेशीर रित्या कंन्टेंम्प्ट करण्याच्या संदर्भातील काळजी प्रशासनाने घ्यावी तशा पध्दतीचा प्रस्ताव सुस्पष्ट प्रस्ताव या सभागृहासमोर ठेवायला पाहीजे. अशा प्रस्तावाची जे तुम्ही म्हणत आहेत ना.

**श्री.कैलास सोनवणे** :- त्याची मुदत संपु द्या

**श्री.नितीन लढ्ढा**:- MJP ला द्यायला आमची काही हरकत नाहीये ना

**श्री.कैलास सोनवणे** :- आपली पुढची मिटींग निघेल ना तोपर्यंत त्याची मुदत संपुन जाईल तोपर्यंत या विषयाच्या कायदेशीर बाबी प्रशासन पाहुन घेईल.

**श्री.नितीन लढ्ढा**:- नाही आप्पा.

**श्री.विशाल त्रिपाठी** :- नितीनभाऊ प्रशासन निसर्गवाल्याचा डिपीआर सबमीट करायचा म्हणत आहे.

**मा.महापौर** :- निसर्ग ने डिपीआर सबमीट केलेला आहे आणि आपण म्हणतोय की प्रॉपर आहे की काय आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी** :- त्याची मुदत संपली नाही आणि कसा केलाय

**मा.महापौर** :- त्याने त्याच काम केलेलं आहे. आपण त्याच पुढच काम केलेलं नाहीये की प्रॉपरली आपण पत्राद्वारे त्याला कळविलेले नाहीये. हे बरोबर आहे का? बरोबर नाहीये. एक मिनिंट गिरगांवकर साहेबांना भुमिका मांडायची आहे बोला साहेब.

**श्री.एम.जी गिरगांवकर, शहर अभियंता** :- या विषयाच्या अनुषंगाने मला याठिकाणी नमुद करायच आहे की, या पुर्वी आपण जे सुरूवातीलाच ठरवलं होत की आपण महासभेत एक ठराव केलेला होता की अडीच टक्के जो त्याचा रेट होता तो त्याने मान्य केलेला होता. त्यावेळी गाईडलाईन ती होती ती त्यावेळी मॅन्युअली आलेली होती आणि म्हणजे त्यावेळी त्याअनुषंगाने अडीच टक्के शासनाच्या निर्देशाप्रमाणे कमी होता आणि ०.५ कमी असल्यामुळे अडीच टक्के होत म्हणुन आपण त्याला दिलेलं होत आणि आता शासनाचा १६ सप्टेंबरचा जो जिआर आलेला आहे. त्याच्यामध्ये MJP च्या दरापेक्षा जास्त दर कुणालाही देवु नये असे निर्देश आलेले आहेत. आता नितीनभाऊ मी हे वाचुन दाखवलेल आहे त्याच्यामध्ये मॅक्झिमम ४० लाख रूपये आणि ७५ ते २०० , १७५ लाख म्हणजे १.७५ करोड आणि त्यात २०० म्हणजे त्यापेक्षा जास्त गेले तर साधारण साढेतिन कोटी आता आपल्याला एल-१ जो आहे. जर आपण निसर्ग कंन्संलटंटला जर दिलं तर आपल्याला याच्यामध्ये मॅक्झिमम २०० कोटीचा दिला तर साढेतिनशे कोटी जातात आणि ५०० कोटीचा आपला डिपीआर होईल आणि त्याची कंन्सलटंन्सी फी साधारण साढेबारा कोटी होईल. पण आता आपल्याला या नविन धोरणानुसार ही कंन्सलंटन्सी ला न देता किंवा MJP ला जर दिलं तर आपल्याला फक्त साढेतिन कोटी रूपये द्यायचे आहेत. याच्यामध्ये आपल्या महापालिकेची साधारण साढेनऊ कोटी रूपयाची बचत होणार आहे. आता निसर्गवाला जो आहे समजा तो कोर्टात गेला आणि त्याने दावा केला आणि त्याच्या बाजुने झाला तर ज्याकाही असे काही होणार नाही. आता अमृतमध्ये नमुद करतो परंतू तो गेला तर त्याचा खर्च जो आहे. जी बचत होणार आहे १० कोटी रूपयांची त्याच्यातुन आपल्याला करता येईल धन्यवाद.

**मा.उपमहापौर** :- साहेब आता तुम्ही म्हणत आहे की तो कामाचे ५०० कोटी मागतो आहे ते का म्हणुन.

**श्री.एम.जी गिरगांवकर, शहर अभियंता** :- नाही याच्यामध्ये आपल्याला २०० कोटी रूपयांचा जो बजेट तयार होईल त्याचे साढेतिन कोटी झाले आणि त्याचा बजेट जो आहे आता ३०० कोटींची वाढ केली तर साढेतिन साढेतिन कोटी रूपये द्यावे लागतील आणि ५०० कोटी जर बजेट केला तर म्हणुन जर MJP ला दिलं तर आपली महापालिकेची साढेनऊ कोटी रूपयांची बचत होईल धन्यवाद.

**श्री.कैलास सोनवणे** :- तरी लोकं भरताच आहे. तरी भरतात आहे. आपल्याला भरायची पाळी येवुन गेली होती.

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.कैलास सोनवणे** :- गरीब लोकच झाले ते गरीबोको घर देना है तरी म्हणता जेल मे जायेंगे तेव्हा तो स्विकृत होता तो . जेला मध्ये जाणार आहे का तो

**श्री.नितीन लढ्ढा** :- आता आपण MJP ला निविदा देण्यासंदर्भात ठराव करतोय. तर MJP काय चार्ज देणार आपल्याला MJP ला हे काम देण्यासंदर्भातील एक भुमिका सभागृहात चर्चा करतोय. तर MJP आपल्याला काय चार्ज करणार आहे.

**श्री.एम.जी गिरगांवकर, शहर अभियंता** :- साढेतिन कोटी

**श्री.नितीन लढ्ढा** :- MJP ते चार्ज करणार आपल्याला

**श्री.एम.जी गिरगांवकर, शहर अभियंता** :- हो

**श्री.नितीन लढ्ढा** :- म्हणजे आप्पा आता बघा दोन गोष्टी येथे MJP कडे डिपीआर सोपवला तर MJP ने जे धोरण ठरलेले आहे त्या धोरणानेच तो चार्ज करणार आहे. निसर्ग वाल्याला दिलं तर तसा साहेबांनी तसा खुलासा केलेला आहे की जरी त्याची अडीच टक्के भरल्याची त्याची पात्रता आहे. आता MJP ने जे धोरण ठरवलेल आहे त्याप्रमाणे तरी त्याला देता येणार नाहीये. म्हणजे मग

**श्री.विशाल त्रिपाठी** :- नाही नाही तसं नाहीये ते

**श्री.एम.जी गिरगांवकर, शहर अभियंता** :- जे धोरण आहे अडीच टक्क्यांच प्रमाणे दर दिलेले आहे ना परंतू आपण

**श्री.नितीन लढ्ढा** :- म्हणजे मला एक सांगा की

**श्री.एम.जी गिरगांवकर, शहर अभियंता** :- जर आता हे निविदा रद्द करून जर दिलं तर MJP ला साढेतिन कोटी रूपये द्यावे लागतील त्यांना

**श्री.नितीन लढ्ढा** :- आपण जो करारनामा केला आहे त्याच्यासोबत त्याला कायदेशीर रित्या कंन्टेंम्प्ट करायला काय पाऊल उचलाव लागेल.

**श्री.एम.जी गिरगांवकर, शहर अभियंता** :- आपण जो करारनामा केला आहे ना त्यामध्ये आलेलं आहे ना की एक पर्याय म्हणुन आपण म्हणु शकु ना की अजुन कस होत नाहीये किंवा पुन्हा निसर्गला द्यायचं का ? किंवा रिटेंडर काढल पुन्हा निविदा होवु शकतात. कारण आपण त्याला कुठलीही नोटीस दिलेली नाहीये. पण आपल्याला जर महासभेत करायचं असेल तर करू शकतात. पण आपल्या महापालिकेचे साढेतिन कोटी रूपये वाचतील आणि जर त्याने क्लेम केला तर पण आज महापालिकेचे साढेतिन कोटी आपले वाचणार आहे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- असं आहे आज जर आपण हे धोरण ठरवलं ना १०० टक्के त्याला ग्राऊंड मिळेल. या निसर्गवाल्याच्या बाबतीत यांची ही पॉलीसी ऑलरेडी ठरलेली होती. यांच्या चर्चेचे सर्व सारांश पुरावे गोळा करून दाखल करणे की माझे काम हेतू पुरस्कर रद्द करून MJP कडे द्यायच होत आणि म्हणुन यांनी अशा पध्दतीच धोरण ठरवल होत. याचा त्याला कोर्टामध्ये स्टे मिळेल. याला कायदेशीररित्या जो आपण त्याला दिलेला कार्यादेश आहे. त्या कार्यादेशाप्रमाणे त्याने जर डिपीआर सादर केलेला नसेल तर कारण त्याने अमृत२ च्या गाईडलाईन फॉलो करून डिपीआर सादर करण अपेक्षित होत. त्या जर का त्याने केल्या नसतील. तर तशा पध्दतीच आपल्याला रेकॉर्ड क्लिअर कराव लागेल आणि रेकॉर्ड क्लिअर करून कायदेशीर रित्या त्याला डिस्कंटीन्यु केल्याशिवाय तुम्ही दुसरी पॉलीसी ठरवण हे योग्य होणार नाही. या संधीचा त्याला ॲटोमेटीक कंन्टेम्प्ट मिळेल.

**श्री.एम.जी गिरगांवकर, शहर अभियंता** :- सर याच्यामध्ये कस आहे आता त्याने जर कोर्टात जायच ठरवल आणि केस केली १०० टक्के अजुन एक गोष्ट आहे की ॲर्मीटेटर निर्णय घेतील आणि ॲर्मीटेटर ने निर्णय दिला की ॲर्मीटेटर काय आहे ते काय करेल की व्हेरीफीकेशन करेल की त्याने नेमक काय केल आहे. म्हणजे आणि नियमाप्रमाणे केल आहे का मग त्याच कॅल्क्युलेशन किती होईल आणि समजा त्याने ३० लाखाचा क्लेम केला जरी मला वाटत समजा ते कमीच येईल. पण आता आपल्याला हे MJP ला दिल तर आपले साढेनऊ कोटी रूपये वाचणार आहे. म्हणजे ॲर्मीटेटर चा जो खर्च येईल तरी आपली बचत होईल.

**श्री.नितीन लढ्ढा** :- नाही साढेनऊ कोटींचा प्रश्न नाहीये. परंतू या धोरणाच्या लायबिलीटी या भविष्यात येतील त्यावेळेला तुम्ही सभागृहात राहणार नाही आयुक्त मॅडम राहणार नाही. सभागृहातील जवळपास ९० टक्के लोक निवृत्त झालेले असतील. परंतू ती लायबिलीटी या महापालिकेवर १०० टक्के येईल म्हणजे येईल.

**श्री.एम.जी गिरगांवकर, शहर अभियंता** :- नाही नाही लायबिलीटी च नाही पण माझं म्हणण काही नाही त्याला द्यायच आहे त्याला द्या एवढच बोलेल ना तो जेव्हा कोर्टात जाईल त्याच्यात अर्मीटेटर जे काही निर्णय घेईल ना

**श्री.नितीन लढ्ढा** :- साहेब तुम्ही म्हणत आहात तस मला माहिती आहे.

**श्री.एम.जी गिरगांवकर, शहर अभियंता** :- तो काही जाणार नाहीये. आली जरी लायबिलीटी समजा तर आता जे काही कायदेशीर भविष्यामध्ये

**श्री.नितीन लढ्ढा** :- साहेब ते सगळ बरोबर आहे.

**श्री.एम.जी गिरगांवकर, शहर अभियंता** :- त्याचा ठेका जर MJP ला दिला तर तो कोर्टातही गेला आणि विस ते ३० लाख रूपये खर्च येईल. आपण तो गेल्यानंतर ॲर्मीटेटर कडे मांडू.

**श्री.नितीन लढ्ढा** :- साहेब मला सांगा कॉम्लीकेशन काय आहे की तुम्ही एखाद्या ईन्स्टिट्युटला ठेका दिला

**श्री.एम.जी गिरगांवकर, शहर अभियंता** :- नाही.

**श्री.नितीन लढ्ढा** :- सुंदर भाषेत सांगतो की ॲर्मीटेटर कोण असतात रिटायर्ट जज असतात रिटायर्ड ऑफीरर्स असतात. त्यांच्याकडे गाईडलाईन असते हे पहिल आणि दुसर एकीकडे संस्था असते आणि एकीकडे व्यक्ती असते किंवा एकीकडे फर्म असते. पैसा कोण देतो महानगरपालिका, महानगरपालिकेच्या बाजुने निवडा करून देण्यासाठी गैरप्रकाराने खर्च करू शकत नाही. परंतू जी लाभार्थी पार्टी असते. ती लाभार्थी पार्टी त्या ॲर्मिटेटरला मॅनेज करते आणि त्याच्या सोईनुसार निकाल मिळवुन घेते आणि मग त्याचा झालेला निवाड्याची अंमलबजावणी प्रशासनावर येते.

**श्री.एम.जी गिरगांवकर, शहर अभियंता** :- तो जरी कोर्टात गेला ना आणि आपली जी साढेनऊ कोटी रूपयांची बचत होणार आहे. त्याच्यातुन तेवढ आपल्याला खर्च करता येईल.

**श्री.नितीन लढ्ढा** :- गिरगांवकरजी अजुन पर्यंत तुम्ही सॅर्टीफाईड सुध्दा केलेल नाहीये ना

**श्री.एम.जी गिरगांवकर, शहर अभियंता** :- काय

**श्री.नितीन लढ्ढा** :- की याने आपण दिलेल्या कार्यादेशाच्या किती टक्क्यांपर्यंत त्याने काम केलेले आहे. ते २० लाखापर्यंतच केलय की २ कोटी पर्यंतच केलय की १० कोटी पर्यंतच केलय हे डिफाईन केव्हा होईल. हे आज जर डिफाईन असत तर हे सभागृह सक्षम आहे निर्णय घ्यायला की २० लाख रूपयांचीच लायबिलीटी येणार आहे आणि २० लाख रूपयांच्या लायबिलीटी मध्ये साढेनऊ कोटी रूपयांचा फायदा होतोय तर सभागृह सक्षम आहे निर्णय घ्यायला. परंतू ती अजुन पर्यंत डिफाईनच केलेले नाहीये. ते डिफाईन होण गरजेच आहे ना, तर तस ते डिफाईन करून सविस्तर प्रस्ताव या सभागृहासमोर यायला पाहीजे होता. पण सदस्य त्याच्यापासुन अनभिज्ञ आहेत ना.

**श्री.एम.जी गिरगांवकर, शहर अभियंता** :- मला या अनुषंगाने मला हेच म्हणायच आहे की , आपण काम दिल कार्यादेश दिला तर नंतर आपण आणि त्याने जे काही काम केलेल असेल आता जर आपण ठराव करून MJP ला दिलं तर तो निश्चितच काम करणार नाही एक महिन्याच्या आत नंतर ठराव करून दिला तर एक महिन्यामध्ये जो काही काम केलेल असेल म्हणजे त्याने जो काही डिपीआर केलेला होता याच्यात आपण त्याला पत्र देवु आणि नंतर तो काम करणार नाही. त्याने एक महिन्याच्या कालावधीमध्ये जो काही काम केलेल असेल त्याच्यावरच तो क्लेम करेल आणि त्यानंतर आपण

**श्री.नितीन लढ्ढा** :- हो ना मग आमच म्हणण तेच आहे की हे सगळ डिफाईन करून द्या.

**श्री.एम.जी गिरगांवकर, शहर अभियंता** :- हो त्याच्यामध्ये आता आपण जर डिफाईन केल ना तर तो आताच हे होईल आणि तो निगोशियेशन करेल आणि अर्मीटेटर कडे जाईल आणि अर्मीटेटर ते त्याला.

**श्री.नितीन लढ्ढा** :- हो ना मग आपण जी परिस्थिती आहे ती सभागृहासमोर स्पष्ट करा.

**श्री.एम.जी गिरगांवकर, शहर अभियंता** :- हो आपण जर असे केले तर याच्यामध्ये आपली साढेनऊ कोटी रूपयांची बचत होईल आणि या साढेनऊ कोटी रूपये जे आपले वाचतील त्याच्यामधुन आपण तो खर्च होईल.

**मा.उपमहापौर :-** महापौर महोदया, सर्वात प्रथम साहेब जे सांगत आहेत की आपण त्याला सातव्या महिन्यामध्ये पत्र दिल्यानंतर त्याने काम सुरू केल परंतू त्याने आपल्याकडे अंडरटेकींग केलेल आहे की मी ०५/०८ तारखेला शहर अभियंत्यांसोबत आणि आपल्या त्या जे.ई सोबत जाऊन स्थळ निरीक्षण केले पण साहेबांच म्हणण आहे की त्याने सातव्या महिन्यापासुनच काम केले आहे. मग त्याने जळगांव शहराची भौगालिक परिस्थिती न पाहता डिपीआर तयार केला का अस त्याच म्हणण आहे. नाही त्याने आपल्याला अंडरटेकींग केलेल आहे की त्याने ५/०८ ला शहरात जाऊन पाहणी केलेली आहे आणि डिपीआर बनवला आणि यांच दुसरीकडे म्हणण आहे की सातव्या महिन्यातच त्याने स्थळ निरीक्षण करूनच त्याने डिपीआर बनवला. म्हणजे दोघ बाजु ज्या आहेत त्या दोघ बाजु तफावत दिसुन येते आहे.

(सभागृहामध्ये मा.महापौर, मा.आयुक्त व नगरसचिव तसेच अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**मा.महापौर :-** भाऊ प्लीज आपण आपआपले स्थान गृहण करावे.

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री. विशाल त्रिपाठी** :- त्या ठरावात बदल साठी हा विषय आलेला आहे मग त्याने मग आजच्या याच्या अनुषंगाने सर्वपक्षीय गटनेत्यांनी मिटींग घेतली मग त्या हिशोबाने प्रशासनाने हा प्रस्ताव

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री. कैलास सोनवणे** :- मला एक सांगा आता मतदान ईथे होत नाहीये. आमची भुमिका जी आहे आणि तुम्ही होवू देत नाहीये. काय होईल त्या ठरावाच सांगा.

**श्री.विष्णु भंगाळे** :- नगरसचिव साहेब

**श्री.कैलास सोनवणे** :- आम्ही जर तहकुब ठेवला तर पुढे मुदतवाढचा प्रॉब्लेम येईल. बोल ना विशाल काय बोलायच आहे तर ते.

**श्री. विशाल त्रिपाठी** :- बोललो ना मी तर सगळ किती वेळा मांडु.

**श्री.कैलास सोनवणे** :- पण मग थांबलेली आहे गाडी तर पुढे जायच की नाही जायच, काय साहेब काय करायच नगरसचिव साहेब.

**नगरसचिव** :- आप्पासाहेब पिठासीन अधिकारी सांगतील ना मी कसा काय निर्णय घेवु मी नाही करू शकत.

**श्री.कैलास सोनवणे** :- हो ना मग मतदान मोजा आणि डिसीजन द्या तुम्ही काय द्यायच आहे ते.

**श्री.विष्णु भंगाळे** :- आप्पा आयुक्त साहेबांना विचारा काय करायच आहे ते.

**श्री.कैलास सोनवणे** :- नाही नाही

**श्री.सुनिल महाजन** :- नाही नाही आयुक्त साहेबांना नाही.

**श्री.कैलास सोनवणे** :- महापौरांना आहे हे डिसीजन जे आहे ना पहिली गोष्ट ३८ नाहीये आपली आमची भुमिका वेगळी आहे आणि यांची भुमिका वेगळी आहे. अशा परिस्थितीत काय डिसीजन होत ते तुम्ही द्या डिसीजन होत नसेल तर पुढच घ्यायचा असेल तर पुढचा घ्या.

**श्री.सुनिल महाजन** :- हा विषय नाही तर पुढचे विषय घेता येणार नाही.

**श्री.कैलास सोनवणे** :- नाही नाही पुढचे विषय मान्य आहेत काहीच अडचण नाहीये.

**श्री.सुनिल महाजन** :- स्थायीचे विषय आहेत.

**श्री.कैलास सोनवणे** :- पुढच्या याच्यात काही अडचणी आहेत का काही नाही त्याच्यामध्ये

**मा.उपमहापौर** :- नाही पुढच्या याच्यात काही अडचणी नाहीये आपल्याला.

**श्री.कैलास सोनवणे** :- वाचा पुढचा विषय की हा पहिले ठिक आहे पहिले हा घ्या.

**मा.उपमहापौर** :- नगरसचिव म्हणुन अशा परिस्थितीत त्यांनी मार्गदर्शन

**श्री.कैलास सोनवणे** :- नाही मी काहीच बोलणार नाही.

**मा.उपमहापौर** :- करत नाहीये कारण की आणि पहिल्यांदाच अशी परिस्थिती आहे.

**श्री. राजेंद्र पाटील** :- निसर्ग कन्सलटंन्सीला जो डिपीआर बनविण्याचे जे आदेश दिले आहेत. ते देतांना महासभेची, सभागृहाची कुठलीही मान्यता घेण्यात आलेली नाहीये आणि सदस्यांच्या निदर्शनासही आणलेलं नाहीये. तरी ही प्रशासनाची जबाबदारी आहे आणि जी काही जबाबदारी समजा पुढे निश्चित होईल. न्यायालयीन रिकव्हरी वगैरे ही सगळी जबाबदारी प्रशासनाची राहील आणि आज जो प्रशासनाने प्रस्ताव आणलेला आहे. MJP ला देण्याचा तो मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** आणि तो रेकॉर्डवर घेण्यात यावा.

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.कैलास सोनवणे :-** साहेब त्यांनी त्यांची भुमिका मांडली आहे. आता काय करायच ते सांगा.

**मा.उपमहापौर :-** महापौर महोदया, आता सन्मा.सदस्य राजुभाऊंनी जे सांगीतल की सभागृहाच्या पदाधिकाऱ्यांना, अधिकाऱ्यांना माहिती नसतांना असे जे काही पत्रव्यवहार झालेले असतील आणि असं परस्पर महानगरपालिकेच्या पदाधिकाऱ्यांना विश्वासात न घेता असे काम जर कोणी घेत असेल तर त्यांच्यावर सुध्दा कारवाईचा ठराव मी या ठिकाणी मांडत आहे.

**श्री.दिलीप पोकळे :-** माझ काय म्हणण आहे की आता जो ठराव आपण करत आहेत.

**श्री.विष्णु भंगाळे** :- कुलभुषण भाऊंनी जो ठराव मांडला आहे मी त्याच अनुमोदन देतो.

**श्री.दिलीप पोकळे :-** आता जो हा विषय झालेला आहे की MJP ला द्यायच याच्यामध्ये तो जर सभागृहापुढे आलेलाच नाहीये आणि तो सभागृहाला माहितीच नाहीये तर त्याच्याविषयी कीतीही वाद असतील कुठल्याही प्रकारचे त्याची जबाबदारी सभागृहावर निश्चित होईल.

**श्री.नितीन लढ्ढा :-** बरोबर आहे.

**श्री.दिलीप पोकळे :-** तर

**श्री.विशाल त्रिपाठी :-** बरोबर आहे.

**श्री.दिलीप पोकळे :-** आम्हाला माहितीच नाहीये की काय आहे आणि हे ठरावात नमुद करा की जो प्रस्ताव आता रद्द करण्याच्या संदर्भात जो ठराव आलेला आहे की हे प्रशासनाने त्याच्यावर त्यांच्या स्तरावर कार्यवाही करायची आहे आणि त्याच्या कराराप्रमाणे कोणताही करार झालेला कारण की ते सभागृहाला माहिती नाहीये. तर तो जो करारनामा आहे त्याच्या ज्या लायबिलीटीस तयार होतील त्याची जबाबदारी प्रशासनाची राहील कारण त्याची माहिती सभागृहाला माहिती नव्हत आणि हा जो तुमचा MJP चा प्रस्ताव आलेला आहे तो त्याप्रमाणे घुगे सोहबांनी मांडल्याप्रमाणे त्याला माझ अनुमोदन आहे.

**मा.उपमहापौर :-** साहेब यांनी मांडलेला ठराव आणि वकील साहेबांनी मांडलेल्या ठरावाला आणि राजुभाऊंनी मांडलेल्या ठरावाला , मी मांडलेल्या ठरावाला यांनी (श्री.विष्णु भंगाळे)अनुमोदन दिलेले आहे आणि विशालभाऊंनी मांडलेल्या ठरावाला राजुभाऊंनी अनुमोदन दिलेले आहे. तर हे तिघंच तिघच ठराव इतिवृत्तात नोंद करण्यात यावे.

**श्री.कैलास सोनवणे :-** ठराव घ्यावे लागेल ते

**मा.उपमहापौर :-** हो ठरावात घेण्यात यावे आणि मान्य करण्यात यावा तो मी जो केलेला आहे त्याचापण ठराव करण्यात आलेला आहे.

**श्री. नितीन लढ्ढा** :- मी जी उपसुचना मांडलेली होती ती ठरावामध्ये सुध्दा तशीच्या तशी घेण्यात यावी.

**मा.उपमहापौर :-** चला घ्या आता पुढचा विषय झाल ना आता सर्व

**श्री. कैलास सोनवणे** :- झाल ना आता गोराणेसाहेब

**मा.महापौर :-** निर्णय काय घ्यायचा, निर्णय तर घ्या.

**मा.उपमहापौर :-** निर्णय झाला ना आता की मान्य करा. कारण आमच म्हणण हे आहे की त्याच्यामध्ये अनेक त्रुटी आहेत अशामध्ये ह्या अनेक त्रुटी असल्यामुळे आम्ही तो ठराव मान्य नाही करू शकत ना किंवा प्रशासनाने त्यांनी जो ठराव केलेला आहे किंवा मग त्यांनी जी भुमिका मांडलेली आहे. ती विस्तृतपणे मांडलेली नसल्याकारणाने आम्ही त्याचा विरोध करतोय

**मा.महापौर :-** कोणताही ठराव मान्य करतांना एकतर तो सर्वमताने किंवा बहुमताने मान्य करण्यात येतो आणि आता याठिकाणी विचार केला तर बहुमत नाहीये आणि सर्वानुमत पण नाहीये म्हणजे निर्णय घ्यायला याठिकाणी अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे आणि नियम सुध्दा अस म्हणतो की ३८ सदस्य याठिकाणी असण आवश्यक आहे. त्यामुळे ईथे निर्णय घेण्यासाठी

(सभागृहामध्ये मा.आयुक्त,मा.महापौर तसेच अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**मा.आयुक्त :-** काय आहे की हा जर पास नाही झाला तर कस ॲक्टिव होईल.

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**मा.महापौर :-** तर याच्यामध्ये

**श्री.राजेंद्र पाटील :-** आता साहेबांनीच सांगीतल की जर आपण MJP ला काम दिलं तर आपल्या साढेतिन कोटी द्यावे लागणार आहे आणि त्या एजन्सीला जर दिलं तर

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.राजेंद्र पाटील :-** एक मिनिंट

**मा.महापौर :-** राजुभाऊ काय आहे की हे आपल्याला माहिती नाहीये की पुढे काय अडचणी येणार आहेत.

**श्री.कैलास सोनवणे :-** ताई मी काय म्हणतो की अहो तुम्ही डिस्कर्शन करा ना मॅडमांशी , डिस्कर्शन करा तुम्ही मॅडमांशी अस काय करताय.

**श्री.विष्णु भंगाळे :-** नगरसचिव साहेब तुम्ही चर्चा करून तर घ्या महापौरांशी आणि आयुक्त मॅडमांशी काय आहे तर ते काय करता येईल याच्यावर

**मा.आयुक्त :-** सर याच्यामध्ये मॅडमांनी जी संख्या आता ३८ ची दाखविलेली आहे ती ३८ चीच मॅज्युरिटी पाहीजे हा जुना ठराव जर आपल्याला फेरबदल करायचा असेल किंवा रद्द करायचा असेल तर त्यासाठी आपल्याला ३८ ची मॅज्युरिटी पाहीजे. जर आधी आपला हा ठराव झालेला आहे तर त्या ठरावाच्या अपोझिट हा ठराव आहे म्हणुन आपण हा ३८ च आपल्याला बंधन आहे. जर ३८ ची मॅज्युरिटी बसत नाही आणि हा ठराव पास होत नाही त्याठिकाणी हा ठराव आपला ॲक्टिव्ह होईल .

**श्री.विष्णु भंगाळे :-** बरोबर आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** एकदम बरोबर आहे.

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.विशाल त्रिपाठी :-** मी तेच सांगतोय

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.नितीन लढ्ढा :-** हे जर MJP ला द्यायच असले आणि निसर्ग वाल्याला डिस्कंटिन्यु करायच असेल तर त्याचा कायदेशीर प्रक्रीयेचा प्रशासनाने अवलंब करायला पाहीजे. कायदेशीर प्रक्रीयेचा अवलंब करून निसर्गवाल्याचा करारनामा प्रशासनाने प्रशासकीय पातळीवर संपुष्टात आणायला पाहीजे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** हे त्या ठरावात घ्या आणि ठरावात घेवुन

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो आणि तो संपुष्टात आणुन

**श्री.विशाल त्रिपाठी :-** हे आजच्या ठरावात घ्या

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही

**मा.उपमहापौर :-** तुमच्या ठरावाचा विषय आहे ना तो

**श्री.नितीन लढ्ढा :-** तो करारनामा संपुष्टात आणुन तशा पध्दतीचा परिपुर्ण प्रस्ताव प्रशासनाने सभागृहाच्या समोर ठेवायला पाहीजे आणि मग तो प्रशासकीय दृष्टया संपुष्टात आल्यानंतर काम MJP ला द्यायच की अजुन कुणाला द्यायच किंवा काय द्यायच त्याचा निर्णय सभागृह ठरवु शकतो हा एकमात्र याच्यातील मार्ग आहे.

**मा.उपमहापौर :-** कारण की आजपर्यंत आपण

**श्री.नितीन लढ्ढा :-** कारण काय आहे की याला डिस्कंटिन्यु करण्यासंदर्भात प्रशासनाला पहिले कायदेशीर पावल उचलणे क्रमप्राप्त आहे. जोपर्यंत प्रशासन कायदेशीर पावल उचलत नाही तोपर्यंत या विषयाच धोरण होवू शकणार नाही.

**मा.उपमहापौर :-** कारण की आजपर्यंत आपण त्याला डिस्कंटिन्यु केलल नाहीये. अजुनपर्यंत कन्टीन्यु आहे तो

**श्री.विशाल त्रिपाठी :-** बरोबर आहे.

**मा.उपमहापौर :-** हेच सांगत आहेत ना भाऊ तर

**श्री.नितीन लढ्ढा :-** म्हणजे तो कामही करत नाहीये आणि प्रशासन त्याला विचारतही नाहीये कि तुला कार्यादेश दिलेला आहे तिन महिन्यापासुन तर तु काय काम केलय आमची डेडलाईन जवळ येतेय ३१ तारखेची आणि तु डिपीआर केव्हा सादर करतोय परिपुर्ण , डिपीआर म्हणजे केंद्र शासनाच्या अमृत-२ च्या मार्गदर्शक तत्वानुसार आणि तो जर का तसा नसेल तर तो तसा सर्टीफाईड करायला पाहीजे आणि की तुमचा डिपीआर जो तुम्ही सादर केलेला आहे हा कुठल्याच गाईडलाईन फॉलो करत नसल्याने हा डिपीआर आम्ही का स्विकारावा याच्या संदर्भातील उत्तर त्या मक्तेदाराकडुन घ्यायला पाहीजे. मक्तेदाराचीच मुजोरी चाललेली आहे प्रशासनाच्या माध्यमातुन

**मा.आयुक्त :-** MJP लाच का द्याव अस म्हणत आहेत प्रशासनाने सांगा गिरगांवकर साहेब तुम्ही सांगा तुमच काय मत आहे सांगा ना

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**मा.आयुक्त :-** आता तुम्हाला कुठेतरी एक्झीट करावी लागेल येथुन याच्यामधुन तुम्ही सांगा आपण जर येथे स्टॉप झालो तर .

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.एम.जी.गिरगांवकर,शहर अभियंता :-** मी काय सांगणार मॅडम तुम्ही सांगा.

**मा.उपमहापौर :-** मुदत संपलेली नाहीये त्याची

**श्री.जितेंद्र मराठे :-** आपण एक्झिट केली पाहीजे.

**मा.उपमहापौर :-** तुम्ही आयुक्तांना ॲरोगेट करताय की तुम्ही या प्रकल्पाचे तुम्ही प्रमुख आहेत ते म्हणत आहेत की तुमच मत सांगा परंतू तुम्ही उठत सुध्दा नाहीये. म्हणजे यांना प्रशासनाच्या आदेशांची अंमलबजावणी करण्याची काही हे नाहीये. म्हणजे प्रशासकीय अधिकारी असतांना आपण त्यांना वरून सांगत आहात आयुक्त म्हणुन परंतू ते उठत सुध्दा नाहीये मॅडम सांगायला.

**श्री.एम.जी.गिरगांवकर,शहर अभियंता :-** याच्याबाबतीत मॅडमांनी मला कुठलेही आदेश दिलेले नाहीये आणि अमृत जे आहे याच्याबाबतीत आणि आता तुम्ही म्हणत आहात की तुम्ही मा.आयुक्तांनी दिलेल्या आदेशांचे पालन करीत नाही. जर माझ्याकडुन चुकी झाली असेल तर मी दिलगीरी व्यक्त करतो.

**श्री.विष्णु भंगाळे :-** माईक जवळ घेवुन बोला साहेब

**मा.उपमहापौर :-** मॅडम आपण जर माईक आपण त्यांना जे आदेश द्यायचे असतील ते आपण माईक चालु करून त्यांना द्यावेत आणि तुम्हाला सुध्दा विनंती आहे की त्यांची रेकॉर्डीग करावी म्हणुन व्हिडीओ रेकॉर्डीग करावी.

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.कैलास सोनवणे :-** गिरगांवकर साहेब तुम्ही काय बोलले काही ऐकु आले आहे नाही मॅडमांनी जे सांगतीले ते (सभागृहामध्ये श्री.एम.जी.गिरगांवकर व सन्मा.सदस्य.श्री.कैलास सोनवणे व इतर अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.कैलास सोनवणे :-** मॅडम हे चुकीच आहे तुम्ही सरळ शासनाला पत्र पाठवुन द्या. पाठवा की

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.कैलास सोनवणे :-** मॅडम काही पध्दत आहे की नाही. एकतर आपण जळगांव महापालिकेत आलेले आणि तुम्ही त्याच्यात आयुक्तांच्या आदेशाची पायमल्ली करता आहे का हो काही पध्दत आहे की नाही. मॅडम पाठवा ना शिस्तभंगाची कारवाईचे पत्र पाठवा शासनाला यांचे तुम्ही करू शकता की शासन करेल हे

**मा.उपमहापौर :-** नाही आपल्याला ठराव करावा लागेल आणि मग शासनाला पाठवावा लागेल

**श्री.कैलास सोनवणे :-** नाही नाही ठरावाची गरज नाहीये. मला सांगा मॅडम मला अज्ञान आहे यांच्यावर कारवाई करण्यासाठी काय करावे लागेल. शासनाकडे पाठवावे लागेल तुम्हाला की तुम्ही ईथेच करू शकतात. मला वाटत हे शासनाकडेच पाठवायला पाहीजे. पाठवा बर का, पाठवा ना ही आमची मागणी आहे मी तुम्हाला विचारलेही की कुठे पाठवावे लागेल ते.

**मा.उपमहापौर :-** आप्पांच्या मागणीला माझे अनुमोदन आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** उठत नाहीत ते , चालु महासभेमध्ये तुम्ही काहीपण बोलत आहेत.योग्य नाहीये साहेब हे महासभेमध्ये , मॅडम महापौरताई हा जो सगळ्यांच्या समोर जो प्रकार चालु आहे ना तो तुम्ही खपवुन घ्याल मी तर खपवुन घेणार नाही.

**श्री.अनंत जोशी :-** महापौरताई

**श्री.कैलास सोनवणे :-** एक मिनिंट बंटीभाऊ, तुम्हाला एक विनंती आहे मी स्वत: या गोष्टीचा पाठपुरावा करेल यांच्या शिस्तभंगाच्या कारवाईचा प्रस्ताव पाठवा शासनाकडे अशी पध्दत नाही चालणार.

**श्री.अनंत जोशी :-** महापौरताई

**श्री.कैलास सोनवणे :-** अस नाही चालणार एकतर बोगस प्रस्ताव घेवुन यायचे आणि प्रत्येकाला घरोघरी जावुन भेटुन यायच. प्रत्येक प्रत्येकाला की हा अस म्हणतोय तो तस म्हणतोय आम्हीच करायच का हे रिकामे धंदे करायचे का ?

**श्री.अनंत जोशी :-** महापौरताई मी ज्येष्ठ सदस्यांनी मागणी केल्यानुसार मी पण मागणी करतो की त्यांच्यावर कारवाई व्हावी आणि आपण त्यांना सक्त सुचना कराव्यात आणि कारण की कालच्या मिटींगमध्ये मी जे काही विषय मांडले होते ते मी येथेही मांडलेले आहे. ते खरच खुप हरेशमेंट करतात बर का खुप झडतात खुप देतात , खुप त्रास देतात आणि हे अनुभव तुम्हाला खुप लोक सांगतील आणि याच्यापुढे तुम्ही खुप काळजी घ्या आणि कैलासआप्पांच्या मागणीला आमचा पाठींबा आहे हे करायला.

**श्री.विष्णु भंगाळे :-** महापौर महोदया पुढच घ्या.

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.कैलास सोनवणे :-** मॅडम आम्ही काय म्हणतोय की हे कार्यशाळा पण घ्या एक वेळा काय आहे आमचा विषय पण झाला आहे दोन तिन वेळा की हे याच्या अगोदरच व्हायला पाहीजे होत आणि काय आहे की इतके दिवस होवुन जातात ना की आमच्याही स्मृतीतुन हे निघत जात. तर तुम्ही कार्यशाळा घ्या घेता आली तर आठ दिवसांत महिन्याभरात तर पहा. म्हणजे नगरसेवकांना पण काही नियमांची माहिती भेटु शकेल ना. अशा परिस्थिती जे प्रश्न उदभवतात ना तर ते उदभवणार नाही.

**मा.उपमहापौर :-** आप्पासाहेब मी काय म्हणतो की मागे गोरणेसाहेबांनी एक प्रस्ताव आणला होता की सभा कामकाज चालवण्यासंदर्भात बायोलॉज तयार करायचे आहेत आणि त्याचा आपल्या सर्वांना आणि सभागृहाचा फायदा होणार आहे आणि आपला बायोलॉज नाही आहे तर तो बायोलॉज सुध्दा तयार करून घेण्यासंदर्भात माझी याठिकाणी सुचना आपण ती लक्षात घेवुन ती नोंद घ्यावी.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आप्पा मी काय म्हणतोय.

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.कैलास सोनवणे :-** मॅडम एक कार्यशाळा घ्या.

**श्री.सुनिल महाजन :-** आप्पा तुम्ही मांडा.

**श्री.कैलास सोनवणे :-** झाल ना मी मांडले ना

**श्री.सुनिल महाजन :-** नाही आप्पा तुम्ही मांडा.

**श्री.कैलास सोनवणे :-** झाल ना मी मांडले ना

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.कैलास सोनवणे :-** काय आहे आता पुढची सभा चालवायची का

**श्री.नितीन लढ्ढा :-** आप्पा जो पर्यंत या विषयाचा निर्णय होत नाही ना

**श्री.कैलास सोनवणे :-** काय

**श्री.नितीन लढ्ढा :-** पहिल्या विषयाचा निर्णय होत नाही तोपर्यंत

**श्री.कैलास सोनवणे :-** झाला ना मग आता मी मांडले ना

**श्री.नितीन लढ्ढा :-** तुम्ही मांडले परंतू त्याचा निवाडा होत नाही ना कारण काय आहे की राजु भाऊंनी जी सुचना मांडली. तरी ३८ संख्या नसल्याकारणाने त्या विषयावर निवाडाच होवू शकत नाही. म्हणुन हा विषय आपल्या या सभागृहामध्ये यायच्या अनुषंगानेच चर्चा झालेल्या आहेत की निसर्गला कामाच्या अनुषंगाने दिलेला कार्यादेश तो रद्द करण्याच्या संदर्भात प्रशासनाने हा प्रस्ताव परिपुर्ण पध्दतीने पुढच्या महासभेमध्ये आणावा भलेही तो दोन दिवसांत आणायचा तर दोन दिवसांत आणा. परंतू परिपुर्ण प्रस्ताव आणावा आणि त्याच्यावर निर्णय घेता येईल आणि तोपर्यंत हा विषय तहकुब करण्यात यावा. कारण हा अनिर्णित आहे ना

**श्री.कैलास सोनवणे :-** किती उशिर लागेल आणि तुम्ही सांगत आहेत की तहकुब करावा लागेल.

**श्री.नितीन लढ्ढा :-** अहो जर याच्यावर कायदेशीर मान्यच नाही ना

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.कैलास सोनवणे :-** काय एकतर तुम्ही ऐकत नाही. आतापर्यंत आपण चर्चाच करत होते.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** नाही आप्पा भुमिका मांडुन दिली ना आपली

**श्री.कैलास सोनवणे :-** ते डिसीजन होत नाहीये ना.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** पार्टीने जे ठरवले होते तेच बोलतोय मी

**श्री.कैलास सोनवणे :-** मग काय करता आहे तुम्ही

**श्री.विशाल त्रिपाठी :-** आपण थोडी काही करतो आहे. त्यांनी सुरूवातीला मांडलय ना वास्तविक तस पाहीले तर हा प्रस्ताव काय आला आहे. काय आला आहे आणि सर्व पक्षीय गटनेत्यांनी झालेला आहे आणि त्या विषयावर सर्व पक्षांचे गटनेत्यांमध्ये जर MJP च ठरली होती तर मग आज

**मा.उपमहापौर :-** नाही नाही भाऊ हे जर इतिवृत्त पाहीले आपण तर शुचिताताईंचा सुध्दा विरोध होता आणि माझा व त्यांचाही विरोध होता. महापौरताईंचा सुध्दा होता.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** बरोबर आहे भाऊ

**मा.उपमहापौर :-** त्यादिवशी सुध्दा हेच ठरल की महासभेमध्ये याच्यावर चर्चा करू. त्याच्यावर आम्ही काय बोलले त्याच देखील नोंद इतिवृत्तात आहे ते देखिल मी दाखवतो.

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.विशाल त्रिपाठी :-** बरोबर आहे भाऊ प्रस्ताव का आला मी तेच सांगतोय ना भाऊ

**श्री.सुनिल महाजन :-** जाऊ द्या ना बाकीच्या गोष्टी कशाला करताय आपण

**श्री.कैलास सोनवणे :-** जाऊ द्या ना तहकुब करायचा आहे ना हा विषय

**श्री.नितीन लढ्ढा :-** आप्पा कस आहे. विशालजी हा प्रस्ताव जो आहे ना तो परिपुर्ण नाही आला आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी:-** पुढील महासभेची तारीख ठरवुन घ्या आप्पासाहेब

**श्री.कैलास सोनवणे :-** पुढील महासभा केव्हा घेणार आहे तारीख सांगा.

(सभागृहामध्ये मा.आयुक्त, मा.महापौर व नगरसचिव आपआपसांत तसेच अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.सुनिल महाजन :-** काय तारीख ठरवायची पुढच्या महासभेची

(सभागृहामध्ये मा.आयुक्त, मा.महापौर व नगरसचिव आपआपसांत तसेच अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.नितीन लढ्ढा :-** मला एक सांगा की , आधी तुम्ही डोक्यातुन तो विषय काढुन टाका की निधी परत जाईल. हा निधी परत जाईल हा बागुलबुवा झालेला आहे. हा निधी परत जाणार आहे तस नाहीये. हि योजना जी आहे हि पाच वर्षाची योजना आहे. डिपीआर तुम्ही केव्हाही केला परंतू तो परिपुर्ण सादर करण्याची आपल्याला संधी आहे म्हणुन त्याच्या दृष्टीकोनातुन विचार करा. कोणाला द्यायचा कोणत्या कंपनीला द्यायचा परंतू पुर्ण डिपीआर हा परिपुर्ण डिपीआर सादर करतांना सुध्दा त्याला कार्यादेश दिलेले आहेत. त्यला अगोदर कायदेशीररित्या संपवणे हे करायच

आहे. त्याला कारण त्याला कायदेशीर रित्या संपवुन हे केल्यानंतर कारण काय आहे की त्याला कायदेशीररित्या लायबिलीटी या महानगरपालिकेवर १०० टक्के येणार आहे. म्हणुन प्रशासनाने त्याविषयाची काळजी पहिले घ्यायची आहे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** नाही याच्यात विविध अडचणी आहेत भाऊ

**श्री.सुनिल महाजन :-** राजुभाऊ विषय संपवा आता. राजुभाऊ विचारून घ्या मामांना आता

**श्री.राजेंद्र पाटील :-** आता आपण साढेबारा कोटी दिले किंवा साढेतिन कोटी दिले तर त्याच्यामध्ये आपण अडचणीमध्ये येणार आहेत.

**श्री.नितीन लढ्ढा :-** राजुभाऊ आपण मामांशी पण चर्चा करू. त्यांना याचे जे परिणाम येणार आहे की नाही ते समजावुन सांगेल मी त्यांना , कारण हा आर्थिक याचा विषय येईल पुढे , म्हणुन कायदेशीररित्या हे संपुष्टात आणणार नाहीत. या निसर्गवाल्याला तोपर्यंत हे महानगरपलिकेच्या हिताच नाहीये एवढच माझ म्हणण आहे आणि तुम्ही कुठल्याही वकीलाशी चर्चा करून घ्या लागली तर , कारण कुठलाही कायदेशीर चाराही नाहीये ना

**श्री.विशाल त्रिपाठी :-** भाऊ आता तुम्ही म्हणत आहात की कायदेशीर आम्हाला हे मान्य आहे परंतू आता अस झालय की आपल्या शहराच्या सभागृहाला अडचणीत आणण्याचाच प्रकार आहे का ?

**मा.उपमहापौर :-** आमचही म्हणण तेच आहे ना विशालभाऊ अडचण होणारच आहे ना.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** हो, जर

**मा.उपमहापौर :-** म्हणजे यांनी करायच आणि त्याचे भोग आपण भोगायचे का?

**श्री.विशाल त्रिपाठी :-** मी काय म्हणतो की माझी एक विनंती आहे फक्त सभागृहापुढे की जी आपली जी अमृत-२ ची योजना आहे. त्याची जी प्रक्रीया शासन स्तरावर सुरू आहे. राज्य शासन आणि केंद्र शासन आता आपण हा विषय तहकुब करायचा हे सभागृहात सुरू आहे. तर माझी विनंती आहे की सभागृहाच्या भावना ज्या आहेत की एक पत्र त्यांना पाठवा की आपल्या डिपीआरसाठी विलंब होतोय आणि आम्हाला थोडी एक मुदत मिळावी अस एक पत्र गुलाबभाऊंना, गिरीषभाऊंना , मामांना आणि जे शसनाचे प्रतिनिधी आहेत त्यांना एक पत्र तर आपण पाठवु शकतो ना की आम्हाला मुदत मिळावी म्हणुन आपण एक विनंती पत्र तर पाठवु शकतो ना त्यांना तर पाठवा महापौरांच एक पाठवा , आयुक्तांच एक पाठवा आणि सभागृहाच्या भावना त्यांच्या लक्षात आणा की असा असा विषय आहे आणि सभागृहात अशी चर्चा झाली सर्वांचा उल्लेख करा. कारण की आपल्याला त्यांना कारणही द्यावे लागतील की सभागृहात असा प्रस्ताव आमच्या समोर आठ तारखेला आला आणि वेळ कमी आहे म्हणुन आम्हाला

**मा.महापौर :-** जी सर्वपक्षीय मिटींग झाली त्यावेळेला मी सहा महिन्यांची मुदत वाढविण्याची मी मामांना पत्र दिलेले आहे. परंतू मामांनी सांगीतले की मुदतवाढ मिळणार नाही जस आहे तस सादर करा म्हणुन मी स्टॉप केल नाहीतर आतापर्यंत त्यांच्यापर्यंत ते पत्र गेल असत.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** महापौरताई पण मग आता ती परिस्थिती नाहीये ना.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हि दिशाभुल करण्यात आलेली आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** कोणी केली दिशाभुल.

**श्री.कैलास सोनवणे :-** कोणी केली दिशाभुल

**श्री.नितीन लढ्ढा :-** कोणी केली आहे हे तर सगळ्यांनाच माहिती आहे ना

**श्री.विशाल त्रिपाठी :-** नाही नाही नितीनभाऊ हे पहा कोणीही दिशाभुल केलेली नाहीये.

**श्री.कैलास सोनवणे :-** आम्ही डायरेक्ट बोलतो टोकावर

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.कैलास सोनवणे :-** काय आहे माहिती आहे का की सर्वानुमते तहकुब झाला ना.

**मा.उपमहापौर :-** तहकुब

**श्री.कैलास सोनवणे :-** काय आहे माहिती आहे का अमृतचा हा विषय खरोखरच इतका चांगला आहे की ही योजना इतकी चांगली आहे की त्याचा अर्थ काय आहे माहीती आहे का अटल मिशन ऑफ अर्बन ट्रॉन्फॉरमेशन असा म्हणजे नागरी जिवनमान उंचावणे. आता जळगांवची परिस्थिती बघितली आहे का परिस्थिती जळगांवची

**श्री.नितीन लढ्ढा :-** खड्डे किती आहेत वो आप्पा

**श्री.कैलास सोनवणे :-** मग , चला पुढचा विषय घ्या. सर्वानुमते बोला ना हो भाऊ

**श्री.सुनिल महाजन:-** सर्वानुमते तहकुब

**श्री.राजेंद्र पाटील :-** पुढची तारीख काय आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** तारीख

**श्री.नितीन लढ्ढा :-** राजुभाऊ काय झालेल आहे की हा डिपीआर ३१ तारखेलाच जायला पाहीजे असा कुठेही विषय नाहीये.

**श्री.राजेंद्र पाटील :-** नितीनभाऊ सर्वानुमते तहकुब करायचा आहे की ?

**श्री.नितीन लढ्ढा :-** सर्वानुमते तहकुब

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**मा.महापौर :-** काय निर्णय घ्यायचा याच्यावर

**श्री.कैलास सोनवणे :-** झाला का विषय

**मा.महापौर :-** सभागृहापुढे मांडा.

**श्री.कैलास सोनवणे :-** झाला ना विषय

**श्री.सुनिल महाजन:-** तहकुब सर्वानुमते तहकुब

**श्री.नितीन लढ्ढा :-** पुढच्या महासभेमध्ये धोरण ठरवुन घेवु आपण

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**मा.उपमहापौर :-** साहेब अनुमोदन घ्या ना राजुभाऊंचे

**श्री.कैलास सोनवणे :-** राजुभाऊंचे अनुमोदन आहे तुमची सुचना आहे ना

**मा.उपमहापौर :-** अनुमोदक म्हणुन कोण आहे.

**नगरसचिव :-** अनुमोदक म्हणुन कोण आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** यांचे अनुमोदन आहे आणि त्यांची सुचना आहे .

**श्री.राजेंद्र पाटील :-** अनुमोदन आहे. तहकुबचे आणि जे सांगतीले आहे मी त्याचे आणि पुढची महासभा लवकर काढण्यात यावी.

**मा.महापौर :-** सर्वानुमते विषय क्रं. ०१ तहकुब करण्यात येत आहे. पुढील महासभेची दिनांक ही लवकरच ठरवली जाईल.

(सभागृहामध्ये मा.महापौर व अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ९३४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महासभा ठराव क्रं.८६९ दि.०८/०८/२०२२ अन्वये प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नियुक्तीची निविदा प्रसिध्द करून सल्लागार नियुक्त करण्याचे धोरण मंजुर केलेले आहे. त्यानुसार नविन निविदा मागवुन सल्लागार नियुक्तीमध्ये नवीन निविदेसाठी किमान २ महिने कालावधी, तसेच डिपीआर तयारसाठी ५-६ महिने कालावधी लागु शकतो व न्यायालयीन वादही उदभवु शकतात.

जळगांव महानगरपालिकेने यापुर्वीच निविदा मागवुन सल्लागार यांची सुची तयार केलेली असल्याने त्यास स्थायी समिती ठराव क्रं.११४ दि.२०/०६/२०१९ अन्वये मान्यता दिलेली आहे. यात Water Supply and Sewewrage Scheme अंतर्गत कामांसाठी १५ ते २० वर्षांचा या क्षेत्रातील अनुभव असलेले दि निसर्ग कंन्स्ल्टंसी, नाशिक यांना प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची २.५० टक्के दराने पाणी पुरवठा व मलनिस्सारण सेवेचा प्रकल्प अहवाल तयार करणेसाठी यापुर्वीच नियुक्ती केलेली आहे.

कामाची निकड लक्षात घेता तसेच दि निसर्ग कंन्स्ल्टंसी, नाशिक यांनी सादर केलेला अहवाल अमृत २.० च्या मार्गदर्शक सुचनांनुसार नसल्याने त्यांची नियुक्ती रद्द करून महासभा ठराव क्रं. ८६९ दि.०८/०८/२०२२ मधील प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांचे नियुक्तीचे धोरणात बदल करून या कामासाठी शासन

परिपत्रकातील मुद्दा क्रं. ३ (अ) नुसार महाराष्ट्र जिवन प्राधिकरण यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणुन नियुक्ती करणेबाबत बदलाचा प्रस्ताव प्रशासनाने महासभेच्या मान्यतेसाठी सादर केलेला आहे.

परंतू सभागृहात झालेल्या चर्चेनूसार तसेच सन्मा.सदस्य यांनी सभागृहात केलेल्या सूचनांनूसार केंद्र शासनाच्या अमृत २.० अभियाना अंतर्गत पाणी पुरवठा व मलनिस्सारण योजनेसाठी प्रशासनाने यापूर्वी निसर्ग कंन्सलटन्ट यांना महासभेला अवगत न करता परस्पर कार्यादेश दिलेले असून सदर कार्यादेश देतांना त्याबाबत महासभेला अवगत सुध्दा केलेले नाही. तसेच दि.०८/०८/२०२२ रोजी झालेल्या महासभेत सुध्दा याबाबतची भुमिका प्रशासनाने स्पष्ट केलेली नाही. प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांचे नियुक्ती बाबत दि.०८/०८/२०२२ रोजी झालेल्या महासभेत सभागृहाने विस्तृत चर्चा करुन महासभा ठराव क्रं. ८६९ दि.०८/०८/२०२२ अन्वये अमृत योजनेच्या प्रोजेक्ट मध्ये डि.पी.आर तयार करण्यासाठी प्रशासनाने निविदा मागवुन एका एजन्सीची नियुक्ती करणे बाबतची सुचना केलेली होती. परंतु सदर ठरावाच्या अनुषंगाने प्रशासनाने दोन महिन्यांपेक्षा जास्त कालावधी झालेला असुन सुध्दा निविदा प्रक्रिया न करता परस्पर निसर्ग कन्सलटंन्सी या एजन्सीची नियुक्ती केलेली आहे.

दि. निसर्ग कंन्सल्टंसी या एजन्सीबाबत यापुर्वी केलेल्या कामांमध्ये बऱ्याच चुका झालेल्या आहेत आणि आता सुध्दा त्यांनी विहीत पध्दतीने डिपीआर केलेला नसल्याने निसर्ग कंन्सलटन्ट यांना डिसकंटीनिव्हयू करणे कामी प्रथम त्यांना याबाबत कायदेशिररित्या नोटीस देऊन त्यांची केलेली नियुक्ती रद्द केल्यानंतरच महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची याकामी नियुक्ती करणे कामी महासभेसमोर प्रस्ताव येणे आवश्यक आहे. प्रशासनाने महाराष्ट्र जिवन प्राधिकरण यांची नियुक्ती करणेबाबतचा सादर केलेल्या प्रस्तावास सभागृहाने मान्यता दिल्यास निसर्ग कंन्सलटन्ट मे.न्यायालयात दाद मागू शकतो व भविष्यात जळगांव महानगरपालिकेवर कोटयावधी रुपयांचा आर्थिक बोजा पडू शकतो. त्यामुळे प्रथम:ता प्रशासनाने नियुक्त केलेल्या निसर्ग कंन्सलटंन्ट यांना दिलेली नियुक्ती रद्द करावी लागेल त्यासाठी प्रशासनाने सर्व कायदेशीर बाजू तपासून निसर्ग कंन्सलटंन्ट यांची केलेली नियुक्ती रद्द करणेबाबत पूढील योग्य ती कायदेशीर कार्यवाही करावी. जेणेकरून भविष्यात कायदेशीर अडचणी निर्माण होणार नाहीत. तसेच याबाबत भविष्यात आर्थीक बाबी संदर्भात काही आक्षेप निघाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची राहील.

प्रशासनाने सादर केलेला प्रस्ताव कायदेशिररित्या व आर्थिकदृष्टया महानगरपालिकेच्या हिताचा नसल्याने तसेच यामध्ये बऱ्याच चूका झालेल्या असल्याने त्यावर योग्य ती कायदेशिर कार्यवाही करावी तसेच यासंदर्भात सभागृहात झालेल्या विस्तृत चर्चेनूसार केंद्र शासनाच्या अमृत २.० अभियाना अंतर्गत पाणी पुरवठा व मलनिस्सारण योजनेबाबतचा प्रशासनाने सर्व कायदेशीर अभ्यास करुन भविष्यात कोणतीही कायदेशीर अडचण येणार नाही व महानगरपालिकेला नाहक आर्थीक भूर्दंड लागणार नाही. या सर्व बाबींचा अभ्यास करुन शहर अभियंता यांनी सादर केलेल्या प्रस्तावातील निसर्ग कंन्सलटंन्ट ही एजन्सी तांत्रिकदृष्टया अयोग्य आहे किंवा कसे ? याबाबत सुस्पष्ट कारणांसह कायदेशीररित्या निसर्ग कंन्सलटंन्ट या एजन्सीला दिलेला कार्यादेश रद्द करायचा किंवा कसे ? याचा सुधारित सविस्तर परिपूर्ण प्रस्ताव तात्काळ तयार करुन पुढील महासभेत सादर करावा. सुधारित प्रस्ताव सादर करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे. त्यास्तव प्रशासनाने सादर केलेला प्रस्ताव सुधारीत तयार करुन सादर करणे कामी तहकूब करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजूर**

**अनुकूल -** ५८

**सूचक** **:- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक** **:- पाटील राजेंद्र झिपरु**

**नगरसचिव विषय क्रं. २ :-** मनपा आरोग्य विभागाकडील मशिन अनुक्रमे १) एम एच १९ सी.व्ही.२०२८, २) एम एच १९ सी.व्ही.२०२९ (Backhoe Loader) चे Hyd Pump Single Stage, नविन पार्टस, नविन ऑईल टाकणे कामी येणारा एकूण रक्कम रुपये २,३२,४४४/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री. नितीन लढ्ढा** :- मंजुर आहे.

**नगरसचिव** :- अनुमोदक कोण आहे.

**श्री. नितीन बरडे** :- माझे अनुमोदन आहे व मंजुर आहे

**श्री. कैलास सोनवणे** :- साहेब २ , ३ आणि ४ सारखेच आहेत ना मान्य आहे.

**नगरसचिव** :- हो

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ९३५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महानगरपालिका आरोग्य विभागाकडील Backhoe Loader घनकचरा प्रकल्प येथे जळगांव शहरातुन संकलीत होणारा कचरा डपींग करण्याकामी अत्यावश्यक सेवेत कार्यरत असून अनुक्रमे १) MH 19 CV 2028, MH 19 CV 2029 १) मागणी क्रं.११५९०, दि.१०/०९/२०२२ व टिप्पणी अहवाल २) मागणी क्रं.१५४१३, दि.३०/०८/२०२२ व टिप्पणी अहवाल तांत्रिक तपासणी कामी वाहन विभागास प्राप्त झाला असुन त्यानुसार दोन्ही Backhoe Loader ची तांत्रिक तपासणी केली असता दोन्ही वाहनाचे Hyd Pump Single Stage हा योग्य कार्यक्षमतेने कार्य करत नाही. त्यामुळे MH 19 CV 2029 चा Hyd Pump Single Stage खोलून चेक करणे कामी नाशिक येथे पाठविला असता संबंधीत कंपनीने नविन पंप टाकणे बाबत निर्देश दिले.

सदर बाब ACE या कंपनीचे मॅनेजर यांना कळविले असता त्यांनी नाशिक डिव्हीजनचे इंजिनिअर यांना Backhoe Loader ची तांत्रिक तपासणी कामी जळगांव येथे पाठविले. ACE कंपनीचे इंजिनिअर यांच्या समवेत दोन्ही Backhoe Loader ची तांत्रिक तपासणी केली असता नमूद पार्टस् फिटींग करुन, ऑईल बदली करुन Backhoe Loader कार्यान्वित करता येईल असे तांत्रिक तपासणी अंती सांगीतले. सदर दोन्ही मशिन उत्पादीत वर्ष जानेवारी-२०१९ ची असुन स्थायी नोंदणी दि.१४/०३/२०१९ रोजी उपप्रादेशिक परिवहन कार्यालय जळगांव यांच्याकडे केलेली आहे.

सदर मशिनला १४ सप्टेंबर २०२२ पावेतो ३ वर्ष ९ महिने इतका कालावधी पुर्ण झालेला असुन वॉरंटी कालावधी संपुष्टात आलेला आहे. आज पावेतो सदर मशिनचे Hyd Pump Single Stage चे काम यापुर्वी निघालेले नाही. दोन्ही मशिनचे ११००० तासापेक्षा जास्त कालावधी पुर्ण झालेला आहे.

सदर Backhoe Loader ला तांत्रिक तपासणी अंती खालील तक्त्यात नमुद पार्टस् ऑईल नविन टाकणे आवश्यक आहे.

| मनपा मशिन क्र.१) एम एच १९ सी.व्ही.२०२८, २) एम एच १९ सी.व्ही.२०२९ (Backhoe Loader) | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | वाहनातील दुरुस्तीचे कामे | | |
| 1 | HY. Pump Parker -02 Nos | 4 | Strainer -02 Nos |
| 2 | HY. Oil HLP 46 20 LTRS - 10 Nos | 5 | HY. Oil Flushing Charges - 02 Nos |
| 3 | HY. Oil Filter -02 Nos | 6 | Service Charges - 02 Nos |

वर नमुद दोन्ही Backhoe Loader चे वाहन चालक यांनी दिलेल्या मागणी व टिप्पणी रिपोर्ट प्रमाणे वर तक्त्यात नमुद केलेप्रमाणे नविन पार्टस्, ऑईल नविन टाकणे कामी अधिकृत विक्रेते मे.KPS Infrastructures, Mumbai-Agra Highway, Nashik यांच्याकडील कोटेशन नं.KPS/2020-21/07 दि.११/०९/२०२२ अन्वये खर्च रक्कम रु.२,३२,४४४/- मात्र अपेक्षित असुन सदरचे दर बाजारभावाशी सुसंगत असल्याने सदर खर्चास तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५ (२) (२) नुसार निविदा न मागविता मे.KPS Infrastructures, Mumbai-Agra Highway, Nashik यांना रक्कम रु.२,३२,४४४/- मात्रचा कार्यादेश देण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल -** **५८**

**सूचक** **:- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक** **:- बरडे नितीन मनोहर**

**नगरसचिव विषय क्रं. ३ :-** मनपा आरोग्य विभागाकडील वाहन क्रं.एम एच १९ सी.वाय.४२५४ (वॉटर टँकर) या वाहनाची दुरुस्ती करणे कामी येणारा एकूण रक्कम रुपये ४९,१२०/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री. नितीन लढ्ढा** :- मंजुर आहे.

**श्री. नितीन बरडे** :- माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ९३६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, आरोग्य विभागाकडील वाहन क्रं.एम एच १९ सी.वाय.४२५४ (वॉटर टँकर) हे आरोग्य विभागात अत्यावश्यक सेवेत कार्यरत आहे. सदर वाहनाचे खालीलप्रमाणे दुरुस्तीचे कामे नविन स्पेअर पार्टससह व मजुरीसह करणे आवश्यक व गरजेचे आहे.

| मनपा वाहन क्र.एम एच १९ सी.वाय.४२५४ (वॉटर टँकर) | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | वाहनातील दुरुस्तीचे कामे | | |
| 1 | TMGO Diesel Engine Oil C14 Plus 15W40 | 13 | Synthetic Grease Pack 3 KG |
| 2 | Oil Filter Element Spinon BS3/4 -1 nos | 14 | Oil Seal Front Hub BS1/2/3/4 -2 nos |
| 3 | Fuel Filter Element BS3/4 -1 nos | 15 | Oil Seal (135X170X15) Double LIP -2 nos |
| 4 | Filter Element Protect Filter BS1 - 4-1 nos | 16 | Oil Seal (125X150X12) -2 nos |
| 5 | Set of 2516 Air Filter Element -1 nos | 17 | Taper Roller BRG 32308 BS1/2/3/4 -1 nos |
| 6 | Cotton Piece -8 nos | 18 | Taper Roller BRG 565/562 BS1/2/3/4 -1 nos |
| 7 | Power Steering Fluid -1 Litre | 19 | Taper Roller BRG Outer 32217 BS1/2/3/4 -1 nos |
| 8 | Cogged V Belt 995 MM Long (Improved) -1 nos | 20 | Taper Roller BRG Inner683/72 BS1/2/3/4 -1 nos |
| 9 | Poly V Belt 8PK 1260L -1 nos | 21 | Brake Lining Kit (STD) 410X180NA1707 BS1-6-4 nos |
| 10 | TMGO Gear oil 80W90 Long Life | 22 | AL Rivets (10/12) |
| 11 | TMGO RA oil 80W140 Long Life | 23 | All Labour Charges |
| 12 | Tata Genuine Coolant 5 Ltr | 24 | -- |

वरील नमुद वाहनाचे वरील तक्त्यात नमुद केलेप्रमाणे दुरुस्तीची कामे नविन पार्टस्, / मजुरीसह करणे कामी अधिकृत विक्रेते मे.उज्वल ऑटोमोटीव्ह,प्रा.लि.जळगांव यांच्याकडील इस्टिमेट दि.२३/०८/२०२२ अन्वये खर्च रक्कम रु.४९,१२०/- मात्र अपेक्षित असुन सदरचे दर बाजारभावाशी सुसंगत असल्याने सदर खर्चास तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५ (२) (२) नुसार निविदा न मागविता मे.उज्वल ऑटोमोटीव्ह,प्रा.लि.जळगांव यांना रक्कम रु.४९,१२०/- मात्रचा कार्यादेश देण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल -** **५८**

**सूचक** **:- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक** **:- बरडे नितीन मनोहर**

**नगरसचिव विषय क्रं. ४ :-** मनपा आरोग्य विभागाकडील वाहन क्रं.एम एच १९ सी.वाय.४२९८ (वॉटर टँकर) या वाहनाची दुरुस्ती करणे कामी येणारा एकूण रक्कम रुपये ४९,१२०/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री. नितीन लढ्ढा** :- मंजुर आहे.

**श्री. नितीन बरडे** :- माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ९३७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, आरोग्य विभागाकडील वाहन क्रं.एम एच १९ सी.वाय.४२९८ (वॉटर टँकर) हे आरोग्य विभागात अत्यावश्यक सेवेत कार्यरत आहे. सदर वाहनाचे खालीलप्रमाणे दुरुस्तीचे कामे नविन स्पेअर पार्टससह व मजुरीसह करणे आवश्यक व गरजेचे आहे.

| मनपा वाहन क्र.एम एच १९ सी.वाय.४२९८ (वॉटर टँकर) | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | वाहनातील दुरुस्तीचे कामे | | |
| 1 | TMGO Diesel Engine Oil C14 Plus 15W40 | 13 | Synthetic Grease Pack 3 KG |
| 2 | Oil Filter Element Spinon BS3/4 -1 nos | 14 | Oil Seal Front Hub BS1/2/3/4 -2 nos |
| 3 | Fuel Filter Element BS3/4 -1 nos | 15 | Oil Seal (135X170X15) Double LIP -2 nos |
| 4 | Filter Element Protect Filter BS1 - 4-1 nos | 16 | Oil Seal (125X150X12) -2 nos |
| 5 | Set of 2516 Air Filter Element -1 nos | 17 | Taper Roller BRG 32308 BS1/2/3/4 -1 nos |
| 6 | Cotton Piece -8 nos | 18 | Taper Roller BRG 565/562 BS1/2/3/4 -1 nos |
| 7 | Power Steering Fluid -1 Litre | 19 | Taper Roller BRG Outer 32217 BS1/2/3/4 -1 nos |
| 8 | Cogged V Belt 995 MM Long (Improved) -1 nos | 20 | Taper Roller BRG Inner 683/72 BS1/2/3/4 -1 nos |
| 9 | Poly V Belt 8PK 1260L -1 nos | 21 | Brake Lining Kit (STD) 410X180NA1707 BS1-6-4 nos |
| 10 | TMGO Gear oil 80W90 Long Life | 22 | AL Rivets (10/12) |
| 11 | TMGO RA oil 80W140 Long Life | 23 | All Labour Charges |
| 12 | Tata Genuine Coolant 5 Ltr | 24 | -- |

वरील नमुद वाहनाचे वरील तक्त्यात नमुद केलेप्रमाणे दुरुस्तीची कामे नविन पार्टस्, / मजुरीसह करणे कामी अधिकृत विक्रेते मे.उज्वल ऑटोमोटीव्ह,प्रा.लि.जळगांव यांच्याकडील इस्टिमेट दि.२३/०८/२०२२ अन्वये खर्च रक्कम रु.४९,१२०/- मात्र अपेक्षित असुन सदरचे दर बाजारभावाशी सुसंगत असल्याने सदर खर्चास तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५ (२) (२) नुसार निविदा न मागविता मे.उज्वल ऑटोमोटीव्ह,प्रा.लि.जळगांव यांना रक्कम रु.४९,१२०/- मात्रचा कार्यादेश देण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५८**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- बरडे नितीन मनोहर**

**नगरसचिव विषय क्रं. ५ :-** मनपा मलेरिया विभागाकडील वाहन क्रं.एम एच १९ एम ९१६९ (टाटा एस) या वाहनाची दुरुस्ती करणे कामी येणारा एकूण रक्कम रुपये ९,४५०/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री. नितीन लढ्ढा** :- मंजुर आहे.

**श्री. नितीन बरडे** :- माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ९३८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महानगरपालिका मलेरिया विभागाकडील क्रं.एम एच १९ एम ९१६९ (टाटा एस) वाहन हे मलेरिया विभागात अत्यावश्यक सेवेत कार्यरत आहे. सदर वाहनाचे खालीलप्रमाणे दुरुस्तीचे कामे नविन स्पेअर पार्टससह व मजुरीसह करणे आवश्यक व गरजेचे आहे.

| मनपा क्रं.एम एच १९ एम ९१६९ (टाटा एस) | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | वाहनातील दुरुस्तीचे कामे | | |
| 1 | TMGO Diesel Engine Oil C14 Plus 15W40 -2500 ML | 8 | Assy. Parking BRK Lever W/Grip BS2/3/4/6 -1 nos |
| 2 | Assy. Oil Filter ACE -1 nos | 9 | Assy. Outer Door Handle RH BS2/3/4/6 -1 nos |
| 3 | Fuel Filter Element & Seals BS2/3/4 -2 nos | 10 | Assy. Outer Door Handle RH BS2/3/4/6 -1 nos |
| 4 | Air Filter Element BS2/3/4 - 1 nos | 11 | Assy Orvm (Door Mounted) LH -1 nos |
| 5 | Assy. Park BRK Cable RR 1060MM BS2/3/4 -1 nos | 12 | TATA Genuine Coolant 1 LTR - 1nos |
| 6 | Parking BRK Cable RR LH 1590MM BS2/3/4 -1 nos | 13 | Cotton Piese - 1 nos |
| 7 | Assy. Park BRK Cable FRT 1630MM BS2/3/4 -1 nos | 14 | All Labour Charges |

वरील नमुद वाहनाचे वरील तक्त्यात नमुद केलेप्रमाणे दुरुस्तीची कामे नविन पार्टस्, / मजुरीसह करणे कामी अधिकृत विक्रेते मे.उज्वल ऑटोमोटीव्ह,प्रा.लि.जळगांव यांच्याकडील इस्टिमेट दि.०५/०८/२०२२ अन्वये खर्च रक्कम रु.४,९६६/- + लेबर इस्टिमेट दि.०५/०८/२०२२ अन्वये रक्कम रु.४,४८४/- या प्रमाणे एकूण रक्कम रु.९,४५०/- मात्र अपेक्षित असुन सदरचे दर बाजारभावाशी सुसंगत असल्याने सदर खर्चास तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५ (२) (२) नुसार निविदा न मागविता मे.उज्वल ऑटोमोटीव्ह,प्रा.लि.जळगांव यांना रक्कम रु.९,४५०/- मात्रचा कार्यादेश देण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५८**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- बरडे नितीन मनोहर**

**नगरसचिव विषय क्रं. ६ :-** मनपा शहर अभियंता कार्यालयाकडील प्रशासकीय वाहन क्रं.एम एच १९ सी.यु.७१९७ (बोलेरो) या वाहनाची दुरुस्ती करणे कामी येणारा एकूण रक्कम रुपये ३०,३९२/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री. नितीन लढ्ढा** :- मंजुर आहे.

**श्री. नितीन बरडे** :- माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ९३९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महानगरपालिका मनपा शहर अभियंता कार्यालयाकडील वाहन क्रं.एम एच १९ सी.यु.७१९७ (बोलेरो) हे शहर अभियंता कार्यालयाकडे प्रशासकीय कामकाजाकरिता कार्यरत आहे. सदर वाहनाचे खालीलप्रमाणे दुरुस्तीचे कामे नविन स्पेअर पार्टससह व मजुरीसह करणे आवश्यक व गरजेचे आहे.

| वाहन क्रं.एम एच १९ सी.यु.७१९७ (बोलेरो) | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | वाहनातील दुरुस्तीचे कामे | | |
| 1 | Disc Brake -02 Nos | 15 | Kit Brake Liner AND Hand Brake - 01 Nos |
| 2 | Assy. Pad-Anti-Rattle Spring (ALT 0076650) -02 Nos | 16 | Bushing -02 Nos |
| 3 | Cable Parking Brake FRT -01 Nos | 17 | Kit Shock ABSORBER Bushing Front -01 Nos |
| 4 | Cable Parking Brake Rear -01 Nos | 18 | 150000 KM Service Labour |
| 5 | Oil Filter -01 Nos | 19 | Rear Brake Shoe (Two Side) -R NR |
| 6 | Local Spare Part Cosumable Cotton WW -01 Nos | 20 | Front Disc (LH) - R NR |
| 7 | Maximile FEO 05 LTR - 06 Nos | 21 | Front Disc (RH) - R NR |
| 8 | Maximile Ultracool : 1 LTR - 06 Nos | 22 | Park Brake Front Cable -R NR |
| 9 | Maximile FEO 01 LTR - 01 Nos | 23 | Park Brake Rear Cable -R NR |
| 10 | Maximile Syntec F2 1 LTR - 02 Nos | 24 | Oil Sump -R NR |
| 11 | Kit Filter Eement -01 Nos | 25 | Fuel Tank -R NR |
| 12 | Element Air Cleaner -01 Nos | 26 | Stabilizer Bar Bush RH -R NR |
| 13 | Assembly Oil Sump -01 Nos | 27 | Stabilizer Bar Bush LH -R NR |
| 14 | Washer Sealing M16.2X21.90X2 - 01 Nos | 28 | -- |

वरील नमुद वाहनाचे वरील तक्त्यात नमुद केलेप्रमाणे दुरुस्तीची कामे नविन पार्टस्, / मजुरीसह करणे कामी अधिकृत विक्रेते मे.सातपुडा ऑटोमोबाईल,नशिराबाद जि.जळगांव यांच्याकडील इनव्हाइस नं.३४७९ दि.२४/०९/२०२२ अन्वये खर्च रक्कम रु.३०,३९२/- मात्र अपेक्षित असुन सदरचे दर बाजारभावाशी सुसंगत असल्याने सदर खर्चास तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५ (२) (२) नुसार निविदा न मागविता मे.सातपुडा ऑटोमोबाईल,नशिराबाद जि.जळगांव यांना रक्कम रु.३०,३९२/- मात्रचा कार्यादेश देण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५८**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- बरडे नितीन मनोहर**

**नगरसचिव विषय क्रं. ७ :-** मनपा आरोग्य विभागाकडील मशिन क्रं.एम एच १९ एम ०३२८ (जे.सी.बी.) या वाहनाची दुरुस्ती करणे कामी येणारा एकूण रक्कम रुपये १,९५,२००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री. नितीन लढ्ढा** :- मंजुर आहे.

**श्री. नितीन बरडे** :- माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ९४० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महानगरपालिका आरोग्य विभागाकडील मशिन क्रं.एम एच १९ एम ०३२८ (जे.सी.बी.) या मशिनची मेजर दुरुस्तीची कामे मजुरीसह करणे कामी आयुक्त यांचे दि.०४/०९/२०१९

रोजीच्या सक्षम मान्यतेने जाहिर निविदा सुचना महानगरपालिका संकेतस्थळ www.jmc.gov.in वर प्रसिध्द करण्यात आली होती त्यानुसार इंदौर हेड फेसींग & इंजिनिअरींग वर्क्स,जळगांव यांचे पाकीट क्रं.१ व २ उघडले असता आलेले दर रक्कम रु.१,९५,२००/- मात्रचे दर स्विकृत करुन इंदौर हेड फेसींग & इंजिनिअरींग वर्क्स,जळगांव यांना जा.क्र./ज.श.म.न.पा./वा.व्य.वि./०१/२०२०-२१ दि.२३/०४/२०२० अन्वये कार्यादेश देण्यात आला होता. तसेच स्पेअर पार्टस् खरेदी करण्याकामी जा.क्र./जशमनपा/वा.व्य.वि./१५३/२०१८/१९ दि.०२/०२/२०१९ अन्वये मे.सुयान इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.जळगांव यांना कार्यादेश देण्यात आला होता.

परंतु लॉकडाऊनच्या कालावधीमध्ये वाहनाचे (जे.सी.बी.) चे दुरुस्तीचे काम करीत असताना मे.सुयान इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.जळगांव यांच्यामार्फत काही स्पेअर पार्टस् वेळेवर उपलब्ध न झाल्यामुळे स्थानिक बाजार पेठेतुन रिध्दी सिध्दी अर्थ मुव्हर्स,जळगांव यांच्याकडून इंदौर हेड फेसींग & इंजिनिअरींग वर्क्स,जळगांव यांच्यामार्फत आवश्यक ते स्पेअर पार्टस् खरेदी करण्यात आले असुन त्याची यादी खालील प्रमाणे,

| Sr No | Description of Goods | Quantity | Amount |
|---|---|---|---|
| 1. | 550/40983 Bush R E (Slew) | 6 PCS | 1,200/- |
| 2. | Bush -00388 | 4 PCS | 1,900/- |
| 3. | Liner bearing Bush 10211 O/S | 2 PCS | 1,400/- |
| 4. | Bush 982 | 4 PCS | 700/- |
| 5. | KPC Seal 0456 (70ID) | 1 PCS | 150/- |
| 6. | Washer (LPS) | 3 PCS | 525/- |
| 7. | KPC seal 0456 (70ID) | 4 PCS | 200/- |
| 8. | Bush 750 | 4 PCS | 600/- |
| 9. | Flexible Hose Pipes | 3 PCS | 2,250/- |
| 10. | Fan Beal 1250 | 1 PCS | 300/- |
| 11. | Cotter Pin | 2 PCS | 100/- |
| 12. | Pivot Pin BM 1/90198 | 2 PCS | 900/- |
| 13. | SGP LDR Sleeve | 8 PCS | 4,400/- |
| 14. | Dust Seal | 12 PCS | 360/- |
| 15. | Rear Hub Bolt | 4 PCS | 480/- |
| 16. | 65X80X85 Bush | 2 PCS | 1,100/- |
| 17. | Bucket Shim 70 -45 -3mm | 10 PCS | 450/- |
| 18. | Seal Kit 41860 | 1 PCS | 1,750 |
| 19. | Seal Kit 42909 | 1 PCS | 2,000/- |
| 20. | Seal Kit 30289 | 1 PCS | 2,250/- |
| 21. | Seal Kit 41862 | 1 PCS | 1,500/- |
| 22. | Seal Kit 42904 | 1 PCS | 1,500/- |
| 23. | Pivot Pin /SI/811/20061 A/S NTD | 1 PCS | 550/- |
| 24. | Pin 80001 | 2 PCS | 900/- |
| 25. | 29 Spline Wheel | 1 PCS | 1,400/- |
| 26 | Wipper Blade | 1 PCS | 250/- |
| 27 | Plate 454 | 1 PCS | 2,500/- |
| 28 | Pin 301633 | 1 PCS | 1,350/- |
| 29 | Bush - 00364 | 4 PCS | 2,000/- |
| 30 | Pin 50372 | 1 PCS | 1,100/- |

| | | | |
|---|---|---|---|
| 31 | Bush 00131 | 1 PCS | 200/- |
| 32 | Pivot Pin K/P Main 811/90165 | 1 PCS | 1,250/- |
| 33 | Pin 40104 | 1 PCS | 1,100/- |
| 34 | Bucket Pin Bush Kit | 1 kit | 4,500/- |
| 35 | Cut Bush BM08/0023 | 2 PCS | 2,400/- |
| 36 | Boom Joint Sleeve Set O/S | 1 PCS | 1,100/- |
| 37 | Shim (Washer) | 68 no | 680/- |
| 38 | Cotter Pin | 72 PCS | 720/- |
| 39 | 60 Amp Fuse | 4 PCS | 200/- |
| 40 | Cut Bush BM08/0023 | 8 PCS | 960/- |
| | | CGST | 4,425.75/- |
| | | SGST | 4,425.75/- |
| | | Total | 58,027/- |

मुळ कार्यादेशाच्या रक्कमेपेक्षा रक्कम रु.५८,०२७/- मात्र अधिक खर्च झालेला असल्याने मे. इंदौर हेड फेसींग & इंजिनिअरींग वर्क्स,जळगांव यांना मुळ कार्यादेशाच्या रक्कमे इतके म्हणजेच रक्कम रु.१,९५,२००/- मात्रचे देयक अदा करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे तसेच मुळ कार्यादेशाच्या रक्कमेपेक्षा अधिक झालेली वाढीव रक्कम रु.५८,०२७/- मात्र संबंधीत एजन्सीला अदा करणेस कार्योत्तर मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५८**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- बरडे नितीन मनोहर**

**नगरसचिव विषय क्रं. ८ :-** महानगरपालिका विविध विभागात कार्यरत वाहनांसाठी किरकोळ दरात इंधन (डिझेल) १२००० लिटर खरेदी करणे कामी येणारा एकूण रक्कम रुपये ११,२९,३२०/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री. नितीन लढ्ढा** :- मंजुर आहे.

**श्री.नितीन बरडे** :- अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ९४१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, मनपा वाहनांसाठी डिझेल पुरवठा (साठा) करणे बाबत पंप ऑपरेटर यांनी मागणी दिलेली असून दि.०६/१०/२०२२ रोजी चे अखेर डिझेल साठा शिल्लक ११०२ लिटर असुन सदर साठा ०२ दिवसांसाठी पुरेल इतका शिल्लक आहे.

जळगांव शहर महानगरपालिकेकडील कार्यरत असलेली विविध वाहनांसाठी मा.महासभा ठराव क्र.७४३ दि.१४/०२/२०२२ अन्वये इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि.आय.ओ.सी.पानेवाडी डेपो मनमाड यांचेमार्फत (ठोक/बल्क) स्वरुपात डिझेल खरेदी केली जाते. दि.०७/१०/२०२२ रोजी डिझेल (ठोक/बल्क) खरेदी आणि किरकोळ डिझेल खरेदी यांच्या दराचा (रेट) तफावत दर्शविणारा तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि.आय.ओ.सी.पानेवाडी डेपो मनमाड (ठोक/बल्क) डिझेल खरेदी दर | सर्वोदय सर्व्हिस स्टेशन जळगांव (किरकोळ) डिझेल खरेदी दर |
|---|---|---|
| १ | प्रती लिटर दर रु.१०४.०७२५/- | प्रती लिटर दर रु.९४.११/- |
| २ | १२००० लिटरसाठी खर्च रक्कम रु.१२,४८,८७०/- | १२००० लिटरसाठी खर्च रक्कम रु.११,२९,३२०/- |
| ३ | १२००० लिटर प्रमाणे तफावत रक्कम रु.१,१९,५५०/- | १२००० लिटर प्रमाणे तफावत रक्कम निरंक |

नमुद तक्ता पाहता इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि.आय.ओ.सी.लि.पानेवाडी डेपो मनमाड यांचेमार्फत (ठोक/बल्क) डिझेल खरेदी एकत्रीत करतांना रक्कम रु.१,१९,५५०/- मात्र अधिक खर्च १२००० लिटर खरेदी करतांना होणार आहे. वाढीव खर्च टाळण्यासाठी एस.टी. महामंडळाने त्यांची वाहने खाजगी अधिकृत विक्रेत्या पंपावरुन डिझेल खरेदी करणे सुरु केलेले आहे. महानगरपालिकेला देखील आपल्या वाहनांसाठी डिझेलच्या वाढीव भावाला टाळण्याच्या दृष्टीने व आर्थिक बचत करण्याच्या दृष्टीने स्थानिक खाजगी मात्र अधिकृत विक्रेत्यांकडून डिझेल खरेदी करता येईल. त्यामुळे १२००० लिटरच्या मागे सध्याच्या प्रचलीत दरानुसार रक्कम रु.१,१९,५५०/- मात्र महानगरपालिकेची आर्थिक बचत होईल. तसेच वेळोवेळी डिझेलचे किरकोळ दर चढ-उतार (परिवर्तन) होण्याची शक्यता नाकारता येत नाही. ज्या वेळी डिझेल (ठोक/बल्क) खरेदीचे दर किरकोळ दरापेक्षा न्युनतम होतील त्यावेळी पुन्हा इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि.आय.ओ.सी.पानेवाडी डेपो मनमाड यांचे मार्फत (ठोक/बल्क) डिझेल खरेदी करता येईल.

महानगरपालिकेने यापुर्वी स्थायी समिती ठराव क्रं.११२२ दि.०८/०२/२०१३, स्थायी समिती ठराव क्रं.११८२ दि.२६/०४/२०१३, स्थायी समिती ठराव क्रं.९१ दि.१९/०७/२०१४ अन्वये पारीत ठरावाच्या अनुषंगाने इंडीयन ऑईल कॉर्पोरेशनचे अधिकृत विक्रेते सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांच्याकडून महानगरपालिकेस आवश्यक असलेले इंधन (डिझेल) स्थायी समितीच्या पारीत ठरावानुसार निविदा न मागविता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ संविदा कलम (२) (२) नुसार किरकोळ डिझेल खरेदी केलेली आहे.

किरकोळ डिझेल खरेदी दर (बाजारभाव) व बल्क दर यामध्ये जो पर्यंत तफावत राहील तो पर्यंत बाजारभावातुन किरकोळ इंधन खरेदी करणे महानगरपालिकेस फायदेशीर राहील.

| प्राप्त झालेल्या इंधन (डिझेल) दराचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | कामाचे नांव | Quantity | मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन, (आय.ओ.सी.डिलर) जळगांव |
| १ | महानगरपालिका कार्यरत विविध वाहनांसाठी किरकोळ दरात इंधन (डिझेल) खरेदी करणे बाबत. | १२००० लि. | प्रति लिटर दर रु.९४.११/- |
| | | | ११,२९,३२०/- |
| | | एकूण रक्कम रुपये - | ११,२९,३२०/- |

महासभा ठराव क्रं.८८६ दि.०८/०८/२०२२ अन्वये १२००० लिटर्स डिझेल, महासभा ठराव क्र.८८७ दि.०८/०८/२०२२ अन्वये १२००० लिटर्स डिझेल मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांचेकडून किरकोळ दरात डिझेल खरेदी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ संविदा कलम (२) (२) नुसार किरकोळ डिझेल खरेदी करण्यास मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. तसेच दि.०७/१०/२०२२ रोजी महासभेत विषय क्रं.३७ मान्य करण्यात आलेला आहे. मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांना देण्यात आलेल्या पुरवठा आदेशानुसार त्यांनी महानगरपालिकेच्या विविध विभागाकडील वाहन चालक व विभाग प्रमुखांच्या मागणी नुसार दि.०८/०७/२०२२ ते आज पावेतो किरकोळ स्वरुपात इंधन (डिझेल) चा पुरवठा केलेला आहे. त्यानुसार मनपा वाहनांसाठी डिझेल पुरवठा करण्याकामी मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव हा पंप एम.आय.डी.सी.रोडवर असल्याने सदर पंपावरुन डिझेल घेणे सोयीचे होईल.

इंधन (डिझेल) खरेदी कामी निविदा प्रक्रीया अंतिम होईपावेतो तात्पुरत्या स्वरुपात व तातडीने आवश्यक असलेले इंधन (डिझेल) किरकोळ स्वरुपात खरेदी करण्याकामी मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांच्याकडील इन्व्हाइस नं.२०२२-२३/१२ दि.०७/१०/२०२२ अन्वये १२००० लिटर डिझेल खरेदी कामी रक्कम रु.११,२९,३२०/- मात्र खर्च अपेक्षित आहे. सदर खर्चास तसेच इंडियन ऑईल कॉर्पोरेशनचे अधिकृत विक्रेते सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांचेकडून निविदा न मागविता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ संविदा कलम (२) (२) नुसार किरकोळ डिझेल खरेदी करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५८**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- बरडे नितीन मनोहर**

**नगरसचिव विषय क्रं. ९ :-** नागरी दलितेत्तर वस्त्यात सुधारणा योजने अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्रं.१२ मधील गजानन हॉसिंग सोसायटी मधील श्री.किशोर ढाके यांचे घरापासुन ते शिवरोड पार्वती नगर अंजिठा हॉसिंग सोसायटी मधील पी.ई.पाटील यांचे कॉलेज पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे कामी मक्तेदार श्री.श्री.इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांचे वाटाघाटी अंती निविदा रक्कमेवर २४.५०% जास्तीचे दरास मान्यता देणे तसेच सदर कामी येणारा एकूण रक्कम रुपये २८,४२,८५१/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री. नितीन लढ्ढा** :- मंजुर आहे.

**श्री.नितीन बरडे** :- अनुमोदन आहे.

**श्री. कैलास सोनवणे** :- एक मिनिंट फक्त मला एक विषय मांडायचा आहे ईथे , याच्यामध्ये साईबाबा मंदिर ते सुनिलभाऊ खडके आपले नगरसेवक यांच्या घरापर्यंत म्हणजे जो रथ मार्ग आहे हा रस्ता कॉंक्रीटीकरण करणे याच्यावर जो रस्ता आहे याचा खर्च २६,६६,७४४/- रूपयांचे ईस्टिमेट आहे. त्याच्यामध्ये राजुमामांचा १० लाख रूपये निधी येणार आहे. म्हणजे हे १० लाख रूपये वगळुन आपला मनपा फंडातुन हे काम करायचे आहे.

**मा.उपमहापौर** :- म्हणजे १० लाख मामा देणार आहे.

**श्री. कैलास सोनवणे** :- हो

**मा.उपमहापौर** :- मंजुर आहे.

**श्री. कैलास सोनवणे** :- म्हणजे १० मामांचे आणि बाकी मनपा फंड तो रथ मार्ग आहे.

**मा महापौर** :- झाल का

**श्री.कैलास सोनवणे** :- एक मिनिंट अजुन एक आहे. विषय क्रं. ४ मध्ये जुन्या गावात गटारीवर RCC स्लॅब कल्व्हर्ट करणे ३० लाखाचा आहे हा विषय मनपा फंडाचा

**श्री.सुनिल खडके** :- महापौरताई एक विषय बोलायचा आहे अजुन

**मा महापौर** :- कैलास आप्पांना बोलुन घेवु द्या आधी

**श्री.सुनिल खडके** :- बर

**मा महापौर** :- आयत्या वेळेचा विषय घेण्यात येवू नये या संदर्भातील पत्र मी नगरसचिव साहेबांना दिलेले आहे परंतू नागरीकांच्या भावना लक्षात घेता आणि रथमार्गाचा विषय असल्यामुळे सन्मा.सदस्य कैलासआप्पांनी सांगीतलेले प्रस्तावाची प्रशासनाने नोंद घेवुन त्यापध्दतीने ठराव करावा. सर्वानुमते ठराव मंजुर करण्यात येत आहे. विषय क्रं. ०२ ते १० सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- १ नंबरच्या या विषयामध्ये प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही ही तत्पर करण्यात यावी आणि म्हणजे परिपुर्ण प्रस्ताव तयार करण्यासंदर्भात भविष्यात अडचणी येणार नाहीत.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ९४२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, नागरी दलितेत्तर वस्त्यात सुधारणा योजने अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्रं.१२ मधील गजानन हॉसिंग सोसायटी मधील श्री.किशोर ढाके यांचे घरापासुन ते शिवरोड पार्वती नगर अंजिठा हॉसिंग सोसायटी मधील पी.ई.पाटील यांचे कॉलेज पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे कामास जिल्हाधिकारी जळगांव यांचे कडील पत्र क्रं.नप/नियोजन/आर.आर./६९७/२०२१ दि.१२/०५/२०२१ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार आयुक्त,मनपा यांचे दि.२३/०५/२०२१ च्या मान्यते अन्वये उक्त कामाची ई निविदा सुचना क्रं.७९/०९ सन २०२१-२२ https://mahatenders.in वर प्रसिध्द करण्यात आली अशी ई निविदा सुचना मनपा पत्र क्रं.सा.बा/२४१ दि.१०/०६/२०२१ चे पत्रान्वये दै.सामना या वर्तमान पत्रात दि.११/०६/२०२१ रोजी प्रसिध्द केल्यानुसार संगणकाव्दारे निविदा भरणेकरीता दिलेल्या मुदतीत ०३ ई-निविदा सदर संकेतस्थळावर प्राप्त झालेल्या आहे. सदर सर्व ०३ ई-निविदा धारकांनी आवश्यक त्या

कागदपत्रांची पुर्तता केलेली आहे परंतु साई सागर कंन्स्ट्रक्शन मक्तेदार यांनी कंत्राकदार नोंदणी प्रमाणपत्र मुदत बाहय सादर केलेले आहे तसेच तांत्रिक कर्मचाऱ्यांची यादी सादर केलेली नाही. तसेच हॉट मिक्स प्लॉन्ट ६० कि.मी.च्या आत असल्याबाबतचे व प्लॅन्ट भाडे तत्वावर घेण्याबाबतचे प्रतिज्ञापत्र साध्या कागदावर दिलेले असुन ते रक्कम रु.५००/- मात्रच्या मुद्रांक शुल्क पेपरवर नोटरी करुन सादर करणे आवश्यक होते. परंतु साध्या कागदावर सादर केलेले आहे. मक्तेदार निखील कृष्णराज पाटील यांनी कागदपत्रांची पुर्तता केलेली आहे पंरतू मशिनरी स्वत:ची किंवा भाडयाची असल्याबाबत यादी, हॉट मिक्स प्लॅन्ट ६० कि.मी.च्या आत असल्याबाबतचे व प्लॅन्ट भाडे तत्वावर घेण्याबाबतचे प्रतिज्ञापत्र साध्या कागदावर दिलेले असुन ते रक्कम रु.५००/- मात्रच्या मुद्रांक शुल्क पेपरवर नोटरी करुन सादर करणे आवश्यक होते. परंतु साध्या कागदावर सादर केलेले आहे. तसेच मशिनरी भाडयाने असल्यास त्याचा कररनामा सादर केलेला नाही. मक्तेदार श्री.श्री.इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांनी कागदत्रांची पुर्तता केलेली आहे परंतू कंत्राटदार नोंदणी प्रमाणपत्र मुदत बाहय सादर केलेले आहे तसेच शासकीय कामे पुर्ण केलेल्या व हातात असलेल्या कामांची यादी व या कामापैकी टेंन्डर रक्कमेच्या ३०% रक्कमेनुसार होणारी रक्कमेचे एक काम केलेले असल्याचे कागदपत्र सादर केलेले नाही. तसेच निविदे सोबत सादर केलेले कागदपत्र सत्य व अचूक असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र रु.५००/- मात्रच्या मुद्रांक शुल्क पेपरवर नोटरी करुन सादर केलेले नाही. तसेच हॉट मिक्स प्लॅन्ट ६० कि.मी.च्या आत असल्याबाबतचा शहर अभियंता यांनी दिलेला दाखल सादर केलेला नाही तसेच प्रतिज्ञापत्र रु.५००/- मात्रच्या मुद्रांक शुल्क पेपरवर नोटरी करुन सादर केलेले नाही. तसेच पि.एफ. रजिस्टेशन प्रमाणपत्र सादर केलेले नाही. त्यामुळे एकही निविदा पात्र होत नसल्याने सदर कामाची फेर ई-निविदा करणेस शहर अभियंता यांनी दि.२१/०२/२०२२ रोजी मान्यता दिल्यानुसार उक्त कामाची नव्याने ई निविदा सुचना मनपा पत्र क्रं.सा.बा/१५७४ दि.२२/०२/२०२२ चे पत्रान्वये दै.सामना या वर्तमान पत्रात दि.२३/०२/२०२२ रोजी प्रसिध्द केल्यानुसार संगणकाव्दारे निविदा भरणेकरिता दिलेल्या मुदतीत ०० (एकही) ई-निविदा सदर संकेतस्थळावर प्राप्त झालेली नसल्याने पाच दिवसाची मुदतवाढ देण्यास शहर अभियंता यांनी दि.०८/०३/२०२२ रोजी मान्यता दिल्यानुसार संगणकाव्दारे निविदा भरणेकरिता दिलेल्या मुदतीत ०१ ई-निविदा सदर संकेतस्थळावर प्राप्त झालेली असल्याने दुसऱ्या वेळेस फेर ई-निविदा करणेस शहर अभियंता यांनी मान्यता दिल्यानुसार उक्त कामाची ई निविदा सुचना मनपा पत्र क्रं.सा.बा/१३५ सन २०२१-२२ https://mahatenders.in वर प्रसिध्द करण्यात आली अशी ई निविदा सुचना मनपा पत्र क्रं.सा.बा/१८५९ दि.२२/०३/२०२२ चे पत्रान्वये दै.सामना या वर्तमान पत्रात दि.२४/०३/२०२२ रोजी प्रसिध्द केल्यानुसार संगणकाव्दारे निविदा भरणेकरिता दिलेल्या मुदतीत ०१ ई-निविदा सदर संकेतस्थळावर प्राप्त झालेल्या असल्याने दोन दिवसाची मुदतवाढ देण्यास शहर अभियंता यांनी सूचित केल्यानुसार संगणकाव्दारे निविदा भरणेकरिता दिलेल्या मुदतीत https://mahatenders.in वर ०१ ई-निविदा सदर संकेतस्थळावर प्राप्त झालेली असल्याने दोन दिवसाची मुदतवाढ देण्यास शहर अभियंता यांनी सूचित केल्यानुसार संगणकाव्दारे निविदा भरणेकरिता दिलेल्या मुदतीत https://mahatenders.in वर ०१ ई-निविदा सदर संकेतस्थळावर प्राप्त झालेली असल्याने तिसऱ्या वेळेसशहर अभियंता यांनी मान्यता दिल्यानुसार उक्त कामाची ई निविदा सुचना मनपा पत्र क्रं.सा.बा/१३९ सन २०२१-२२ https://mahatenders.in वर प्रसिध्द करण्यात आली अशी ई निविदा सुचना मनपा पत्र क्रं.सा.बा/२४ दि.०७/०४/२०२२ चे पत्रान्वये दै.पुण्यनगरी या वर्तमान पत्रात दि.०८/०४/२०२२ रोजी प्रसिध्द केल्यानुसार संगणकाव्दारे निविदा भरणेकरिता दिलेल्या मुदतीत ०१ ई-निविदा सदर संकेतस्थळावर प्राप्त झालेली आहे. त्यानुसार सदर कामाचे आलेल्या ई-निविदांचे संगणकावर कागदपत्रांची छाननी केली असता खाली नमुद मक्तेदार यांनी सर्व आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता केलेली असुन आलेल्या ई-निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे,

| अ.क्रं. | निविदा धारकाचे नांव | निविदा रक्कम रु.२०,२७,४०५/- | अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|
| १ | श्री.श्री.इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. | निविदा रक्कमेवर २४.५०% जास्तीचे दराने | २५,२४,११९/- |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता मक्तेदार श्री.श्री.इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांचे दर इतर मक्तेदारापेक्षा कामाचे निविदा रक्कमेवर २४.५०% जास्तीचे दर सर्वात कमी आलेले आहे. सदरचे दर जास्त वाटत असल्याने

मक्तेदार यांना वाटाघाटीसाठी प्रत्यक्ष बोलविले असता मक्तेदार समक्ष उपस्थित राहुन निविदेत भरण्यात आलेले दर हे आजच्या जिल्हादर सुचितच्या दरापेक्षा कमी असल्याने निविदारक्कमेवर २४.५०% जास्तीचे दर हे योग्य असल्याबाबत मक्तेदार यांनी कळविले आहे त्याच दरात काम करण्यास तयार असल्याचे त्यांनी लेखी संमती दिलेली आहे.

निविदा अंदाजित किंमत सन २०२०-२१ नुसार रक्कम रु.२०,२७,४०५/-

सन २०२२-२३ चे चालु दरानुसार रक्कम रु.३०,२५,४७०/-

मक्तेदार यांनी दिलेले निविदा रक्कमेवर २४.५०% जास्तीचे दरानुसार होणारी रक्कम रु.२५,२४,११९/-

वरील प्रमाणे अंदाजपत्रकीय दरापेक्षा सन २०२२-२३ चे चालुदर हे ४९.२३% जास्त आहेत त्यामुळे मक्तेदार यांनी प्रस्तावीत केलेले अंदाजपत्रकीय दरावर २४.५०% दर हे चालु दरापेक्षा २४.७३% ने कमी आहेत तरी मक्तेदार श्री.श्री.इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांना निविदा रक्कमेवर २४.५०% जास्तीचे दर निविदेत नमुद प्रमाणे आलेल्या दरानुसार जि.एस.टी., कामगार विमा, टेस्टींग चार्जेस व रॉयल्टी यांच्या रक्कमा खालील प्रमाणे समाविष्ठ करावयाच्या आहे.

| | | |
|---|---|---|
| ०१ | वाटाघाटी अंती निविदा प्रमाणे अपेक्षीत खर्च रक्कम | २५,२४,११९/- |
| ०२ | जि.एस.टी. १२% | ३,०२,८९४/- |
| ०३ | कामगार विमा ०.५०% | १२,६२१/- |
| ०४ | रॉयल्टी | ३,२१७/- |
| | एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु :- | २८,४२,८५१/- |

वर नमुद प्रमाणे निविदेत आलेले दरानुसार व सर्व शासकीय कर समाविष्ठ करुन एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु.२८,४२,८५१/- मात्रला मान्यता प्रदान करण्यात येत असून सदर रक्कमेपैकी रक्कम रु.२२,८४,०४८/- मात्र नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजने अंतर्गतच्या निधीतुन व उर्वरित रक्कम रु.५,५८,८०३/- मात्र मनपा निधी नविन रस्ते या लेखाशिर्षा सन २०२२-२३ अंतर्गत खर्च करणेस तसेच मक्तेदार श्री.श्री.इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांचे वाटाघाटी अंति निविदा रक्कमेवर २४.५०% जास्तीचे दरास व चालु दरसुचीचे दर हे २४.७३% कमी दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७ कलम ७३ (क) नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५८**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- बरडे नितीन मनोहर**

**नगरसचिव विषय क्रं. १० :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेणे.**

**श्री. नितीन लढ्ढा** :- मंजुर आहे.

**श्री.नितीन बरडे** :- अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ९४३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो कि, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेतली.

१.प्रशासकीय आदेश क्र.सा.बा./८२ दि.०७/१०/२०२२ अन्वये आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत
जळगांव मनपा हद्दीतील प्रभाग क्रं.०७ अंतर्गत मनपा मालकीचे डॉ.बाबासाहेब आंबेडकर उदयान विकसीत करणे कामी मक्तेदार श्री.डी.एच.पाटील कंन्स्ट्रक्शन यांचे निविदा रक्कमेइतकेचेच सर्वात कमी चे दर रक्कम रु.१५,२७,४६५/- मात्र खर्चाची संविदा.(मा.आ.श्री.सुरेश दामु भोळे)

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५८**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- बरडे नितीन मनोहर**

**श्री.कैलास सोनवणे** :- एक गटारींचा विषय आहे ४० लक्ष रूपयांचा

**मा.महापौर** :- सन्मा.सदस्य कैलास आप्पांनी सांगीतलेल्या प्रस्ताव या विषयामध्ये ॲड करून आणि प्रशासनाने याची नोंद घ्यावी.

आयत्या वेळेचा विषय :- सन्मा.सदस्य श्री. कैलास सोनवणे यांनी आयत्यावेळेचा विषय घेणेबाबत मा.महापौर तथा पिठासिन अधिकारी तसेच सन्मा.सभागृहास विनंती केली असता जळगांव शहरातील रथमार्गावरील रस्त्यांच्या दुरूस्ती व डागडुजी करणे तसेच गटार बांधण्याच्या विषयाचा प्रस्ताव मांडला असता सन्मा.सभागृहाने सर्वानुमते सदर प्रस्ताव मंजुर करणेबाबत सहमती दिली व त्यास मा.महापौर तथा पिठासिन अधिकारी यांनी मान्यता दिल्यानंतर त्यांनी प्रस्ताव पारीत केला.

आयत्या वेळेचा विषय :- सन्मा.सदस्य श्री.कैलास नारायण सोनवणे यांनी रथोत्सव मार्गावरील रस्ता व गटारीचे काम तातडीने करुन मिळणे बाबत सभागृहात सूचविलेल्या वॉर्ड क्रं.४ मधील विविध कामे करणे कामी मांडलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री. नितीन लढ्ढा** :- मंजुर आहे.

**श्री.नितीन बरडे** :- अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ९४४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहरातील नागरीकांसाठी रथोत्सव हा वर्षानुवर्षांपासुन चालत आलेला आहे व जळगांव जिल्ह्यात प्रसिध्द असलेला धार्मिक रथोत्सव असल्यामुळे रथोत्सवाच्या मार्गावरील रस्त्याचे व गटारीचे काम तातडीने करणे आवश्यक असल्याने सभागृहात झालेल्या चर्चेनूसार सन्मा.सदस्यांचे प्रस्तावातील मागणीनूसार खालील नमूद कामे करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.क्रं. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्रं.४ मधील साईबाबा मंदिर ते सुनिल खडके यांचे घरापर्यंत सिमेंट कॉक्रीटचा रस्ता तयार करणे. | २७ लक्ष रुपये |
| २ | प्रभाग क्रं.४ मधील जुनेगांव या भागात RCC गटार बांधणे. | ४० लक्ष रुपये |
| | एकुण रक्कम रुपये - | ६७ लक्ष रुपये |

वरील दोन्ही कामांपैकी अ.नं.१ मधील रस्त्याचे काम करणे कामी एकूण रक्कम रुपये २७ लक्ष खर्च असुन त्यामधील रक्कम रुपये १० लक्ष मात्र मा.आमदार श्री.सुरेश (राजुमामा) दामु भोळे यांच्या आमदार फंडातुन व उर्वरीत रक्कम रुपये १७ लक्ष तसेच अ.क्रं.२ मधील आर.सी.सी. गटारीचे काम रक्कम रुपये ४० लक्ष असे एकुण रक्कम रुपये ५७ लक्ष मात्रचे काम हे मनपा फंडातुन करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५८**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- बरडे नितीन मनोहर**

**मा. उपमहापौर** :- महापौर महोदय , सभागृहातील सर्व सदस्यांच्या सुचनांची नोंद घेण्यात यावी. सभागृहातील सर्व सदस्यांच्या सुचनांची नोंद घेण्यात येवुन प्रशासनाने त्याची अंमलबावणी करण्यात यावी.

**मा.महापौर** :- सभागृहातील सर्व सन्मा.सदस्यांनी मांडलेल्या सुचनांची प्रशासनाने पालन करायच आणि सगळ्या सुचनांची नोंद घ्यायची आणि इतिवृत्तामध्ये नोंद घ्यायची.

**सौ.उज्वला बेंडाळे** :- महापौरताई

**श्री.सुनिल खडके** :- महापौरताई मी काय म्हणतोय. एक मिनिंट ताई मला बोलु द्या. महापौरताई मी एक रथमार्गाचा प्रस्ताव काल आणलेला होता. तर त्याची दुरूस्ती करण्यात यावी म्हणजे आता आपला रथोत्सव चालु होतोय.

जळगांव शहराची शान आहे. आपला रथ राम मंदिरापासुन निघतो तर त्याची दुरूस्ती झाली नाही. एक महिना झाला मी पत्र दिलेले होते की रस्ता लवकरात लवकर करण्यात यावा पाण्यामुळे म्हणा किंवा काही याच्यामुळे तो करता आला नाही. परंतू त्याची दुरूस्ती लवकर करण्यात यावी. कारण की आता वहन चालु होत आहेत आणि ठराव मागवता आहे आणि दुसरा माझा एक प्रश्न होता मागच्या मिटींगला मी मांडलेला होता की सरदार वल्लभभाई पटेल यांची १४७ वी जयंती आता आहे. तर पुतळा लावणेसाठी मी सांगीतले होते की ३१ ऑक्टोंबर पर्यंत पुतळा बसला पाहीजे याचे आपण लवकरात लवकर करा. तर त्याच काय झाल.

**श्री.सोनगिरे, उपअभियंता** :- भाऊ आपण जी सुचना केली होती की सरदार वल्लभभाई पटेल यांचा पुर्णाकृती पुतळा याठिकाणी बसवा तर आपल्या प्रकल्प विभागाचे जे इंजिनियर आहेत श्री.योगेश बोरोले यांनी त्यावेळी स्पष्टीकरण दिले होते की आपण जी जागा निश्चित केली होती ती जागा योग्य नाही. तर त्यासाठी आपल्याला महापालिकेमध्ये दुसऱ्या जागी बसवावा लागेल त्यासाठी आपण आर्कीटेक्ट नियुक्त करून त्याच डिजाईन वगैरे तयार करून पुतळा कसा होईल आणि आपली बिल्डिंग अशी आहे की जमीनीपासुन नाहीये आणि खाली आपला जो पोर्शन आहे तो पार्कीगचा पोर्शन आहे आणि त्याच्याखाली शॉप आहेत तर त्याच्यासाठी जे फौंडेशन पाहीजे तस आपल्याला करता येणार नाही. त्यासाठी आर्कीटेक्टला नियुक्त करून त्यानुसार डिजाईन तयार करावी लागेल आणि

**श्री.सुनिल खडके** :- किती दिवस लागतील याला

**श्री.सोनगिरे, उपअभियंता** :- अस ठरल होत आपल

**श्री.सुनिल खडके** :- जे नियमात आहे ते लवकर करा.

**श्री.सोनगिरे, उपअभियंता** :- हो ते आलेले आहे आमच्याकडे तसे पण संबंधित डिपार्टमेंटचे जे इंजिनियर आहे योगेश बोरोले आहेत ते आज नाहीयेत जळगांवला त्यामुळे त्याची पोझिशन काय आहे मी सांगु शकत नाही.

**श्री.सुनिल खडके** :- आता पुढच्या मिटींगला मला उत्तर पाहीजे की जागा कुठे फिक्स झाली आहे ते

**श्री.सोनगिरे, उपअभियंता** :- हो , हो.

**मा.उपमहापौर** :- मा.महापौर महोदया, याठिकाणी रथ मार्गाच्या दुरूस्ती संदर्भात जी सुचना केली. परंतू मला आठवत की आपल्या दालनामध्ये आपण महिनाभरापुर्वी दिवाळीच्या सणोत्सवामध्ये जळगांव शहरामध्ये रथोत्सव हा मनवला जातो आणि वहनोत्सव हा पुर्ण शहरामध्ये काढला जातो आणि त्या मार्गाची डागडुजी आणि दुरूस्ती तात्काळ करावी असे आदेश महापौर दालनातुन आपण काढले होते. परंतू आतापर्यंत त्या आदेशाची कुठलीच अंमलबजावणी झालेली नाही. प्रशासनाने आतापर्यंत कुठलीच कार्यवाही केलेली नाही. तर मला असे वाटते की महापौर असतील, आमदार महोदय असतील किंवा सन्मा.सदस्य असतील या सर्वांच्या सुचनांचे किंवा आदेशांचे पालन केले जात नसेल तर संबंधितांवर आपण कारवाई का करू नये.

**मा.महापौर** :- दरवर्षी आपण रथमार्गाच्या दुरूस्तीचे व डागडुजीचे काम आपण करतो. हे फक्त वरून करण्यात येईल किंवा वरून आदेश येईल आणि त्यानंतर तुम्ही कराल हे योग्य नाही ॲक्च्युअल दिवाळी आल्यानंतर तर हे काम सुरू व्हायला पाहीजे. याकडे कुणीच लक्ष देत नाही. तरीसुध्दा एक महिना दिड महिनापुर्वी पत्र दिलेले असले तरी उशिर होतो असे का?

**श्री.सुनिल खडके** :- अमृत योजनेचा काम आता चालु झालाय, या अमृत योजनेचा काम आता चालु झालाय.

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**श्री.सुनिल खडके** :- साहेब लवकरात लवकर हे काम सुरू झालं पाहीजे.

**मा.उपमहापौर** :- नाही दादा तुम्ही कितीही बोला त्याला अर्थ नाहीये. आपल्या सगळयांच्या आदेशाला आणि सुचनांना ईथे केराची टोपली दाखवली जाते आहे आणि हे हेतू पुरस्कर पणे होत आहे आणि एकाच विभागातुन होत आहे.

**श्री.विश्वनाथ खडके** :- हे काम प्रॅक्टिकली केव्हा चालु करता आहे हे मला साहेबांना विचारायच आहे कारण त्या भागातील नागरीक आलेले आहे आणि ते विचारता आहे. ते कामाच काहीच झालेले नाहीये आणि ते केव्हा होणार आहे आणि चार पाच दिवसांनंतर वहनोत्सव सुरू होणार आहे. त्याच्या सोबत जावु आम्ही नगरसेवक जावु आणि त्यांच्या सोबत फिरू लागले तर तुम्ही कधी येणार ते सांगा लवकर

**श्री.कैलास सोनवणे** :- रथमार्गाचा विषय होता.

**मा.उपमहापौर** :- रथमार्गाचा विषय होता तो

**श्री.विश्वनाथ खडके** :- वहनोत्सवाचा मार्ग वेगळा आहे थोडा

**श्री.सुनिल खडके** :- वहनाच्या मार्गावर इतके खड्डे आहे साहेब सगळ पाणी साचलेल आहे.

**श्री.सोनगिरे, उपअभियंता** :- सोमवारी सुरूवात होईल.

**श्री.विश्वनाथ खडके** :- नाही तुम्ही सोमवारी दुरूस्ती होवुन जाईल सोमवारी तुम्ही दुरूस्ती करता तोपर्यंत दोन तिन वहन होवुन जातील.

**श्री.सोनगिरे, उपअभियंता** :- नाही मग आता विषय असा आहे भाऊ की त्याच्यावर आता पर्याय असा काढला आहे की ते जे दोन चार रस्ते आहे ते आपण डिपार्टमेंटली आपल्याकडे डांबर अव्हेलेबल आहे. तर सोमवारी आपण डिपार्टमेंटली हे काम चालु करू आणि

**श्री.कैलास सोनवणे** :- कोण कोणते रस्ते करणार आहे साहेब

**श्री.सोनगिरे, उपअभियंता** :- आपले राम मंदिरापासुन आबेंडकर नगर कडुन आपल्या

**मा.उपमहापौर** :- साहेब तुम्ही सभागृहाला हे सांगा की तुम्ही जे सांगताहेत, तुम्ही दिशाभुल करत आहेत. तुम्हाला त्या रस्त्याची डागडुजी संदर्भात किंवा रिपेअरींग करण्याच्या संदर्भातील आयुक्तांच्या वतीने आदेश किंवा निर्देश कधी प्राप्त झाले होते. तुम्ही हे सांगा आता उद्याच्या दिवशी वहनोत्सव सुरू होणार आहे आप्पासाहेब , उद्याच्या दिवशी वहनोत्सव सुरू होणार आहे. आमदार असतील महापौर असतील किंवा सन्मा.सदस्य असतील. या सर्वांच्या आदेशांचे व सुचनांच जर ईथे पालन होत नसेल तर आणि उद्याच्या दिवशी वहनोत्सव सुरू होणार आहे आणि तुम्ही आज तुम्ही सभागृहात सांगताहेत की आम्ही उद्यापासुन सुरू करू.

**श्री.कैलास सोनवणे** :- थांबा.

**श्री.विश्वनाथ खडके** :- मी साहेबांना दोन तिन वेळेस सांगीतले.

**श्री.कैलास सोनवणे** :- बसा तुम्ही हे सांगतील

**श्री.विश्वनाथ खडके** :- आप्पा बाहेर जे लोक बसलेले आहेत ते तुमच्याच वॉर्डातील आहेत.

**श्री.सुनिल खडके** :- बोलवा त्यांना

**श्री.कैलास सोनवणे** :- हे सांगतील ना

**श्री.विश्वनाथ खडके** :- हे म्हणत आहेत की ईस्टिमेट बनवायला वेळ लागेल तर तुम्ही त्यांना बोलवा ना

**श्री.विष्णु भंगाळे** :- महापौरांनी आयुक्तांनी आदेश दिलेले आहेत त्यावर काही कार्यवाही करण्याचे आदेश दिलेले आहेत का?

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.विश्वनाथ खडके** :- केव्हा होणार आहे तुम्ही सांगा आता

**श्री.एम.जी.गिरगांवकर, शहर अभियंता** :- रथमार्गाच्या रस्त्याचे दुरूस्तीचे लेखी कार्यादेश कॉन्ट्रक्टरला दिलेले आहेत. त्यांना बोलावुन सुध्दा सांगीतले आहे. त्यांच प्लॅन्टचे काम चालु झालेले आहे. ते आले होते तर त्यांनी सांगीतले की त्यांचा नुकताच प्लँट चालु झालेला आहे तर आज ते

**श्री.सुनिल खडके** :- साहेब उद्यापासुन वहनोत्सव चालु होतोय.

**मा.उपमहापौर** :- साहेब तुम्ही असे कुठले कुठले वर्कऑर्डरचे आदेश दिले आहे.

**श्री.सुनिल खडके** :- साहेब उद्यापासुन वहनोत्सव चालु होतोय.

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.सुनिल खडके** :- प्रत्येक वेळेला वेगवेगळे कारण सांगता तुम्ही, दिड महिन्यापासुन मी पत्र दिलेले आहे तुमच बोलण करवुन दिल. तेच म्हणण आहे त्या लोकांच नितीनभाऊंशी बोलण करवून दिल.

**मा.उपमहापौर** :- साहेब वहनासोबत बरेच लोक राहतात. अशा लोकांची कोणाच्याच जिवाची पर्वा नाहीये का? तुम्हाला त्याची पर्वा नाहीये का ?

**श्री.सोनगिरे,उपअभियंता** :- भाऊ दरवर्षी आपण करून घेतो या वर्षी थोडासा उशिर झाला आहे.

**मा.उपमहापौर** :- थोडासा , थोडा , थोडा उशिर झाला आहे का?

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.सोनगिरे,उपअभियंता** :- भाऊ आपण दरवर्षी दिवाळीच्या अगोदर आपण

**मा.उपमहापौर** :- थोडा उशिर झाला आहे का? अहो उद्यापासुन वहनोत्सव सुरू होतोय.

**श्री.विष्णु भंगाळे** :- सोनगिरे साहेब हे तुमच योग्य आहे का?

**श्री.सुनिल खडके** :- आतापर्यंत आम्ही काही बोलले नाही.

**मा.उपमहापौर** :- अहो सोनगिरे साहेब

**श्री.विष्णु भंगाळे** :- सोनगिरे साहेब हे तुमच योग्य आहे का? रथ यात्रा आहे आधीपासुन आमदारांनी, महापौरांनी आयुक्तांनी सांगीतले आहे. तरी हे योग्य आहे का ?

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.विष्णु भंगाळे** :- उशिर होण हे योग्य आहे का ?

**श्री.सोनगिरे,उपअभियंता** :- भाऊ माझ काय म्हणण आहे.

**मा.उपमहापौर** :- नाही नाही तुम्ही सांगा पहिले की तुम्हाला शहर अभियंत्यांनी अस कुठल पत्र दिलेल आहे का हे सांगा पाहीले.

**श्री.सोनगिरे,उपअभियंता** :- मला नाही दिल तो भाग

**मा.उपमहापौर** :- नाही तुम्हाला दिल आहे का ?

**श्री.सोनगिरे,उपअभियंता** :- नाही पण संबंधित इंजिनियरला दिलेल आहे आणि कॉन्ट्रक्टरला दिलेल आहे.

**मा.उपमहापौर** :- तुम्ही बसा मग

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.कैलास सोनवणे** :- तुमच म्हणण काय आहे. दोष कोणाचा आहे.

**मा.उपमहापौर** :- यांचा

**श्री.कैलास सोनवणे** :- का हो साहेब तुम्ही आमच्या गावामध्ये भांडण लावता आहे का हो

**श्री.एम.जी.गिरगांवकर, शहर अभियंता** :- नाही आप्पासाहेब

**श्री.कैलास सोनवणे** :- आता तुम्ही

**श्री.सुनिल खडके** :- ताई गेंड्याच्या कातडयाच झालेल आहे प्रशासन , एक महिना होवुन गेला आहे अजुन काम चालु होत नाहीये.

**मा.उपमहापौर** :- प्रशासनासाठी कोणतच टॉनिक उरलेल नाहीये

**श्री.विश्वनाथ खडके** :- साहेब तुम्हाला आंदोलनाला सामोर जायच असेल म्हणुन तुम्ही टाईमपास काय करताय. बाहेर पहा तुम्ही किती पब्लिक उभी आहे तर ते रथासाठी

**मा.उपमहापौर** :- आंदोलन बंद , आंदोलन हा विषय बंद आता

**श्री.सोनगिरे,उपअभियंता** :- रथ मार्गाच्या संदर्भात मी आताच बोललो की रथमार्गाच काम आपण सुरू करणार आहोत.

**श्री.सुनिल खडके** :- केव्हा करणार आहे. उद्यापासुन वहन चालु होत आहेत साहेब

**श्री.सोनगिरे,उपअभियंता** :- सोमवारपासुन

**मा.उपमहापौर** :- आयुक्त मॅडम

**श्री.विष्णु भंगाळे** :- सोनगिरे साहेब हे योग्य आहे का

**श्री.अश्विन सोनवणे** :- त्यांना बोलु तर द्या.

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.अश्विन सोनवणे** :- चालुच आहे तुमच

**श्री.विष्णु भंगाळे** :- घ्या त्यांच उत्तर घ्या आता

**श्री.अश्विन सोनवणे** :- बोला वो साहेब

**श्री.सोनगिरे,उपअभियंता** :- रथमार्गाच्या दुरूस्तीच्या संदर्भात मी अस सांगतो की ज्या कॉन्ट्रक्टरला आपण रस्ते दुरूस्तीचे कार्यादेश दिलेले आहे.

**श्री.सुनिल खडके** :- कोणता आहे कॉन्ट्रक्टर

**श्री.सोनगिरे,उपअभियंता** :- सुशिलकुमार गणपत डोंगरे यांना आपण त्या भागातील रस्ते दुरूस्तीच्या वर्कऑर्डर आपण ऑलरेडी दिलेल्या आहेत. आज नाही आपण त्याला आपण दिड वर्षापासुन दिलेल्या आहेत. त्याला आपण काम चालु करायच सांगतीलेल होत. त्यांचा प्रॉब्लेम असा आहे की त्यांचा प्लँट सुरू या पावसामुळे व्हायला विलंब होतोय.

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.सोनगिरे,उपअभियंता** :- एकच मिनिंट भाऊ

**मा.उपमहापौर** :- साहेब हा विषय काय आहे रथमार्गाच्या दुरूस्तीचा आहे

**श्री.कैलास सोनवणे** :- ते सांगत आहेत ना भाऊ

**श्री.सोनगिरे,उपअभियंता** :- काय भाऊ.

**मा.उपमहापौर** :- आपण त्या सुशिलकुमार डोंगरेला ज्या वर्कऑर्डर दिलेल्या आहेत ज्या कामांची

**श्री.सोनगिरे,उपअभियंता** :- हो भाऊ

**मा.उपमहापौर** :- त्याच्यामध्ये आपण पुर्ण रथमार्गाची किंवा रस्त्यांची दुरूस्ती किंवा डागडुजी करायची वर्कऑर्डर दिली आहे का?

**श्री.सोनगिरे,उपअभियंता** :- आपल्या ज्या वर्कऑर्डर निघतात त्या प्रभाग निहाय देतो आपण

**मा.उपमहापौर** :- मग तुम्ही चुकीच का बर सांगताहेत. प्रभाग निहाय निघतात हे तुम्ही आधी का नाही सांगीतले.

**श्री.सोनगिरे,उपअभियंता** :- नाही भाऊ.

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.कैलास सोनवणे** :- भाऊ करता येईल ना , करता येईल ना आपल्याला

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**मा.उपमहापौर** :- नाही ना

**श्री.सोनगिरे,उपअभियंता** :- करता येईल ना आपण MJP च्या वेळेसही केल आहे भाऊ

**श्री.कैलास सोनवणे** :- साहेब तुम्ही लवकर जा आणि लवकर या त्यांना भेटुन कारण बरेच जण नाराज आहे तुमच्या पासुन.

**श्री.सुनिल खडके** :- साहेब आता तुम्ही लोकांना फेस करा.

**श्री.धिरज सोनवणे** :- साहेब तुम्ही बघायला पाहीजे ना की तिथे परिस्थिती काय आहे तुम्ही फक्त कागदावर सांगत आहे त्याला आणि विलंब हातोय

**श्री.विश्वनाथ खडके** :- साहेब

**श्री.कैलास सोनवणे** :- विष्णु भाऊ बोलले ना आता त्यांना समजत आहे ना तेवढ की काय होईल.

**श्री.सुनिल महाजन** :- नाही नाही मग आता काय होईल मग आता डिपीआर केव्हा होईल सभागृहाला डिपीआरची माहिती देण्यात आली नाही.

**मा.महापौर** :- नाही गिरगांवकर साहेब पत्र मी तुम्हाला कधीच दिलेले होते. तरी त्याच्यावर काहीच शहानिशा किंवा त्याच्यावर काहीच निर्णय घेतलेला नाही. हा जो कॉन्ट्रक्टर आहे जो कॉन्ट्रक्टर आहे त्याला सांगायला पाहीजे होत की तो काम का करत नाहीये जळगांव शहरामध्ये याच पहिले तुम्ही स्वत: अवलोकन करा. त्यानंतर

**मा.उपमहापौर** :- आता हे तेच सांगत नाहीये ना सुशिलकुमार डोंगरे त्याला आताच बोलवा ना आणि तो आताच सांगेल तो कॉन्ट्रक्टर की काम का करायला तयार नाहीये म्हणुन नाहीतर कॅन्सल करा ना पुन्हा तेच आपल्याला सुरूवात करावी लागेल.

**मा.महापौर** :- साहेब त्याच्या बाबतीत सभागृहात बोलायला लावु नका. त्याच्यानंतर दिलेल्या आदेशांच आपण पालन करत नाही. याबाबतीत यांच्याविरूध्द शासनाकडे एक तक्रार रिपोर्ट पाठवुन द्या आणि मग अस व्हायला नको की आपल्याकडुन तक्रारी गेलेल्या नाहीयेत आणि याबाबत आपण ठराव करून घेवु कारण की आपल्याकडे प्रुफ राहणार आहे की वारंवार यांच्या तक्रारी शासनाकडे गेलेल्या होत्या. त्यामुळे मॅडम यांच एका तक्रारींच पत्र शासनाकडे पाठवा. सगळया सन्मा.सदस्यांच्या भावना त्याच्यामध्ये नोंद व्हाव्या.

**श्री.कैलास सोनवणे** :- ते लेखी आहे ना मॅडम जे मी बोललेलो आहे ते शिस्तभंगाच ना त्याच्यात घ्या.

**मा.महापौर** :- हो ना

**श्री.कैलास सोनवणे** :- सातवा वेतन आयोगाच तर चालुच राहील आपल, जसा सातवा वेतन आयोगाचा आपण आढावा घेतो. तसा आपण यांच काय झाल ते तर चालु राहील ना आपल

**मा.महापौर** :- हो ना मी तेच सांगतील ना की त्यांना दिलेल्या सुचनांच ते पालन करत नाहीत.

**श्री.कैलास सोनवणे** :- करत नाही ना मग काय अर्थ आहे या गोष्टीला

**मा.उपमहापौर** :- आप्पा त्या ठेकेदारांकडुन पैसेच दिले जात नाहीत. ठेकेदाराकडुन दोन-दोन टक्के पैसे मागीतले जातात. एक-एक टेबलावर दिले तरच फाईल पुढे जाते. एवढच काय तर ज्येष्ठ नितीनभाऊ सभागृहातील सर्व सदस्य आणि जसे आता तुम्ही ज्येष्ठ सदस्य, महापौर आणि आम्ही जे ठेकेदारांना गुडफेथ मध्ये सांगतो की तुम्ही काम करून घ्या. त्या ठेकेदारांचा कालच आढावा घेतला आमदार महोदयांनी, कोणत्याही एका ठेकेदाराने सांगाव की आमचे सन्मा. शहर अभियंता गिरगांवकर साहेब यांच्या तक्रारी नोंदवल्या नाही म्हणुन आप्पा दोन-दोन टक्के मागीतले जातात ना.

**श्री.कैलास सोनवणे** :- मी काय म्हणतो ऐका ना

**मा.उपमहापौर** :- कस चालणार आहे हे

**श्री.कैलास सोनवणे** :- मी यांची आधीपण एक तक्रार दिलेली होती. भाऊ यांच्या विरूध्द बऱ्याच तक्रारी आहे नंतर त्यांनी क्लिरीफीकेशन देण्याचा प्रयत्न केला. परंतू जावु दिलं.

**मा.उपमहापौर** :- मॅडमांनी शहर अभियंत्यांना सांगीतले शहर अभियंता साईट व्हिजीट करून आले तरी जर थर्ड पार्टीने जर पत्र दिले तरी यांनी सांगीतले की जावळे साहेब जावुन आले आणि व्हेरीफीकेशन करून आले आणि मग सर्वांचा प्रोटोकॉल आहे आणि त्याच्यानंतर आयुक्त मॅडमांनी मागणी केली आणि ती पण पुर्ण केली तरी तो ठेकेदार कोणाकोणाला पैसे देईल आणि कशासाठी देईल.

**श्री.कैलास सोनवणे** :- मला माहिती आहे की ते पिंप्राळ्याचे पण कामाचे बिल बाकी आहेत.

**मा.उपमहापौर** :- अहो पण थर्ड पार्टी सांगते मग कोणता विषय आला याच्यात.

**श्री.कैलास सोनवणे** :- मला माहिती आहे की बरेच बिल बाकी आहेत ते.

**श्री.एम.जी गिरगांवकर, शहर अभियंता** :- सन्मा.महापौर आणि या संदर्भात मी माझे मत नोंदवु ईच्छितो की माझा जो कामांचे रजिष्टर मेंटेंन केले आहे माझ्याकडे आणि माझ्या ऑफीसला येवुन कोणीही कधीही येवुन चौकशी करावी की माझ्याकडे फाईल कधी आली आणि कुठल्या दिवशी फाईल गेलेली आहे.

**मा.उपमहापौर** :- साहेब सगळ मान्य आहे. तुम्ही सोईनुसार करतात. सोईनुसार तुम्ही सही करतात.

**श्री.एम.जी गिरगांवकर, शहर अभियंता** :- आप्पासाहेब मी दोन तिन वेळा

**मा.उपमहापौर** :- हे सगळे महत्वाचे काम सोडुन हे टेंडर आपल्या सोईनुसार भरले जातात.

**श्री.एम.जी गिरगांवकर, शहर अभियंता** :-मी काय म्हणतोय की मला माझ म्हणण तरी मांडु द्या. मी काय म्हणतोय

**श्री.कैलास सोनवणे** :- साहेब सगळ जावु द्या अस केव्हा होत माहिती आहे का की तो माणुस एकदम ईमानदार असतो तेव्हा तुम्ही तुमची इमानदारीचे कारण द्या.

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य व अधिकारी चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.एम.जी गिरगांवकर, शहर अभियंता** :- माझ्याकडे जे कामांचे रजिष्टर मेंटेंन केले आहे आणि कोणीही यावे आणि चेक करावे की फाईल कधी आली आणि

**मा.उपमहापौर** :-अश्विनभाऊ तुमच्या वार्डातील कामांच्या बिलांची फाईली फिरत आहे का ?

**श्री.सुनिल खडके** :- मी काय म्हणतो साहेब जे काय असेल ते जावु द्या पण जो ठेकेदार आहे त्याला आज रात्रीपासुन काम सुरू करायला लावा. आज रात्रीपासुन काम सुरू करायला लावा कारण उद्यापासुन वहनोत्सव चालु होतोय.

**श्री.विष्णु भंगाळे** :- रथाच्या मार्गावर दुसरा पर्याय शोधता येणार नाही.

**श्री.सुनिल खडके** :- वहनोत्सव चालु होतोय. तुम्हाला समजायला पाहीजे.

**श्री.विश्वनाथ खडके** :- तुम्ही पहा किती लोक आलेले आहे आणि कोण कोण आहे.

**मा.उपमहापौर** :- आम्हाला सगळ समजतय की आपण करत आहेत.

**श्री.विष्णु भंगाळे** :- महापौर महादेया आपण आदेश द्या आता शहर अभियंत्यांना की रथमार्गाच काम तातडीने सुरू करण्यात याव.

**श्री.सुनिल खडके** :- आज रात्री पासुन काम सुरू झाल पाहीजे बाकीच आम्हाला काही माहीती नाही.

**श्री.कैलास सोनवणे** :- थांबा मी काय म्हणतोय , साहेब तुम्ही त्या डोंगरेच नांव घेतल आणि मला अस माहिती पडल की तो डोंगरे काम करायला तयार नाहीये. मग काय तुमची पुढची स्टेप काय आहे.

**मा.उपमहापौर** :- नावाला शहर अभियंता आहेत ते.

**श्री.कैलास सोनवणे** :- पुढची तुमची दुसरी प्लॅनिंग काय आहे मग

**श्री.एम.जी गिरगांवकर, शहर अभियंता** :- आप्पासाहेब आपण त्यांना कार्यादेश दिलेले आहेत आणि त्यांनी नाही केले तर आपल्याकडे जे मशिन आहे त्या मशिनवर आपण काम सुरू करू.

**श्री.कैलास सोनवणे** :- तयारी ठेवा कारण काय आहे माहिती आहे का की आपल्या वर्तवणुकीवर लोक असे नांव ठेवतील तुम्ही जर का असे वागले तर येणार नाही एका शब्दात ते यायला पाहीजे काम करायला परत

**श्री.एम.जी गिरगांवकर, शहर अभियंता** :- आपण जर ते काम करायला तयार नसतील तर आपल्याकडुन करून घेवु ठिक आहे.

**श्री.कैलास सोनवणे** :- पण तेवढ चालु करा.

**श्री.एम.जी गिरगांवकर, शहर अभियंता** :- ठिक आहे.

**श्री.विश्वनाथ खडके** :- अहो गिरगांवकर साहेब ईथे सभा चालु आहे आणि लोक येथे भेटायला आले आहे त्यांच काय करायचा ते सांगा.

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य व अधिकारी चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**मा.उपमहापौर** :- अहो आठ दिवसांपासुन सांगीतले आहे, डॉक्टर साहेब, अहो डॉक्टर साहेब

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य व अधिकारी चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**मा.महापौर** :- एक मिनिंट भाऊ आता याच्या संदर्भात

**श्री.सुनिल खडके** :- रथोत्सवाच काय करता आहे साहेब.

**श्री.सोनगिरे,उपअभियंता** :- शक्य झाले तर उद्याच चालु करू.

**श्री.सुनिल खडके** :- नाही उद्या नाही आज रात्रीपासुन काम सुरू करा. लोकांना वहन ओढावे लागते. उद्यापासुन वहनोत्सव चालु होतोय. सर्व खोदुन ठेवलाय रस्ता मग

**श्री.सोनगिरे,उपअभियंता** :- पुर्ण रथमार्गाचं काम सुरू करू.

**श्री.सुनिल खडके** :- साहेब तुम्ही बोलले होते. ताई तुम्ही बोला ना

**श्री.विष्णु भंगाळे** :- ताई आता जस कैलास आप्पांनी सांगीतले की जर डोंगरे तयार नसेल तर उद्या त्या कामाच नियोजन आहे का? तो पर्याय आपल्याकडे ठेवावा आणि

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य व अधिकारी चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**मा.महापौर** :- एक मिनिंट सगळयांनी शांतता ठेवावी.

**श्री.विश्वनाथ खडके** :- महापौर ताई एकच मिनिंट फक्त रथमार्गाची दुरूस्ती करण्यासाठी सांगा आम्ही पुर्वीच मागणी केलेली आहे.

**मा.महापौर** :- हो, हो

**मा.आयुक्त** :- कालच एक मिटींग झाली होती आपली आणि तिथे त्यांनी सांगीतले होते की कोणी जर तयार नसेल प्रशासन तिथे उभे राहील आणि कारण की डांबर अवेलेबल आहे ते फक्त गरम करून टाकायचच आहे हे नंबर एक, नंबर दोन की कॉन्ट्रक्टरवर आपली एवढी तरी विश्वासार्हता आहे की आपण जर शब्द टाकला तर ते काम करतील.

**श्री.कैलास सोनवणे** :- तुम्ही बोला मॅडम डायरेक्ट त्याच्याशी

**मा.आयुक्त** :- हो , हो

**श्री.सुनिल महाजन** :- आपण निसर्गवाल्याला दिल आहे आता तुम्हाला माहिती आहे का तो काय बोलतो आपल्या नावाने, तो नाही म्हणतोय काम करायला हि कुठली विश्वासार्हता आहे जास्त बोलायला लावु नका आणि काय सांगताहेत आम्ही सांगता तर तुम्ही ऐकत नाही

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य व अधिकारी चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**मा.उपमहापौर** :- स्टेशनरी मागायला गेले तरी स्टेशनरी मिळत नाही आणि तुम्ही म्हणत आहेत की एवढी विश्वासार्हता आहे आपली.

**श्री.विष्णु भंगाळे** :- महापौर महोदया मी याच विषयावरुन दुसऱ्या विषयावर येतो. आपल्या महापालिकेचे महापौर महोदय, आपल्या महापालिकेचे जे.सी.बी किती महिन्यांपासुन बंद आहे. किती जुनी गोष्ट आहे त्यावेळी आपण मागे जे.सी.बी आणले होते. ज्याने त्याच काम केलेल होते आणि त्याला त्याचे पैसे मिळाले नाही म्हणुन आणि आता काम कितीच आहे माहिती आहे का फक्त ६० ते ६५ हजारांच आहे. त्याच्यात वाढीव ईस्टिमेट ऑईल बदलविण्याची गरज नाहीये. महापौर महोदया, आयुक्त महोदया परंतू त्याच्यामध्ये ऑईल बदलवा हे बदलवा याच्यामुळे ते जे.सी.बी बंद

आहेत आणि बाहेरचे लावाव अस आहे म्हणजे जळगांव महानगरपालिकेमध्ये दिवाळीच्या माध्यमातुन साफसफाई असेल आरोग्याच्या माध्यमातुन असेल, डम्पींग स्टेशन असेल हे जे.सी.बीच काम आहे परंतू जे.सी.बी बंद आहे खुशाल ,काय आहे ते ड्रायव्हर बंद करून दुसरी कडे वर्ग केले जातात आणि जे.सी.बी उभे केले जातात. हे काय आहे विश्वासार्हताच्या अनुषंगानेच उभे आहेत. परंतू आज जे.सी.बी ला खर्च किती आहे माहिती आहे का ७० ते ७५ हजार रूपये आणि त्याच ईस्टिमेट अडीच लाखापर्यंत काढलेल आहे. जी गरज आहे ऑईल बदलविण्याची गरज नाही. जे नाही ते ईस्टिमेट मधुन कमी करा ना , का म्हणुन त्याच्यावर खर्च वाढवता आहेत तुम्ही , माझी आपल्याला सभागृहात विनंती आहे की दोन महिन्यांपासुन हे जे.सी.बी बंद आहेत. जळगांव शहराच्या सोईच्या हिशोबाने काम होत नाही. डंम्पींग व्यवस्थित होत नाही. मी बाविस्कर साहेबांशी सुध्दा वेळोवेळी बोललेलो आहे. मॅडम आपल्याशी पण बोललेलो आहे की विविध ठिकाणी जे.सी.बी च काम पडत बांधकामच जे.सी.बी आरोग्याकडे चालत आणि इर्मजन्सी मध्ये काम करता येत नाही. या विश्वासार्हताच्या अनुषंगाने आपण या आरोग्याच जे.सी.बी किती दिवसात चालु होईल. याची माहिती मला सभागृहात द्यावी.

**श्री.नवनाथ दारकुंडे** :- अध्यक्ष महोदय, आपल्या कंपाऊंडरच्या संदर्भात पेपरला आलेल आहे.

**श्री.विष्णु भंगाळे** :- भाऊ एक मिनिंट

**मा.महापौर** :- भाऊ यांच होवुन जावु द्या आधी

**श्री.विष्णु भंगाळे** :- भाऊ एक मिनिंट त्या आरोग्याचे जे.सी.बी किती दिवसात चालु होईल त्याचा खुलासा करू द्या.

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य व अधिकारी चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**मा.उपमहापौर** :- महापौरताई तुम्ही आदेश द्यावेत पिठासीन अधिकारी म्हणुन

**श्री.नितीन बरडे** :- सोनगिरे साहेब सगळ्या गोष्टींना तुम्हीच हे करता आहेत का

**श्री.सोनगिरे, उपअभियंता** :- भाऊ माझ्याकडेच आहे ना ते म्हणुन, कारण वाहन विभाग माझ्याकडेच आहे.

**श्री.विष्णु भंगाळे** :- सोनगिरे साहेब मी आपल्याकडे लोकांच्या कामासाठी मागितले काय आहे.

**श्री.सोनगिरे, उपअभियंता** :- भाऊ दोनच मिनिंट सांगतो.

**मा.आयुक्त** :- सर आपले जे जे.सी.बी आहेत ते सध्या बंद आहेत. त्यासाठी आपल्याकडे तरतूद नव्हती तर त्यामध्ये आपण एक दुसरा पर्याय काढला की आपण MJP ला दोन जे.सी.बी होते तर ते मोकळे करून आपल्याला इकडे वापरता येतील म्हणुन हे नंबर एक, नंबर दोन दुसरा पण पर्याय काढलेला होता की जे काही स्पेअरपार्ट आपल्याला विकत घ्यायचे आहेत ते यापुर्वीची पध्दत होती की आपण पुर्वी आपलाच एक कर्मचारी त्यानुसार ते स्पेअरपार्ट लावत होते आणि आता ते नाही म्हणुन त्याचेही ईस्टिमेट आलेले आहेत. असे दोन्हीही पर्याय आपल्याकडे आहेत. उद्यापासुन दोन जे.सी.बी तुम्हाला मिळतील.

**श्री.नवनाथ दारकुंडे** :- अध्यक्ष महादेय,

**श्री.विष्णु भंगाळे** :- आयुक्त महोदय किती दिवसांचा वेळ सांगीतला आपण

**मा.आयुक्त** :- उद्यापासुन

**श्री.विष्णु भंगाळे** :- उद्या नक्की आयुक्तांना पुष्पगुच्छ देईल मी आणि उपायुक्तांनाही पुष्पगुच्छ द्यायला येईल मी

**श्री.नवनाथ दारकुंडे** :- अध्यक्ष महोदय, आपले जे कंपाऊंडर पाठवतात डॉक्टर लोक ते हलगर्जी पणा करतात. धुळे, औरंगाबाद येथे जायला लावतात. डेंग्यु आणि याच्यासाठी त्यांचे रिपार्टच येत नाहीत. म्हणजे हे तिथे पाठवतात पेशंटला हे पेपरला आलेल आहे १३ तारखेला अजुन पेशंट तिथे पोहोचलेले नाही आपले डेंग्युचे, दिव्यमराठी ला आहे १३ तारखेच्या, मग आपली जी डेंग्युच्या संदर्भात जी यंत्रणा आहे. ती काय काम करते मग मलेरिया विभाग

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य व अधिकारी चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.नवनाथ दारकुंडे** :- सप्टेंबर मध्ये जवळजवळ ८० पेंशट होते. तुम्ही घरोघरी जावुन इन्सपेक्शन केल बरोबर

**श्री.इंगळे, मलेरिया विभाग** :- हो बरोबर आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे** :- त्याचे नमुने चेक करायला पाठविले १२५ आतापर्यंत त्याचा रिपोर्ट काय आला आहे ऑलराऊंड

**श्री.इंगळे, मलेरिया विभाग** :- भाऊ आपण काय करतो की आपण घरोघरी जावुन फक्त फवारणी करतो आणि काय आहे आपण फक्त ॲबेटिंग आणि फवारणी करतो.

**श्री.नवनाथ दारकुंडे** :- हो मग

**श्री.इंगळे, मलेरिया विभाग** :- आणि जिथे आपल्याला संशयित रूग्ण सापडतो तिथे आपण धुरळणी करतो.

**श्री.नवनाथ दारकुंडे** :- हो मग त्याचा रिपोर्ट कोणाला पाठवता तुम्ही की म्हणजे पेशंट सापडल्यावर आता समजा संशयित सापडल्यावर

**श्री.इंगळे, मलेरिया विभाग** :- ते म्हणजे आपला दवाखाना विभागाकडे असत ते

**मा.महापौर** :- दारकुंडे भाऊ ते आपल्या दवाखान्यात चेक नाही होत ते धुळे किंवा औरंगाबादला जात ते

**श्री.विश्वनाथ खडके** :- रावलानी साहेब देतील याच उत्तर या साहेब , सगळ्यात ज्येष्ठ डॉक्टर आहेत आपले साहेब, तर डेंग्यु बद्दल काय जनजागृती आहे आणि काय आहे तेवढ त्यांना सांगायला लावा. एवढे पेशंट वाढत चालले आहे तरी काही वाटत नाहीये. थोडस बोलायला पाहीजे की काय चालु आहे की पब्लिक प्लेसमध्ये काय चालु आहे.

**श्री.डॉ.राम रावलानी, प्रमुख वैद्यकीय अधिकारी** :- सन्मा.सभागृह आपल्याकडुन डेंग्युचे १२५ नमुने पाठवण्यात आलेले आहेत. त्याच्यापैकी ९ पॉझिटिव्ह आलेले आहेत आणि उर्वरित प्रलंबित आहेत. तर आपल्याकडे तपासणी होत नाही. कारण की यंत्रणा कमी आहे. तर जो रिपोर्ट कन्फर्म येतो त्यांना आपण भेटुन सांगतो.

**श्री.विश्वनाथ खडके** :- बर डेंग्यु होवु नये म्हणुन काय करता आहे तुम्ही

**श्री.डॉ.राम रावलानी, प्रमुख वैद्यकीय अधिकारी** :- इंगळे साहेबांनी जस आता सांगीतले की फॉगींग, अबॅटिंग आणि फवारणी

**श्री.विश्वनाथ खडके** :- हे तर झाल ना तुम्ही काय करता आहे. डेंग्यु झालेल्या पेशंटला तुम्ही काय करता आहे.

**श्री.डॉ.राम रावलानी, प्रमुख वैद्यकीय अधिकारी** :- हे फॉगींग, अबॅटिंग आणि फवारणी हे असतात ना ते मलेरिया विभागाच काम असत.

**श्री.विश्वनाथ खडके** :- आता जे पेशंट पॉझिटिव्ह आलेले आहे त्यांच्या बाबतीत काय केले तुम्ही विचारा ना त्यांना

**श्री.डॉ.राम रावलानी, प्रमुख वैद्यकीय अधिकारी** :- सर आम्ही

**श्री.विश्वनाथ खडके** :- मॅडम तुमच्या समोर सांगता आहेत ते की त्यांच डिपार्टमेंट वेगळ आहे आणि आमच डिपार्टमेंट वेगळ आहे. तर लोकांना अस सांगु का आम्ही

**मा.आयुक्त** :- अहो रावलानी साहेब त्यांचा प्रश्न असा आहे की फॉगींग करण्याच्या बिफोर आपण काय करतात असा त्यांचा प्रश्न आहे.

**श्री.विश्वनाथ खडके** :- त्याच्या अगोदर काय करता तुम्ही

**श्री.डॉ.राम रावलानी, प्रमुख वैद्यकीय अधिकारी** :- सर आम्ही

**श्री.विश्वनाथ खडके** :- त्याच्यासाठी काय उपाययोजना करत आहेत त्या सांगा ना तुम्ही

**श्री.डॉ.राम रावलानी, प्रमुख वैद्यकीय अधिकारी** :- मॅडम आम्ही त्याच्याकरीता

**मा.आयुक्त** :- म्हणजे तुम्ही नंतर करतात बिफोर काहीच नाही करत.

**श्री.डॉ.राम रावलानी, प्रमुख वैद्यकीय अधिकारी** :- मॅडम डेंग्यु हा जो आजार आहे ना हा व्हेंटर ॲनॉमिशनचा आहे. तर

**श्री.विश्वनाथ खडके** :- मॅडम आपले जे हॉस्पीटल आहेत ना तिथे त्याचे जे गाईडन्स आहेत ना त्याचे बोर्ड त्यांना तिथे लावायला लावा. म्हणजे कस आहे आणि जे नमुने घेण्यात येतील ते लवकरात लवकर यांना पाठवायला लावा.

**श्री.नवनाथ दारकुंडे** :- हो वेळेच्या आत पाठवण्यात यावे.

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**मा.महापौर** :- एक मिनिंट झाल

**मा.उपमहापौर** :- महापौरताई बंटीभाऊंना बोलायची संधी द्या त्यांना बोलायचे आहे

**श्री.अनंत जोशी** :- आयुक्त मॅडम रस्ता दुरूस्तीच्या हिशोबाने आपण काही नियोजन केलेल होत का ? म्हणजे ते कुठपर्यंत आल आणि काय झाल त्याच

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**मा.आयुक्त** :- गिरगांवकर साहेब सांगा.

**श्री.एम.जी.गिरगांवकर, शहर अभियंता** :- मागच्या महासभेमध्ये आपण शहरामधील रस्ते दुरूस्ती आणि डागडुजी करण्याचा ठेका देण्याच्या संदर्भात आपण मंजुरी दिलेली आहे आणि मागच्या महिन्यात त्याला मंजुरी मिळाली आणि निविदा प्रक्रीये मध्ये आहे ते.

**मा.आयुक्त** :- निविदा प्रक्रीयेच काय आहे.

**मा.उपमहापौर** :- साहेब निविदा प्रक्रीया कुठपर्यंत आली आहे.

**श्री.एम.जी.गिरगांवकर, शहर अभियंता** :- सुरू आहे ती प्रोसेस मध्ये आहे.

**मा.उपमहापौर** :- त्यांना खोटी सवय आहे ती सभागृहात सादर करण्याची

**श्री.एम.जी.गिरगांवकर, शहर अभियंता** :- निविदा प्रक्रीयेचा एक भाग आहे की अगोदर ठराव मंजुर झाल्यानंतर त्याच्यामध्ये टर्म / कंडीशन टाकायच्या आहेत म्हणुन त्याच्यामध्ये आपल्याला अश्या कंडीशन टर्म टाकायच्या आहेत ज्यामध्ये आपण आपला जो प्लॅन आहे त्याच्यामध्ये त्याने सहभागी व्हाव आणि त्यात जर तो हे करत असेल तर निविदा प्रक्रीया अंतिम झाल्यानंतर त्याला काम देण्यात येईल

**मा.महापौर** :- चला याच्याबद्दल आयुक्त महोदया, नगरसचिव साहेब , सर्व अधिकारी वर्ग आणि महापालिकेचे सर्व कर्मचारी आणि उपस्थित असलेले सर्व सन्मा सदस्य आणि सर्वांना दिवाळीच्या खुप खुप शुभेच्छा.

**श्री.विशाल त्रिपाठी** :- महापौरताई तुम्हालाही

**मा.महापौर** :- सुख समृध्दी आणि सर्वांना खुप खुप शांती लाभो हिच ईश्वर चरणी प्रार्थना

**मा.महापौर :-** नगरसचिवांनी राष्ट्रगीताला सुरुवात करावी.

**नगरसचिव :-** सर्व सन्मा.सदस्यांनी राष्ट्रगीतासाठी उभे राहावे ही विनंती.

**सही/-**
**(महाजन जयश्री सुनिल)**
**महापौर**
**जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव**